शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

## डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या अधिष्ठाता पदाच्या कार्यकाळाची

# वर्षपूर्ती




महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
छत्रपती संभाजीनगर
डॉ.शिवाजी बा.सुक्रे

## महाविद्यालयीन परिषदेचे सदस्य



## महाविद्यालयीन परिषद



## महाविद्यालयीन परिषदेचे सदस्य






# संपादकीय




मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी अधिष्ठाता म्हणून पदभार स्वीकारल्याच्या वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त प्रशासनाने एक स्मरणिका प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. या स्मरणिकेच्या संपादनाची जबाबदारी आमच्यावर टाकून, आम्हास यासाठी पात्र समजल्याबद्दल आम्ही प्रशासनाचे ऋणी आहोत.

या स्मरणिकेचे संपादन करीत असताना आम्ही जेव्हा माहिती संकलनाचे काम सुरू केले तेव्हा आम्हाला भरभरून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. जेव्हा आम्ही इतर उप-अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय उप-अधीक्षक, विशेष कार्य अधिकारी, विभागप्रमुख, अधिसेविका, परिचारिका वर्ग, मार्ड अध्यक्ष, पदवीपूर्व तसेच पदव्युत्तर विद्यार्थी आणि सरांचा मित्र-परिवार यांच्याशी चर्चा केली, तेव्हा गेल्या एक वर्षातील सरांच्या कामाची सर्वदूर व्याप्ती लक्षात आली.

रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना अग्रक्रम देत सरांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेत अनेक विकासकामे केली व संस्थेचा चेहरामोहरा बदलून टाकला.

या सर्व विकासकामांचा स्मरणिकेत समावेश करण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला आहे. ही स्मरणिका वाचकांच्या हाती देताना आम्हाला अत्यंत अभिमान व आनंद आहे.

ही स्मरणिका तयार करताना काही मानवी त्रुटी राहिल्या असतील, तर त्याबद्दल क्षमस्व!

डॉ. अर्चना पाटील-वरे,
डॉ. स्वप्ना अंबेकर,
डॉ. प्रसाद देशपांडे

# संदेश

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय,
मुंबई ४०० ००१.

दिनेश वाघमारे (भाप्रसे)
प्रधान सचिव

दि. १६ डिसेंबर , २०२४

प्रिय डॉ. सुक्रे,

वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे डॉ.शिवाजी सुक्रे यांच्यावर अधिष्ठाता पदाची जबाबदारी सोपविण्यात आली व त्यास वर्ष पूर्ण होत आहे.

डॉ.सुक्रे हे आदर्श वैद्यकीय शिक्षण पुरस्कार प्राप्त असून त्यांनी वैद्यकीय शिक्षणा बरोबरच रूग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य रूग्णांना सोईसुविधा पुरविण्यासाठी कार्यपध्दतीत अमुलाग्र बदल घडवून आणला आहे. "चिठ्ठीमुक्त घाटी रूग्णालय" हा महत्वकांक्षी प्रकल्प राबवून तो अंमलात आणणारे, कदाचित हे राज्यातील पहिलेच रूग्णालय असेल.

मागील वर्षभराची कारकिर्द पाहता त्यांनी राबविलेली कार्यपध्दती शासकीय रूग्णालयांना पथदर्शी व प्रेरणादायी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

डॉ. सुक्रे यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...!

आपला स्नेहांकित

(दिनेश वाघमारे)

प्रति,
डॉ.शिवाजी सुक्रे,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय,
छत्रपती संभाजीनगर.

# संदेश

राजीव निवतकर
आयुक्त

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष.
मुंबई



डॉ.शिवाजी सुक्रे हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे अधिष्ठाता पदावर मागील एक वर्षापासून कार्यरत आहेत.

डॉ.सुक्रे हे वैद्यकीय विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास सर्वोच्च प्राधान्य देत आहेत, त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाचा स्तर उंचावण्याचे काम करीत असतांना रुग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना उच्चदर्जाची व अत्याधुनिक सोईसुविधा उपलब्ध करुन देणेसाठी सुध्दा प्रभावी निर्णय घेतलेले आहेत. सर्वसामान्य रुग्णांना मोफत औषधी व इतर सर्व आवश्यक चाचण्या उपलब्ध व्हावेत हे अग्रक्रम ठरवून अहोरात्र काम करीत असल्यामुळे रुग्णांना दर्जेदार सेवा उपलब्ध झालेल्या आहेत.

मागील वर्षभरात त्यांनी राबविलेल्या कार्यपध्दतीचे वैद्यकीय क्षेत्रात आगामी काळात चांगले परिणाम दिसून येतील असा मला विश्वास आहे.

डॉ.सुक्रे यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई.

# संदेश

महाराष्ट्र शासन

**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१

दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

दिनांक — १९ डिसेंबर, २०२४



## शु भ सं दे श

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे अधिष्ठाता पदावर डॉ.शिवाजी सुक्रे कार्यरत आहेत.

वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाची सर्वांगीण प्रगती व उन्नती करिता त्यांनी अनेक प्रभावी निर्णय घेतलेले आहेत. रुग्णालयात येणाऱ्या कनिष्ठ वरिष्ठ सर्व वर्गाच्या रुग्णांसाठी अत्याधुनिक आणि उच्च दर्जाची रुग्णसेवा उपलब्ध करुन देणे हे ध्येय डॉ.सुक्रे यांनी समोर ठेवून काम केल्यामुळे त्यांची प्रगल्भता व निर्णय क्षमता लक्षात येते.

रुग्णालयात येणारे ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्ण असो किंवा शहरी भागातील रुग्ण असो प्रत्येक रुग्णांसाठी मोफत औषधी उपलब्ध व्हावीत या करिता शासनाचे कल्याणकारी निर्णय सर्वसामान्यांसाठी उत्कट इच्छाशक्तीने अंमलता आणणे शक्य आहे, याचे उत्तम उदाहरण देता येईल.

मी त्यांच्या कामाचे अभिनंदन करतो आणि त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा देतो.

डॉ. अजय साहेबराव चंदनवाले,
संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

# मनोगत



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे अधिष्ठाता म्हणून मी दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी रुजू झालो. माझे पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षण इथेच झाले असल्याने, ज्या संस्थेत मी विद्यार्थी म्हणून घडलो त्याच संस्थेत अधिष्ठाता म्हणून रुजू होणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब होती. दि. २० डिसेंबर, २०२४ रोजी माझ्या अधिष्ठाता पदाच्या कार्यकाळास एक वर्ष पूर्ण होत आहे, या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेत मी माझे मनोगत प्रस्तुत करीत आहे. जेव्हा हे मनोगत लिहिण्यास मी सुरुवात केली, तेव्हा मागील एक वर्षाच्या काळाच्या पलीकडे जाऊन माझा संपूर्ण जीवनपट माझ्या डोळ्यांसमोर तरळून गेला.

जालना जिल्ह्यातील नेर या छोट्या गावात दि. ५ जून १९६८ रोजी माझा जन्म झाला. ६ एकर कोरडवाहू शेती असणाऱ्या अतिशय गरीब कुटुंबात माझा जन्म झाला. आई-वडीत दोघेही अशिक्षित, त्यामुळे घरात शिक्षणाचा लवलेशही नव्हता, तसेच शिक्षणाबद्दल प्रचंड अनास्था होती. घरात अठराविश्वे दारिद्र्य. दोन वेळा पोटभर जेवायलाही मिळायची भ्रांत असणाऱ्या कुटुंबात मी व माझे ज्येष्ठ बंधू श्री. कचरू सुक्रे यांचे बालपण गेले.

परिस्थिती हलाखीची असल्याने इतरांची गुरे राखणे, विहिरीतील गाळ काढणे, इतरांच्या शेतात नांगरणी करणे इत्यादी कामे करावी लागत होती. आई रोजगार हमीच्या कामावर जात असल्याने आईसोबत मीही जात असे. शिक्षणाबद्दल घरात अजिबात गंध नसल्याने मी ९ वर्षाचा झालो तरीही माझे नाव शाळेत घातले गेले नाही. त्या काळी ग्रामीण भागात शाळेत सुकडी (फक्की) हा खाद्यपदार्थ मिळत असे. शाळेत गेलो तर एक वेळा जेवणाची तर सोय होईल या एकमेव उद्देशाने १९७७ साली जिल्हा परिषदेच्या शाळेत माझा प्रवेश झाला. मी शाळेत जायला सुरुवात तर केली; पण वडिलांचा त्या गोष्टीला सुरुवातीला थोडा विरोधच होता. शाळेत जाऊन ''तू कुठे डॉक्टर किंवा कलेक्टर होणार आहेस?'' असे ते सतत म्हणत असत.

एकदा शाळेत प्रवेश झाल्यानंतर मला शिक्षणाची गोडी वाटू लागली. इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत माझे वय जास्त असल्याने मी वर्गात सगळ्यात मोठा दिसत असे. ४थी मध्ये वय जास्त असल्याने मला शिष्यवृत्तीच्या परीक्षेस बसता आले नाही. वर्ग १ली ते १०वी मी वर्गात सतत पहिला असायचो. ७ व्या इयत्तेत मात्र मला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळाल्याने वयाची अट शिथिल झाल्याने मी शिष्यवृत्ती परीक्षेस बसू शकलो व जिल्ह्यात प्रथम आलो. एका अशिक्षित कुटुंबातील मुलाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटाकावणे ही गोष्ट त्याकाळी खूप मोठी होती. त्यामुळे मराठवाड्याचे विभागीय आयुक्त असणाऱ्या श्री. अरुण बोंगीनवार यांच्या हस्ते माझा जालन्याच्या मास्टर फुलंब्रीकर नाट्यगृहामध्ये सत्कार करण्यात आला. या सत्काराच्या बातम्या अनेक आघाडीच्या वृत्तपत्रांतून फोटोसह झळकल्या.

माझ्या शाळेतील माझे अध्यापक श्री. शेर महंमद यांनी माझी बुद्धिमत्ता जोखली व माझ्या वडिलांना त्यांनी ही वृत्तपत्रांमधली कात्रणे दाखविली. महंमद सरांनी माझ्या पुढील शिक्षणाची हमी घेऊन ९वी पर्यंत नेर येथील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १० वी साठी जालन्याच्या सरस्वती भुवन प्रशालेत मला दाखल केले. ११वी व १२वी साठी मी औरंगाबादमधील देवगिरी महाविद्यालयात प्रवेश घेतला.

सन १९९१ साली माझा प्रवेश शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद (सध्याचे छत्रपती संभाजीनगर) येथे झाला. ११वी पासून ते पदवीपूर्व शिक्षण पूर्ण होईपर्यंत मी समाजकल्याण विभागाच्या पदमपुरा येथील संत तुकाराम वसतिगृहामध्ये राहिलो. येथे मला पुस्तके व जेवण मोफत मिळत असे, तसेच शिष्यवृत्ती म्हणून दरमहा रु. ३६० देखील मिळत असत. एम.बी.बी.एस. झाल्यानंतर मी शरीररचनाशास्त्र या विषयात पदव्युत्तर पदवी (एम.एस.) प्राप्त केली. तद्नंतर एम.पी.एस.सी.मार्फत सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक अशा विविध पदांवर या संस्थेत काम केले. तसेच वैद्यकीय उप-अधीक्षक, वैद्यकीय अधीक्षक व उप-अधिष्ठाता या पदांवरही काम केले. याच महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याने व वेगवेगळ्या पदांवर काम केलेले असल्याने मला या महाविद्यालयाची व रुग्णालयाची पुरेपूर जाण आहे.

सन २०१४ मध्ये माझी मुंबई येथील ग्रँट मेडिकल कॉलेज व सर जे जे रुग्णालय येथे बदली झाली. या काळात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने हे तेथे अधिष्ठाता होते. २० वर्षांपूर्वी मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया होऊनही ते १८ ते २० तास दररोज काम करीत असत. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सनेही त्यांच्या या अशक्यप्राय वाटणाऱ्या कार्याची नोंद घेतलेली आहे. सरांच्या या दुर्दम्य कार्यशक्तीने मी प्रचंड प्रभावित झालो. माझ्या गरीब आई-वडिलांकडून मिळालेल्या संस्काराच्या शिदोरीमुळे व लहाने सरांसारख्या गुरुवर्यांकडून मिळालेल्या गतिमान प्रशासनाच्या धड्यांमुळे मी देखील तब्येतीच्या काही अडचणी असतानाही लोककल्याणकारी धोरणाचा अवलंब करीत समाजातील तळागाळातील रुग्णाला उच्च प्रतीची रुग्णसेवा देण्याचा सदैव प्रयत्न करीत असतो.

मी स्वत: अत्यंत गरिबीच्या परिस्थितीतून आलेलो असल्याने, गरीब रुग्णांच्या समस्यांविषयी अतिशय संवेदनशील आहे. त्यामुळे कुणीही गरीब रुग्ण जेव्हा रुग्णालयात येतो, तेव्हा रोगनिदान करण्यासाठी आवश्यक चाचण्या व सर्व औषधे त्याला मोफत मिळाली पाहिजेत याकडे माझा कटाक्ष असतो. रुग्णांना सर्व औषधी मोफत मिळाली पाहिजेत यासाठी मी उपलब्ध व अनुपलब्ध ओषधांचा सखोल अभ्यास केला. शासनाच्या विहित नियमांचे काटेकोरपणे पालन करून शासन निधी, जिल्हा नियोजन विकास निधी, पीएलए निधी व महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना निधी इत्यादी मधून निधी उपलब्ध करून 'चिठ्ठीमुक्त' घाटी ही संकल्पना रुजू करण्यात घाटी प्रशासन यशस्वी झाले. या उपक्रमाबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांनी देखील गौरवोद्गार काढले. मला हे नम्रपणे नमूद करताना अतिशय गौरव व अभिमान वाटतो की, मागील एक वर्षाच्या काळात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर, अतिविशेषोपचार रुग्णालय व राज्य कर्करोग रुग्णालय या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण व रुग्णसेवा यात आमूलाग्र बदल करून या संस्थेला एक 'कॉर्पोरेट लुक' देण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या कार्यकाळात एन.एम.सी. ने मान्यता दिल्याने राज्य कर्करोग रुग्णालयातील ०४ सुपरस्पेशालिटी कोर्सेस नव्याने सुरू झाले. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यानंतर ६८ वर्षांनी श्वसनविकार विभागात ०५ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना यापुढे प्रवेश घेता येऊ शकणार आहे. केंद्र शासनाने १५० कोटी रुपये खर्च करून अतिविशेषोपचार रुग्णालय सुरू केले. तेथील डॉक्टर्स, परिचारिका, वर्ग ३ व वर्ग ४ पदे भरूनही ते कार्यान्वित होऊ शकत नव्हते, मी यामध्ये विशेष लक्ष घातल्यामुळे बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभागही सुरू करता आले. तसेच अतिविशेषोपचार विभागातही न्यूरोसर्जरी/प्लास्टिक सर्जरी इत्यादी अनेक विषयांत लवकरच सुपरस्पेशालिटीचे (D.M., Mch) अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. बजाज अध्यापन संकुलाची देखणी इमारत सीएसआर च्या माध्यमातून काही काळापासून तयार झालेली असूनही कार्यान्वित नव्हती. यासाठी महाविद्यालयीन परिषदेची संमती व वरिष्ठांची परवानगी घेऊन ५७ लाख रुपये खर्च करून ही इमारत कार्यान्वित केली. २५० विद्यार्थी क्षमतेचे ४ व्याख्यान कक्ष एकमेकांना संलग्न केल्याने १००० विद्यार्थी एकावेळी बसू शकतील असे हे महाराष्ट्रातील एकमेव ज्ञानार्जन अध्यापन संकुल आहे. अत्याधुनिक दृकश्राव्य यंत्रणा, वातानुकुलित यंत्रे, स्मार्ट बोर्ड व पोडियम यांनी युक्त असणारे हे संकुल संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे.

संस्थेतील अनेक विभागांचे नूतनीकरण गेल्या एक वर्षात करण्यात आले. नेत्र विभाग, कान-नाक-घसा विभाग, शल्यचिकित्सा विभाग व इतर काही विभागांमधील सेमिनार हॉल अद्ययावत करण्यात आले. पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अनेक विकास कामे करण्यात आली. अनेक कार्यशाळा, सीएमई, व्याख्याने यांचे आयोजन करण्यात आले. मेडिकल एज्युकेशन युनिटच्या माध्यमातून अनेक वैद्यकीय अध्यापकांचे नवीन अभ्यासक्रमासाठी (CBME) प्रशिक्षण घेण्यात आले. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी होण्यासाठी अनेक अध्यापकांना प्रोत्साहन देण्यात आले. रुग्णालयातील स्वच्छतेलाही अग्रक्रम देऊन अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर हे महाराष्ट्रात अग्रगण्य होण्यासाठी मी मागील एक वर्षात सर्वतोपरी प्रयत्न केले. या प्रयत्नात मला मंत्रीमहोदय ना. श्री. हसन मुश्रीफ, प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे, मा. आयुक्त श्री. राजीव निवतकर, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. अजय चंदनवाले, सहसंचालक डॉ. पाखमोडे, संस्थेतील सर्व उप-अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय उप-अधीक्षक, सर्व विभागप्रमुख, सर्व अध्यापक, निवासी वैद्यकीय अधिकारी, परिचारिका वर्ग, चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची मोलाची साथ मिळाली. माझ्या या आजवरच्या वाटचालीत श्री. राजेंद्र सोनवणे व सौ. स्मिता सोनवणे यांनी मला आई-वडिलांप्रमाणे प्रेम व आशीर्वाद दिले. माझा हा प्रवास डॉ. अमृत महाजन, डॉ. गजानन सुरवडे, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. काशिनाथ गर्कल, डॉ. सुधीर चौधरी व डॉ. उद्धव खैरे यांच्या निस्सीम मैत्रीमुळे व स्नेहामुळे सुकर झाला आहे हे निश्चित! माझ्या या प्रशासकीय प्रवासात माझ्या कुटुंबीयांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. माझे ज्येष्ठ बंधू श्री. कचरू सुक्रे यांचे आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी असतात. माझी पत्नी डॉ. वर्षा सुक्रे यांची या वाटचालीत मला भरभक्कम व अतिशय खंबीर साथ लाभली. माझी मुले चैतन्य व चैताली सतत मला प्रोत्साहीत करीत असतात. माझ्या कुटुंबाच्या प्रेमामुळे अखंड काम करण्याची सकारात्मक ऊर्जा मला सदैव मिळत असते. तसेच माझ्या रोजच्या दिवसाच्या ताणतणावाचे निराकरण करणारा आमचा प्रिय लिओ हा देखील या प्रवासाचा महत्त्वपूर्ण साथीदार आहे.

या स्मरणिकेचे संपादन करणाऱ्या समितीच्या सर्व सदस्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. माझ्या सोबत दररोज कार्यलयात काम करणारे टंकलेखक नेरश सामंत, जावेद खान, गणेश घुगे, तसेच सहकारी रवि लोखंडे, रोहित जमधडे, सुशिल कांबळे, सिमा चावरिया, छायाचित्रकार सुजीत खिल्लारे, नयना व गीतेश यांचे तसेच प्रिंटवेल इंटरनॅशन प्रा.लि.चे श्री. दिलीप शिंदे आणि सागर भोसले यांचेही आभार मानतो. मागील एक वर्षात अधिष्ठाता म्हणून कार्य करताना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेने प्रगतीची नवनवीन शिखरे गाठावी यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न केले. या वर्षपूर्तीच्या निमित्ताने मला माझ्या वाढत्या जाबदारीची पूर्णपणे जाणीव आहे. यापुढे येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या पेलण्यासाठी मी सर्वांच्या सहकार्याने नवीन जोमाने, नवीन चैतन्याने तयार आहे. या क्षणी मला रॉबर्ट फ्रॉस्ट यांच्या प्रसिद्ध कवितेच्या ओळी आठवत आहेत - Woods are lovely, dark and deep, miles to go before I sleep.

डॉ. शिवाजी सुक्रे,
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

# महाविद्यालयाविषयी

छत्रपती संभाजीनगर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख शहर आहे. महाराष्ट्राची पर्यटन राजधानी तसेच मराठवाड्याची राजधानी म्हणून या शहराची ओळख आहे. ५२ दरवाजांचे शहर म्हणून नावलौकिकास आलेल्या या शहरामध्ये बिबी-का-मकबरा, पाणचक्की व औरंगाबाद लेणी अशी अनेक प्रसिद्ध पर्यटनस्थळे आहेत. अशा या छत्रपती संभाजीनगर शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे एक प्रमुख वैद्यकीय महाविद्यालय आहे. या रुग्णालयास सर्वसामान्य लोक घाटी रुग्णालय म्हणून ओळखतात.

हे महाविद्यालय व रुग्णालय शहराच्या मध्यभागी ९९ एकर जमिनीवर स्थित आहे. महाविद्यालयाची स्थापना ऑगस्ट १९५६ मध्ये झाली. १५ ऑगस्ट १९५६ रोजी भारताने दहावा स्वातंत्र्य दिन साजरा केला, त्याच ऐतिहासिक दिवशी छत्रपती संभाजीनगर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना झाली. त्याकाळी हे महाविद्यालय मराठवाड्यातील एकमेव वैद्यकीय महाविद्यालय होते.

महाविद्यालयाची सुरुवात शहराच्या छावणी भागातील ऐतिहासिक निजाम बंगल्यात ५० विद्यार्थीसंख्येने झाली. तसेच सुरुवातीस शरीररचनाशास्त्र विभाग हा निजाम बंगल्यामध्ये सुरू झाला. नेत्ररोग, प्रसुती व संसर्गजन्य विभाग आमखास येथील एका इमारतीत होते. प्रथमत: एम.बी.बी.एस. चे पहिले वर्ष या महाविद्यालयात पूर्ण होई व त्यानंतर दुसऱ्या व अंतिम वर्षाकरिता उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद येथे जावे लागे; परंतु १९६० सालापासून सर्व एम.बी.बी.एस. पदवी या महाविद्यालयात पूर्णत्वाने सुरू झाली.

आज ज्या प्रशस्त वास्तूत महाविद्यालय स्थित आहे, त्या वास्तूचा पायाभरणी समारंभ मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे खंबीर नेते स्वामी रामानंद तीर्थ व महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते दिनांक २७ ऑक्टोबर १९५७ रोजी संपन्न झाला.

आजच्या महाविद्यालयाच्या आणि रुग्णालयाच्या इमारतीचे संकुल पुढील काही वर्षात उभे राहिले. महाराष्ट्रातील पहिले व सर्वार्थाने कर्करुग्णांसाठीचे पहिले शासकीय कर्करोग रुग्णालय २२ सप्टेंबर २०१२ रोजी कार्यान्वित झाले. दिनांक १४/१०/२०१६ रोजी राज्य कर्करोग संस्थेचा दर्जा महाराष्ट्र शासनातर्फे प्रदान करण्यात आला. रुग्णसेवा, शिक्षण व प्रशिक्षण देणारी ही संस्था लाखो कर्करोग रुग्णांसाठी आधारवड ठरत आहे. ३०० खाटांच्या सोबतच अत्याधुनिक यंत्रसामग्री, तज्ज्ञ मनुष्यबळ व सहा विषयांत अतिविशेषोपचार अभ्यासक्रम हे या संस्थेचे वैशिष्ट्य ठरत आहे. तसेच अतिविशेषोपचार रुग्णालयही मोठ्या दिमाखात उभे आहे. बजाज अध्यापन संकुल ही सुंदर वास्तू पदवीपूर्व व पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत महत्त्वाचे काम करीत आहे.

१९६० मध्ये केवळ ३०० खाटा असलेले रुग्णालय आज विविध विभागांद्वारे ११७७ रुग्णांना सेवा देत आहे. बऱ्याचदा ही रुग्णसंख्या १८०० ते १९०० पर्यंत पोहोचलेली असते.

वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना झाली तेव्हा केवळ ५० विद्यार्थ्यांना पदवीपूर्व म्हणजेच एम.बी.बी.एस. ला प्रवेश दिला जात आसे. मात्र आज २०० विद्यार्थी एम.बी.बी.एस. ला प्रवेश घेत आहेत. तसेच साधारण २५० विद्यार्थी विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेत आहेत.



तत्कालीन मुख्यमंत्री मा.श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण (२७ ऑक्टोबर १९५७)




कोनशिलेच्या अनावरण प्रसंगी कै.श्री. यशवंतराव चव्हाण, कै. शंकरराव चव्हाण, कै.श्री. रामानंद तीर्थ, द्वारकादास पटेल.




सुरुवातीच्या काळातील रुग्णालय व महाविद्यालय मेडिसीन वार्डमध्ये कार्यरत होते.





निजाम बंगला



बालरोग, स्त्रीरोग व नेत्ररोग विभाग



सध्याची महाविद्यालयाची इमारत

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी





**१७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी तत्कालीन मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे यांच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील भेटीची काही क्षणचित्रे**

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी





१७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी तत्कालीन मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे यांच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील भेटीची काही क्षणचित्रे

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी





अवयव दिनी दिनांक ०३ ऑगस्ट २०२४ रोजी तत्कालीन पालकमंत्री मा.ना.श्री. अब्दुल सत्तार, विभागीय आयुक्त मा.श्री. दिलीप गावडे.

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी





मा.खा.डॉ.श्री. भागवतजी कराड यांची संस्थेस भेट

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी







मा.खा.डॉ.श्री.अजित गोपछडे यांची संस्थेस भेट

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी





१७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी मा.आ.श्री. संजयजी शिरसाठ यांची संस्थेस भेट.

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी





**मा.श्री. प्रदीप जैस्वाल साहेब यांची दि. १२ डिसेंबर २०२४ रोजी संस्थेला भेट.**

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी







अधिष्ठाता कार्यालयाच्या नूतनीकरणाच्या उद्घाटन प्रसंगी मा. प्रधान सचिव (वैद्यकीय शिक्षण)
मा.श्री. दिनेशजी वाघमारे यांची संस्थेस भेटीदरम्यानची क्षणचित्रे

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी






मा. प्रधान सचिव (वैद्यकीय शिक्षण) मा.श्री. दिनेशजी वाघमारे यांची संस्थेस भेटीदरम्यानची क्षणचित्रे

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी






मा. जिल्हाधिकारी श्री.दिलीपजी स्वामी यांची संस्थेस भेटीदरम्यानची काही क्षणचित्रे

# मान्यवरांच्या संस्थेस भेटी





मा. जिल्हाधिकारी श्री.दिलीपजी स्वामी यांची संस्थेस भेटीदरम्यानची काही क्षणचित्रे

# मान्यवरांच्या भेटी



मा.ना.श्री.हसन मुश्रीफ, मंत्री-वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या समवेत अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे



मा.श्री.दिनेश वाघमारे, सचिव-वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये यांच्या समवेत अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे

# मान्यवरांच्या भेटी



मा.श्री.राजीव निवतकर, आयुक्त-वैद्यकीय शिक्षण व आयुष यांच्या समवेत अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे



मा.डॉ.श्री.अजय चंदनवाले, संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या समवेत अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे

# विविध वृत्तपत्रांनी संस्थेतील कामांची घेतलेली दखल

**लोकमत**

## बेगमपुऱ्याकडून घाटीत येणारा रस्ता पोलिस बंदोबस्तात बंद करणे सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** घाटी रुग्णालयात बुधवारी पोलिस बंदोबस्तात बेगमपुऱ्याकडून येणारा रस्ता बंद करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या कामामुळे काही काळ तणावाचे वातावरण होते.

घाटी रुग्णालयात सुरक्षेच्या दृष्टीने एकच प्रवेशद्वार असावे, अशी सूचना नुकत्याच झालेल्या सुरक्षा ऑडिटच्या अहवालात नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णालय प्रशासनाने गेली घाटीत बेगमपुऱ्याकडून येणारा रस्ता बंद करण्याची तयारी केली. सोमवारी हा मार्ग बंद करण्याच्या कामाला सुरुवात झाली; परंतु काहींनी विरोध केल्याने हे काम थांबले. मात्र, बुधवारी पोलिस बंदोबस्तात हे काम सुरू करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे म्हणाले, सुरक्षा ऑडिटमध्ये रुग्णालयात एकच प्रवेशद्वार असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सदर मार्ग बंद केला जात आहे. सुरक्षेच्या दृष्टीने हे आवश्यक आहे. रुग्णसेवेच्या दृष्टीनेही ते फायद्याचे आहे. त्यामुळे हा मार्ग बंद करण्यास कोणीही विरोध करू नये, असे आवाहन आहे.



पोलिस बंदोबस्तात बुधवारी घाटीत बेगमपुऱ्याकडून येणारा रस्ता बंद करण्याचे काम सुरु झाले. यावेळी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि पोलिस अधिकारी.

Hello Chhatrapati Sambhajinagar
Page No. 5 Dec 13, 2024
Powered by: erelego.com

---

प्रचंड खपाचे एकमेव दिग्गज व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
**पुढारी**
www.pudhari.com

## घाटीचा मागील रस्ता आता बंद होणार

### पोलिस, सुरक्षा रक्षकांचा बंदोबस्त; डॉक्टर, विद्यार्थिनींच्या सुरक्षेला प्राधान्य

छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा : घाटीतील महिला डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थिनी यांच्यासह महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने एकच ट्री (प्रवेश-द्वार) असावे, असे निर्देश सुरक्षा ऑडिट रिपोर्टमध्ये देण्यात आले आहे. त्यानुसार घाटीतील मागील रस्ता कायमस्वरूपी बंद करण्याच्या कामाला बुधवारी (दि.११) अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या उपस्थित सुरुवात करण्यात आली. यावेळी पोलिस बंदोबस्त तैनात होता.

काही महिन्यांपूर्वी घाटी परिसरात निवासी महिला डॉक्टरला टवाळखोरांनी छेडछाड केल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. तसेच येथील वसतिगृहातील वैद्यकीय विद्यार्थिनींशीही छेड काढण्याचे प्रकार घडले आहेत. तसेच डॉक्टरांवर रुग्ण नातेवाइकांचा हल्ला, मारहाणीच्या घटना वारंवार घडतात. तसेच [illegible] घाटी परिसरात [illegible], ओल्या पार्ट्या रंगतात. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सुरक्षारक्षक नियुक्त आहेत. सीसीटीव्ही कॅमेरेही आहेत. मात्र घाटीचा मोठा परिसर आणि त्यात मागील खुला रस्ता यामुळे मर्यादा येतात, असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी घाटीचे सुरक्षा ऑडिट करण्यात आले होते. त्यावेळी मागील गेट बंद करावे, सुरक्षेच्या दृष्टीने एकच प्रवेशद्वार असावे, असे स्पष्ट केले होते. पोलिसांनी तशी सूचना केली होती. त्यानुसार घाटीकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र देण्यात आले होते. बुधवारी प्रत्यक्ष घाटी मागील रस्ता बंद करण्याचे काम सुरू करण्यात आले.

यावेळी विरोधाची शक्यता लक्षात घेता पोलिस बंदोबस्त तैनात होता. त्यामुळे सुरुवातीला झालेला विरोध झुगारून संरक्षण भिंत उभारण्याचे काम सुरू करण्यात आले.



अखेर घाटीच्या मागील रस्ता कायमस्वरूपी बंद करण्याचे काम पोलिस बंदोबस्तात सुरू करण्यात आले.

**सुरक्षेसाठी मागील रस्ता बंद**

येथील महिला डॉक्टर्स, वैद्यकीय विद्यार्थिनी, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने घाटीत एकच प्रवेशद्वार असावे, असा ऑडिट रिपोर्ट आणि पोलिस प्रशासनाची सूचना आहे. त्यानुसार मागील गेट बंद करण्यात येत आहे. यात कुणीही आडकाठी आणू नये, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी केले आहे.

My Chhatrapati Sambhaji Nagar Edition
Dec 12, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

---

**सामना**

## घाटीचे अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांचा वॉर्डांमध्ये 'मॉर्निंग वॉच'

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - घाटी रुग्णालयाच्या ६० वर्षांच्या आयुष्यात आज इतिहास घडला... अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी पहाटे पाच वाजता रुग्णालयातील सर्व विभागांना अचानक भेटी देऊन रुग्ण व कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या या भेटीने घाटी रुग्णालयाला खरोखर तळमळीने काम करणारा 'जागल्या अधिष्ठाता' मिळाल्याची चर्चा दिवसभर सुरू होती.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे याच महाविद्यालयात शिकलेले असून सुमारे २० वर्षांपासून याच महाविद्यालयात कर्तव्य बजावताना त्यांनी विभागप्रमुख, वैद्यकीय उपअधीक्षक, वैद्यकीय अधीक्षक, उपअधिष्ठाता, प्रभारी अधिष्ठाता पदांवर काम केल्याने त्यांना घाटी रुग्णालयातील सर्वच समस्यांची जाणीव आहे. यापूर्वीही त्यांनी कर्मचाऱ्यांची निवासस्थाने रिकामी करण्याचे धाडसी काम केले होते. त्यामुळे आताही अधिष्ठातापदाचा कार्यभार घेताच त्यांनी कामांचा धडाका सुरू केला आहे. आज सकाळीच पाच वाजता अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी घाटीतील विविध विभाग, कक्ष, ट्रॉमा विभाग, धर्मशाळा, पार्किंग, किचन, प्रसूती विभाग आदी विभागांना भेटी देऊन रुग्णसेवेचा आढावा घेतला. यात सर्व डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ, कर्मचारी, सुरक्षारक्षक त्यांना नेमून दिलेली कामे चोखपणे बजावत असल्याचे दिसून आले. बांधकाम विभागाची कामे मात्र अनेक दिवसांपासून रखडलेली दिसून आली. तसेच स्वच्छतेत आणखी खूप सुधारणा कराव्या लागतील. बाह्य परिसर व कक्षातील अनेक कामे लवकरात लवकर व्हावीत यासाठी सर्वांनी एक टीमवर्क म्हणून काम करावे लागेल, असे ते म्हणाले.

गरीब रुग्णांना योग्य उपचार मिळावेत यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले असून पदव्याळात न अडकता तळमळीने काम करणारा निधड्या छातीचा अधिकारी म्हणून त्यांची ख्याती आहे. ही त्यांची ओळख आजच्या भल्या पहाटे रुग्णांना दिलेल्या भेटीने पुन्हा अधोरेखित झाली आहे. त्यांच्या रुग्णांसाठी जागलेपणाच्या धडाक्याने कामचुकार कर्मचाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे.



Sambhajinagar Edition
Jan 16, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

# विविध वृत्तपत्रांनी संस्थेतील कामांची घेतलेली दखल

## सामना

### अनेकांचा जीव वाचविल्याचा अभिमान; यापुढेही रुग्णांची सेवा करत राहणार : सुक्रे




छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) –

राजकारणात सेवा करण्यासाठी पाच वर्ष मिळतात. मात्र, शासकीय सेवा करताना कितीही वर्ष सेवा करण्याची संधी मिळते. याच संधीचा फायदा घेत मराठवाड्याचे सुपुत्र डॉ. शिवाजी सुक्रे यांनी अधिष्ठाता पदाची पंचवार्षिक पूर्ण केली असून, दुसऱ्या टर्मला सुरुवात केली. यामध्ये सर्वसामान्यांच्या सेवेचा अनुभव कथन करताना त्यांनी अनेकांचा जीव वाचविल्याचा अभिमान असल्याचे सांगत यापुढे आरोग्यसेवेचा ध्यास सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

नंदूरबारमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातापदी डॉ. शिवाजी सुक्रे यांची १२ डिसेंबर २०१९ नियुक्ती करण्यात आली होती. रुग्णासाठी अहोरात्र काम करण्याचा आदर्श निर्माण करणारे डॉ.तात्याराव लहाने यांच्यामुळे डॉ. सुक्रे यांना संधी मिळाली. डॉ. लहाने यांनी दिलेल्या संधीचे डॉ. सुक्रे यांनी सोने करत नंदुरबार पाठोपाठ परभणी, अंबाजोगाई आणि आता छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अधिष्ठाता म्हणून काम पाहत आहेत. शिस्त आणि सकारात्मक रिझल्टचा सुक्रे पॅटर्न वैद्यकीय शिक्षण विभागात रुजविणारे डॉ. सुक्रे यांच्यावर अनेक क्षेत्रातील नागरिकांनी शुभेच्छा दिल्या.

Sambhajinagar Edition
Dec 13, 2024 Page No. 10
Powered by: erelego.com

## पुण्य नगरी

### घाटीने आरोग्य क्षेत्रात आदर्श निर्माण केला –जिल्हाधिकारी



**छत्रपती संभाजीनगर :** अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या मदतीने रुग्णसेवेमध्ये नवा अध्याय सुरू करत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने (घाटी) आरोग्यसेवेचा दर्जा उंचावला आहे. रुग्णसेवेमध्ये नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून आरोग्य क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. नेत्र विभागाला मिळालेल्या अद्ययावत यंत्रसामुग्रीमुळे हजारो रुग्णांना नवदृष्टी मिळणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

घाटी रुग्णालयाच्या नेत्र विभागाला प्राप्त अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा लोकार्पण सोहळा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते बुधवारी (दि.२७) नेत्ररोग विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडला. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे होते. मनपा आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, उपअधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा, डॉ. काशिनाथ गर्कल, वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुरेश हरबडे, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. वर्षा रोटे, डॉ. मारुती लिंगायत, डॉ. ज्योती बजाज, डॉ. सुनिल देशमुख, डॉ. सरोजिनी जाधव, डॉ. अविनाश लांब, नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना वरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. वरे यांनी उपकरणाच्या मागणीपासून ते विभागात प्राप्त होईपर्यंतचा खडतर लेखाजोखा वर्णन केला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी डोळ्यांच्या आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. नेत्र विभाग रुग्णांना याची देही याची डोळा असा अनुभव गरीब व गरजू रुग्णांना देत असल्याबद्दल घाटी रुग्णालयाच्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे त्यांनी कौतुक केले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे म्हणाले, अत्याधुनिक यंत्रसामुग्री ही रुग्णांसाठी एक पर्वनी असून त्याचा पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना देखील खूप मोठा फायदा होणार आहे. सुत्रसंचलन डॉ. शुभा घोनसीकर तर आभार डॉ. महेश सोनपेठकर यांनी मानले. यशस्वितेसाठी नेत्र विभागातील डॉ. काशिनाथ चौधरी, डॉ. तपन जक्कल, डॉ. वेणुकुमार रंग, डॉ. सोहम पाल, डॉ. अनुपमा कोकाटे यांनी परीश्रम घेतले.

Chhatrapati Smabhajinagar Edition
Nov 28, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# घाटीत ३०० रुग्णांचे वेदना निवारण

## ८० वर्षांपर्यंतच्या रुग्णांना 'पेन क्लिनिक'चा दिलासा

**म. टा. प्रतिनिधी,** छत्रपती संभाजीनगर




> नव्याने 'पेन क्लिनिक' सुरू केल्यामुळे येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे तसेच इतर विषयतज्ज्ञांचे सहकार्य मिळत आहे. लवकरच अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध होऊन नजिकच्या भविष्यात आणखी सुसज्ज पेन क्लिनिक सुरू करण्याचा प्रयत्न असेल.
>
> – डॉ. गायत्री तडवळकर, भूलशास्त्र विभागप्रमुख, घाटी

मटा विशेष

अवघ्या चार महिन्यांत घाटीतील ३०० रुग्णांवर वेदना निवारणासाठी (पेन मॅनेजमेंट) विविध उपचार प्रक्रिया झाल्या. विशेष म्हणजे या प्रकारच्या पूर्णपणे निःशुल्क उपचार प्रक्रियांचा २५ ते ८० वयोवर्षापर्यंतच्या रुग्णांनी लाभ घेतला आहे. या उपचार प्रक्रियांसाठी मूलभूत यंत्रसामग्री उपलब्ध आहेच; शिवाय नजिकच्या भविष्यात आणखी अद्यावत स्वरुपाची यंत्रसामग्री उपलब्ध होऊन उपचारांची व्याप्ती वाढेल, अशीही अपेक्षा आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (घाटी) भूलशास्त्र विभागांतर्गत गेल्या एप्रिल महिन्यात 'पेन क्लिनिक' सुरू झाले. या अंतर्गत वेगवेगळ्या आजारांमध्ये होणाऱ्या वेदनांचे निवारण करण्यासाठी निरनिराळ्या उपचार प्रक्रिया करण्यात येत आहे. याच क्लिनिकसाठी वेदना निवारण तज्ज्ञ व सहयोगी प्राध्यापक डॉ. अरविंद राजगुरे यांच्या सेवा विभागात उपलब्ध झाल्या आहेत. त्याचाच परिणाम म्हणून 'ट्रायजेमिनल न्युराल्जिआ' या व्याधीमध्ये होणाऱ्या चेहऱ्याच्या वेदना, पाठदुखी (बॅक पेन), गुडघेदुखी (नी पेन) व इतर विविध प्रकारच्या वेदनांसाठी विभागांतर्गत निरनिराळ्या उपचार प्रक्रिया केल्या जात आहेत. विशेष म्हणजे या सर्व प्रकारच्या उपचार प्रक्रिया निःशुल्क असून, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत केल्या जात आहेत. कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर या उपचार प्रक्रिया योजनेंतर्गत केल्या जातात.

# विविध वृत्तपत्रांनी संस्थेतील कामांची घेतलेली दखल

**सकाळ**

## डॉ. सुक्रे यांच्याकडे सहसंचालकांचा पदभार



डॉ. शिवाजी सुक्रे

**छत्रपती संभाजीनगर :** वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालयाचे सहसंचालक पदाचा अतिरिक्त पदभार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्याकडे सोपवण्यात आला. डॉ. संजय बिजवे हे वयोमानानुसार ३० नोव्हेंबरला सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी हा पदभार अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्याकडे सुपूर्द करावा ; तसेच पदभार स्वीकारल्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश डीएमईआरच्या आयुक्तांनी दिला, अशी माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे यांनी दिली.

Aurangabad, Aurangabad-Today
30/11/2024 Page No. 4

**सामना**

## घाटीत सुरक्षेच्या दृष्टीने एकच भव्य प्रवेशद्वार

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने वॉर्डांचा व परिसराचा कायापालट करण्याचा विडा उचलला आहे. यादरम्यान रुग्णांचे प्रमाण वाढल्याने आपोआप सुरक्षेची जबाबदारी वाढली. या पार्श्वभूमीवर मुख्य प्रवेशद्वाराचे सुशोभीकरण करण्यात येणार असून, डॉक्टर, स्टाफ आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने एकच एंट्री (प्रवेशद्वार) असावे, असे निर्देश



अत्याधुनिक पद्धतीने गेटची शोभा वाढणार

सुरक्षा ऑडिट रिपोर्टमध्ये देण्यात आले आहेत. त्यानुसार अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार केला.

नवीन विकासकामे करताना अनेकदा साहित्य चोरीला जाणे, चांगल्या कामाचे विद्रुपीकरण करणे, चोऱ्या आणि टवाळखोरांवर जरब बसविण्यासाठी सुरक्षा यंत्रणा सज्ज आहेत. मात्र, तरीही खबरदारी म्हणून एक संस्था एक गेट बसवणार आहे. यासाठी सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.

Sambhajinagar Edition
Dec 13, 2024 Page No. 8
Powered by: erelego.com

**लोकमत**

शहरात घडणार कॅन्सरमधील सुपरस्पेशालिस्ट डॉक्टर्स : उपचारात होईल वाढ, राज्यभरातील रुग्णांवर अत्याधुनिक उपचार

## 'कॅन्सर'ला ४ नवे अभ्यासक्रम, पुढील वर्षापासून १४ जागांवर प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील शासकीय कर्करोग रुग्णालयात ४ सुपरस्पेशालिटी अभ्यासक्रम सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील वर्षापासून या अभ्यासक्रमाला १४ विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. यातूनच याठिकाणी कॅन्सरमधील सुपरस्पेशालिस्ट घडतील. राज्यभरातील कॅन्सर रुग्णांसाठी हे जीवनदायी ठरेल.

घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. हेमंत कोकणकर, डॉ. अनघा वरुडकर, डॉ. सुनील देशमुख, डॉ. प्रभाकर जीरवणकर, डॉ. अर्चना राठोड, डॉ. दर्पण जक्कल, डॉ. अविनाश लांब, डॉ. अदिती लिंगायत आदी उपस्थित होते.




### या ४ नव्या अभ्यासक्रमांना पुढील वर्षीपासून प्रवेश प्रक्रिया

- एमसीएच इन गायनाकॉलॉजीकल ऑन्कोलॉजी- ४ जागा
- **डीएम इन ऑन्को पॅथॉलॉजी- ४ जागा**
- डीएम मेडिकल ऑन्कोलॉजी - ४ जागा
- **एमसीएच इन हेड नेक सर्जरी- २ जागा**

### सध्या सुरु असलेले सुपर स्पेशालिटी अभ्यासक

- डीएम इन पेडियाट्रिक ऑन्कोलॉजी-४ जागा
- **एमसीएच इन सर्जिकल ऑन्कोलॉजी-३ जागा**
- डीएम न्युनेटॉलॉजी-४

### रुग्णांना मिळणार सुपरस्पेशालिटी सेवा



घाटी रुग्णालय, शासकीय कर्करोग रुग्णालय हे मराठवाड्यासह लगतच्या जिल्ह्यांतील रुग्णांसाठी आधारवड ठरत आहे. रुग्णांना सुपरस्पेशालिटी सेवा देण्याकडे वाटचाल सुरु आहे.

- **डॉ. शिवाजी सुक्रे,** अधिष्ठाता, घाटी

### रुग्णसेवेत वाढ



रुग्णालयातील सेवेत वाढ होत आहे. सुपरस्पेशालिटी अभ्यासक्रम सुरु होत आहे. रुग्णालयातील सेवा, सुविधा वाढीसाठी वैद्यकीय शिक्षण सचिव, आयुक्त, संचालक, टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे डॉ. कैलाश शर्मा, अधिष्ठातांचे मार्गदर्शन मिळते.

- **डॉ. अरविंद गायकवाड,** विशेष कार्यअधिकारी, कर्करोग रुग्णालय.

### तज्ज्ञ डॉक्टर्स वाढतील



एमडी मेडिसिननंतर डीएम मेडिकल ऑन्कोलॉजीला प्रवेश घेता येईल. ऑन्कोलॉजीमध्ये मेडिकल ऑन्कोलॉजी ही 'मदर ब्रँच'आहे. यामुळे गुंतागुंत स्थितीतील औषधोपचार, इम्युनोथेरेपी आदी वाढतील.

- **डॉ. अनुप तोष्णीवाल,** सहयोगी प्राध्यापक, मेडिकल ऑन्कोलॉजी.

### संशोधनाला वाव मिळेल



संपूर्ण भारतात फक्त १० कॅन्सर इन्स्टिट्यूट-मध्ये एमसीएच गायनाकॉलॉजिकल ऑन्कोलॉजी हा अभ्यासक्रम सध्या सुरु आहे. स्त्रियांमधील कर्करोगाचे निदान व उपचारासाठी प्रशिक्षित डॉक्टर्स तयार होतील. स्त्रीरोग कर्करोगातील संशोधनाला वाव मिळेल. विभागात सध्या डॉ. भक्ती कल्याणकर, डॉ. नरेंद्र पाटील, डॉ. ज्योती कोटगिरे, डॉ. कनिज फातिमा कार्यरत आहेत.

- **डॉ. अर्चना राठोड,** स्त्रीकर्करोग विभागप्रमुख

### तज्ज्ञ निर्माण करणे काळाची गरज



हेड-नेक कॅन्सर ३५ टक्के आढळून येतोय. गायनिक कॅन्सरही वाढत आहे. त्यानंतर पुढाकार घेवून २०१२ मध्ये एमसीएच हेड नेक सर्जरी अभ्यासक्रम सुरु केला. पहिल्या ४ जागा टाटा मेमोरियल हॉस्पिटलला मिळाल्या. सध्या भारतात १० महाविद्यालयांत सुरु असून, २० जागा आहेत. आता त्यात छत्रपती संभाजीनगरातील ४ जागा वाढतील. यातून तज्ज्ञ निर्माण होतील.

-**कैलाश शर्मा,** शैक्षणिक अधिष्ठाता, टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई

# विविध वृत्तपत्रांनी संस्थेतील कामांची घेतलेली दखल

**सामना**

### घाटी प्रशासनाच्या पाठपुराव्याला यश
## कर्करोग रुग्णालयात सुपरस्पेशालिटी अभ्यासक्रमांना शासनाची मान्यता



छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - मराठवाड्यासह खान्देश आणि विदर्भातील कर्करोग रुग्णांचे आधारकेंद्र असलेल्या कर्करोग रुग्णालयाच्या प्रगतीत भर पडली आहे. शासकीय कर्करोग रुग्णालय अर्थात राज्य कर्करोग संस्थेत डीएम ऑन्को पॅथालॉजी, डीएम मेडिकल ऑन्कॉलॉजी आणि एमसीएच हेड-नेक सर्जरी या सुपरस्पेशालिटी अभ्यासक्रमांना मान्यता दिली. केंद्रीय कुटुंब कल्याण मंत्रालयाने तीन अतिविशेषोपचार अभ्यासक्रमांसह घाटीत एमडी रेस्पिरेटरी मेडिसिन या विषयाला मंजुरीची शिफारस राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडे (एनएमसी) केली आहे. याबाबत घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

१६५ खाटा असलेल्या कर्करोग रुग्णालयात आता दुसऱ्या टप्प्यात १०० आणि डे केअर ३५ अशा एकूण ३०० खाटांचे काम पूर्ण झाले असून, लवकरच त्या कामाचे लोकार्पण होणार आहे. यादरम्यान नवीन अभ्यासक्रमांना मान्यता दिल्याने कर्करोग रुग्णालयाच्या मान वाढला आहे. शासकीय कर्करोग रुग्णालयात डीएम-ऑन्को पॅथालॉजीच्या चार जागा, डीएम-मेडिकल ऑन्कॉलॉजीच्या चार जागा तर एमसीएच हेड-नेक सर्जरीच्या दोन जागा वाढल्याने रुग्णसेवेला बळकटी मिळणार आहे. कर्करोगातील संशोधन मुंबईनंतर आता छत्रपती संभाजीनगरातही वाढणार असून, स्पेशालिस्ट घडवण्यात राज्यात राज्य कर्करोग संस्थेचा वाटा मोठा असणार आहे, अशी माहिती कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांनी दिली. एमडी रेस्पिरेटरी मेडिसिनच्या पाच जागा वाढल्याने क्षयरोगाचे तसेच छाती आणि श्वसनविकाराच्या रुग्णांचे उपचार अधिक सुलभ होतील. शिवाय विभागही बळकट होणार आहे. डॉ. अविनाश लांब यांच्या प्रयत्नांना अखेर यश आल्याने अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी त्यांचा सत्कार केला.

महाविद्यालय परिषदेच्या सभागृहात अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी डॉ. अरविंद गायकवाड यांच्यासह डॉ. अनघा वरूडकर, डॉ. हेमंत कोकणकर, डॉ. प्रभाकर जिरवणकर, डॉ. अर्चना राठोड, डॉ. बालाजी शेवाळकर, डॉ. सुनील देशमुख, डॉ. आदिती लिंगायत यांचा सत्कार केला. तर कर्करोग रुग्णालयाकडून अधिष्ठातांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. दर्शन जक्कल, डॉ. कैलास चिंतले, डॉ. अनुप तोष्णीवाल, डॉ. तुषार मुळे, डॉ. राकेश अजमेरा, डॉ. सोमेश नीलकंठ, डॉ. वसंत पवार, डॉ. प्रमोद धनजकर, डॉ. भक्ती कल्याणकर, डॉ. नरेंद्र पाटील, डॉ. ज्योती कोटगिरे, डॉ. कनिस फातेमा यांनीही अधिष्ठातांनी सत्कार केला.

Sambhajinagar Edition
Nov 28, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

## डॉ. शिवाजी सुक्रे यांची निवड

अभिनंदन



छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांची आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली.

**पुण्य नगरी**

## घाटीत अतिविशेषोपचार घेणाऱ्या रुग्णांची पायपीट थांबणार

### ▮ बाह्यरुग्ण नोंदणी प्रक्रियेचे उद्‌घाटन



छत्रपती संभाजीनगरः शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अतिविशेषोपचार रुग्णालयात उपचार घेण्यासाठी रुग्ण, नातेवाईकांना पायपीट करावी लागायची. नोंदणी करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागायचा. आता येथे उपचार घेणाऱ्यांची ही गैरसोय दूर होणार असून अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये बाह्यरुग्ण नोंदणी सुरू करण्यात आली आहे. या नोंदणी प्रक्रियेचे उद्‌घाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते मंगळवारी (दि.५) करण्यात आले.


याप्रसंगी वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुरेश हरबडे, शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या विशेष कार्य अधिकारी डॉ. वैशाली उने (लोखंडे), डॉ. सरोजनी जाधव, डॉ. उज्वला दहिफळे, डॉ. मकरद कांजळकर, डॉ. भारत सोनवणे, डॉ. सदानंद पटवारी, छाया कपिलेश्वरी, प्रशासकीय अधिकारी महेश गावडे, डॉ. वाजेद मुगल, डॉ. विजय कल्याणकर, डॉ. चेतन टिकार, डॉ. सैफ हमीद, डॉ. अतुल लोंढे, डॉ. सचिन जंगले, डॉ. वैजयंती हरदास, डॉ. गोविंद गायकवाड उपस्थित होते. उद्‌घाटनप्रसंगी डॉ. सुक्रे म्हणाले, अतिविशेषोपचार रुग्णालयात आंतररुग्ण सेवा कार्यान्वीत करण्यासाठी येणार आहे. तसेच विविध प्रकारच्या अतिविशेषोपचाराच्या शस्त्रक्रिया देखील सुरु करण्यात येणार आहे.

**पहिल्याच दिवशी ४ रुग्णांची नोंद**

उद्‌घाटन झाल्यानंतर पहिल्याच दिवशी अति विशेषोपचार रुग्णालयात ४ बाह्यरुग्णांची नोंद झाली. यात एका रुग्णांचे २ डी इको होते. त्यांच्या नोंदणीनंतर २३० रुपये जमा झाले. ही रक्कम अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या स्वीय प्रपंचाी खात्यात जमा करण्यात येणार आहे. जमा होणाऱ्या शुल्काचा नियमानुसार रुग्णसेवेसाठी वापर करण्यात येणार आहे.

Chhatrapati Smabhajinagar Edition
Nov 06, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# मनोगत



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेत रुजू होऊन मला साधारण ३० वर्षे होत आलीत. तेव्हापासून बऱ्याच अधिष्ठातांची काम करण्याची पद्धत, तसेच सोबत काम करण्याची संधी मिळाल्यामुळे जवळून पाहता आले. दरम्यानच्या काळात संस्थेच्या प्रगतीच्या आलेखातील चढ-उताराचा मी साक्षीदार आहे.

डॉ. शिवाजी सुक्रे हे अधिष्ठाता म्हणून या संस्थेत रुजू होऊन एक वर्ष होत आहे, या एका वर्षाच्या काळात संस्थेची प्रतिमा, प्रतिभा, रुग्णसेवेत झालेले आमूलाग्र बदल हे अतिशय स्पष्टपणे जाणवतात. रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी मोफत औषधींचा मुबलक पुरवठा करून चिठ्ठीमुक्त घाटी अभियान राबवले, ज्याची दखल राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी सुद्धा घेतली. रक्ताच्या महागड्या तपासण्या, सिटी स्कॅन, एमआरआय इत्यादी तपासण्या रुग्णालयातच होत असल्याने, रुग्ण निश्चितच सुखावला आहे.

रुग्णसेवेबरोबरच उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी, डॉक्टरांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी भौतिक सुविधा निर्माण केल्या आहेत. डॉ. सुक्रे हे स्वच्छतेबाबत अतिशय शिस्तप्रिय आहेत. त्यामुळे रुग्णालय, महाविद्यालय व परिसर, गार्डन व इतर बाबी निश्चितच डोळ्यात भरण्यासारख्या झालेल्या आहेत, याची अनुभुती संस्थेला भेट देणाऱ्या अभ्यागत व नागरिक यांचेमार्फत व्यक्त झाल्याने येते व याचा साहजिकच आनंद मिळतो आणि काम करण्यासाठी ऊर्जा मिळते. हे सर्व शक्य झालेय ते फक्त डॉ. सुक्रे पॅटर्न मुळेच!

डॉ. सुक्रे यांना मी मागील २५ वर्षापासून ओळखतोय. त्यांच्यातील नेतृत्वगुण अतिशय उच्चकोटीचे आहेत. त्यांचा काम करण्याचा धडाका काहीसा वेगळाच आहे. संस्थेचा उच्च दर्जाचा विकास हा एकमेव ध्यास त्यांच्या कामातून दिसून येतो. डॉ. सुक्रे यांच्या नेतृत्वात महाविद्यालय, रुग्णालय, अतिविशेषोपचार रुग्णालय व राज्य कर्करोग रुग्णालय या संस्था महाराष्ट्रात नंबर एक झाल्याशिवाय राहणार नाहीत याचा मला विश्वास आहे.

डॉ. सुक्रे यांना पुढील कार्यास शुभेच्छा!

डॉ. काशिनाथ दा. गर्कळ, उपअधिष्ठाता (प्रशासन)
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर.
मा. कुलसचिव,
म. आ. वि. विद्यापीठ, नाशिक.

# मनोगत



आदरणीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे रुजू होऊन एक वर्ष होत आहे. या कार्यकाळात त्यांनी महाविद्यालयाला परिसस्पर्श करून अतिशय सुंदर रूप दिले आहे. हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला सर्व सुविधा मिळाव्यात, चिठ्ठीमुक्त घाटीअंतर्गत औषधांचा कायम पुरवठा असावा आणि तो कटाक्षाने पाळला जावा, यातून त्यांचा रुग्णांप्रती असणारा मातृभाव लक्षात राहतो.

पालकत्वाने प्रत्येक विद्यार्थ्याशी असणारी त्यांची आपुलकी आणि सर्व विद्यार्थ्यांना आपला खाजगी फोन नंबर देऊन त्यांच्याशी स्वतःला जोडण्याची कृती पालकांना व विद्यार्थ्यांना वाटणारा महाविद्यालयावरचा विश्वास दृढ करते. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी हा आश्वासक पितृभाव खूप मोलाचा आहे असे मला मनापासून वाटते.

मोठी संस्था असेल तर त्याला समर्थपणे वाढवणारे नेतृत्व हवे असते, डॉ.सुक्रे यांचे समस्या सोडविण्याचे कसब अत्यंत वाखाणण्याजोगे आहे. त्या विशेष कसबाला डॉ. सिराज बेग यांनी ''सुक्रे पॅटर्न'' असे नाव दिले आहे. जिथे समस्या असेल तिथे डॉ. सुक्रे तात्काळ भिडतील आणि जिथे डॉ. सुक्रे असतील तिथे समस्याच नसतील अशा अर्थाने हा ''सुक्रे पॅटर्न''आम्हाला संस्थेत काम करताना मार्गदर्शक देखील ठरतो.

आदरणीय अधिष्ठाता माननीय डॉ. सुक्रे यांचे अनेक नेतृत्वगुण हेरून शासनाने त्यांना विभागीय सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन या पदावर नियुक्त केलले आहे, त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा.

माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या कार्यकाळात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर हे वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि रुग्णसेवा यात एक वेगळे मानांकन ठरवून उत्तुंग भरारी घेईल याची मला खात्री आहे.

बालरोग विभागाचे काम करत असताना त्यांनी माझ्यावर उप-अधिष्ठाता पदाची जबाबदारी टाकताना एक नवीन संधी देऊन विश्वास दाखवला, त्याबद्दल मी त्याची अत्यंत आभारी आहे.

डॉ. प्रभा खैरे (मोरे)
उप-अधिष्ठाता (पदव्युत्तर शैक्षणिक) तथा
प्राध्यापक व विभागप्रमुख, बालरोग चिकित्साशास्त्र,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर

# मनोगत



डिसेंबर २०२३ मध्ये SCROLL.IN या एका प्रख्यात इंग्रजी मासिकाने भारतीय आरोग्य स्थिती सुधारण्यासाठी नवीन सरकारी वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येणाऱ्या अडचणींबद्दल एक लेख नोंदविला.

आदरणीय मोदी सरकारने विशेषत: ग्रामीण भागासाठी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या दुप्पट करण्यास सुरुवात केली. २०११ ते २०१९ या काळात गोंदिया, सातारा, अलिबाग, चंद्रपूर आणि बारामतीसारख्या ग्रामीण व आदिवासी भागांसाठी ११ हून अधिक वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात आली.

डिसेंबर २०१९ मध्ये नंदुरबार येथील वैद्यकीय महाविद्यालयाची परवानगी पाचव्यांदा फेटाळण्यात आली. त्यानंतर राज्य सरकार आणि वैद्यकीय क्षेत्राने या कठीण परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे यांची नेमणूक केली. प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील शरीरशास्त्र विभागाचे प्रमुख, यांना उच्च प्रवीणता आणि कार्यक्षमतेचा माणूस म्हणून पाहिले जात होते. डिसेंबर २०१९ मध्ये प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे यांनी एमसीआय तपासणी समितीने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटींकडे लक्ष देऊन मंजुरी घेतली. दोन महिन्यांच्या कालावधीत, प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या शरीररचनाशास्त्र, जीवरसायनशास्त्र आणि शरीरक्रियाशास्त्रासाठी तात्काळ ३ प्रयोगशाळा तयार केल्या आणि सर्व महत्त्वाच्या पुस्तकांनी युक्त ग्रंथालय उभारले, व्याख्यानमालेची निर्मिती केली.

२०२० मध्ये एके काळी प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते आणि ५०० किलोमीटर अंतरावर असलेल्या नंदुरबार आणि अंबाजोगाई येथील २ वैद्यकीय महाविद्यालयांच्या मंजुरीसाठी काम करत होते. ते दर आठवड्याला ये-जा करत असत आणि या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कामकाज सुरळीत व सुधारणा घडवून आणत असत. मी डॉ. अन्सारी मुक्तदीर, २०१६ पासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे अस्थिरोग विभागात सहयोगी प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहे. प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख असताना आम्ही आमच्या संस्थेत पेल्व्हिएसिटॅब्युलर कॅडेव्हर कार्यशाळा घेतली होती, जी त्या काळी एकमेव होती आणि प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे सरांच्या मदतीने आणि मार्गदर्शनाने राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा होती.

त्यांची सुट्टी आणि रविवार बहुतेक वेळा फेरफटका मारण्यात आणि विद्यार्थी, प्राध्यापक आणि रहिवाशांसमवेत वेळ घालवण्यात, त्यांच्याबरोबर नाश्ता आणि दुपारचे जेवण करण्यात व्यतीत करतात ज्यामुळे त्यांचे मनोबल वाढते. कर्मचारी, वॉर्डबॉय, नोकर आणि कामगार यांच्यसोबतही ते वेळ घालवतात. ते एक प्रामाणिक आणि विनम्र व्यक्ती आहेत. त्यांना या संस्थेच्या सर्व काना-कोपऱ्यांची माहिती आहे. मी त्यांना मध्यरात्री, पहाटे आणि रविवारी निरीक्षण करताना पाहिलं आहे. त्यांच्याकडे कोणतीही अडचण आली तरी ते त्या विषयात मनापासून गुंततात आणि त्या विशिष्ट प्रकरणाची समस्या सोडवतात.

१ वर्षापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अधिष्ठाता म्हणून कार्यरत असताना त्यांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये इतकी सुधारणा केली आहे की, एचओडी, आयएएस अधिकारी, आयपीएस अधिकारी, सनदी अधिकारी आणि कमिशनर यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे आणि त्यांच्या कार्यशैलीचे अनुसरण करण्यास सुरुवात केली आहे. या वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर १ वर्षातच त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर हे राष्ट्रीय स्तरावरील इन्स्टिट्यूट बनवले आहे. प्राध्यापक डॉ. शिवाजी सुक्रे एका लष्करी कमांडरप्रमाणे कार्य करतात आणि सर्व टीम सदस्यांना वरपासून खालीपर्यंत सामावून घेतात, संस्थेसाठी सतत काम करत असतात. ते एक आदर्श आरोग्यदुत आणि प्रभावी प्रशासक आहेत. आता त्यांच्यासोबत डेप्युटी डीन म्हणून काम करत असून, मी त्यांची लष्करी कार्यशैली शिकत आहे. आम्ही सर्वजण त्यांना अधिक यश, उज्ज्वल भविष्य, दीर्घायुष्य आणि समृद्धीसाठी शुभेच्छा देतो.

डॉ. अन्सारी मुक्तदीर
एम.एस.ऑर्थो
स्पाइन आणि जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन (फेलोशिप स्पाइन सर्जरी - स्टटगार्ट, जर्मनी)
उप-अधिष्ठाता (रुग्णालय) युनिट प्रमुख

# मनोगत



डॉ. शिवाजी सुक्रे (आमच्या बॅचचे दादा) अधिष्ठाता म्हणून दि. २० डिसेंबर, २०२३ रोजी आपल्या महाविद्यालयात रुजू झाले, मला वाटते हा दिवस म्हणजे आपल्या संस्थेचा एक Turning point आहे.

मागील एक वर्षात महाविद्यालयाचा झालेला सर्वांगीण विकास बघितलाय. या कामास फक्त अविश्वसनीय एवढेच मी म्हणेन. तसेच मागील पाच वर्षापासून अधिष्ठाता म्हणून विविध वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये देखील असेच काम त्यांनी केलेले आहे. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार, परभणी येथे सुरू करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. 24X7 उपलब्ध असलेले हे अधिष्ठाता येणाऱ्या काळामध्ये आपल्या महाविद्यालयाला उत्तुंग शिखरावर घेऊन जातील, याबद्दल माझ्या मनात तीळमात्र शंका नाही. अशा या माझ्या जवळच्या मित्रास पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.


डॉ. विनोद मुंदडा,
सहयोगी प्राध्यापक,
जन औषधवैद्यकशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर



## रुग्णालय अन् विद्यार्थीकेंद्रीत डॉ. सुक्रे पटर्न : "डॉ. शिवाजी द बॉस' :

संस्था कुठलीही असो, परिस्थिती काहीही असो, परिणाम काहिही होवो... covid काळात सुद्धा स्वतःच्या आजाराची नाही केली पर्वा तुम्ही. रुग्ण आणि विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून सहकाऱ्यांना प्रोत्साहन देत झपाटल्यागत काम करण्याचा एक पॅटर्न म्हणजे डॉ. शिवाजी सुक्रे. हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले. अनेक वर्ष सोबत एकाच महाविद्यालयात असल्याने वेगवेगळ्या कमिटी आणि समित्यांमध्ये त्यांची तळमळ, निर्णय क्षमता लगेच दिसून येते. ते मी यापूर्वीही अनुभवले होते. २० डिसेंबर २०२३ रोजी अधिष्ठाता कार्यालयात व्हीसीत होतो. तेव्हा त्यांचा पहिला फोन आला, तो नक्कीच त्यांच्या अधिष्ठाता पदाचा असेल याची जाणीव होती. मनस्वी आनंदही झाला. त्यानंतर ते रूजू झाले अन् पुन्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात सुक्रे पॅटर्न सुरू झाला. गेल्या वर्षभराचा कार्यकाळ डोळ्यासमोरून घातला तर घाटीचे रूपडे पालटल्याचे म्हणता येईल. त्यांची इच्छशक्ती, निर्णयक्षमता आणि पाठपुरावा, स्वतःची इनव्हॉलमेंट, झोकून देत काम करण्यामुळे एक वेगळी शिस्त, भीतीयुक्त आदर त्यांनी निर्माण केला. स्वतः उभे राहून स्वच्छता करून घेणे, रुग्णांना खरेच सुविधा मिळतात का, काय अडचणी आहेत, त्यासाठी रात्री बेरात्री अचानक व्हिजिट देत पाहणी करणे हा त्यांचा नित्यक्रम. त्यामुळे चतुर्थ श्रेणी कर्मचारी, परिचारिका, कार्यालयातील कर्मचाऱ्यांत एक आदरयुक्त भीती मी अनुभवतो आहे. डॉ. शिवाजी सुक्रे यांनी पदभार घेतला त्यावेळी अस्वच्छता, औषधांची ओरड, पार्किंगची ओरड होती. त्यांनी प्रामुख्याने या तिन्ही विषयांवर स्टेप बाय स्टेप काम केले. त्यामुळे आज घाटी चिठ्ठीमुक्त झाली हे म्हणताना अभिमान वाटतो. कोणती औषधे आहेत कोणती नाहीत याचा थेट डिजिटल बोर्डच लावला. त्यामुळे अजून औषधे देत नाहीत ही ओरड कायमची संपली. ओपीडीची लिफ्ट, डिजिटल बोर्ड, ओपीडी आणि अपघात विभागात भरपूर स्ट्रेचर, सर्जरी व मेडिसिन इमारतीच्या गेटवर २४ तास सुरक्षारक्षक असे प्रत्येक ठिकाणचे चित्र बदलण्याकडे त्यांनी काटेकोर लक्ष दिले. त्यामुळे स्वच्छ घाटी पाहायला मिळते. तर पार्किंगचा एक वेगळा पॅटर्न राबवल्याने शिस्तीत उभी वाहने घाटी परिसरात पाहता येतात. अधीक्षक म्हणून काम करताना अधिष्ठातांच्या दैनंदिन सूचना अधीक्षक कार्यालयाने तंतोतंत पाळून घेतल्या. त्यामुळे घाटीतील चित्र बदलून जनमानसात प्रतिमा बदलतेय हे सुखद चित्र निर्माण करण्यात आपणही खारीचा वाटा उचलू शकलो त्याचे मनस्वी समाधान वाटते. डॉ. शिवाजी सुक्रे सर याच महाविद्यालयात शिकले असल्याने परिसराची खडान्‌खडा माहिती, ग्राउंडवर काय चालले यांची थेट माहिती ते ठेवतात. वॉर्डातील काम, पथकांचे काम तसेच ओटीमधील दैनंदिन काम, एमबीबीएस, एमडी-एमएस, सुपरस्पेशालिटी अभ्यासक्रमांचे काय चालले, शैक्षणिक कामकाज सुरळीत ठेवण्यावर त्यांचा कटाक्ष असतो. त्याशिवाय कार्यालयीन शिस्तीत ते कायम आग्रही दिसतात. मात्र, रुग्णांप्रति त्यांचा मातृभावही कायम मनाला भावतो. आदर्शवत त्यांचे काम विद्यार्थ्यांसह सहयोगी शिक्षकांनाही एक प्रेरणा देते. परिस्थिती कशीही असो, संस्था कोणतीही असो तिला समर्थपणे चालवण्याची धमक त्यांच्यात आहे. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागात जिथे कमी तिथे शिवाजी सुक्रे असे एक समीकरण दिसून येते. त्यांनी नंदुरबारचे व परभणीचे नवे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वप्रमथ सुरू करून दाखवले. त्यानंतर अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कोरोनाकाळात प्रशंसनीय काम केले. शिवाय, घाटी रुग्णालयाचे अधीक्षक म्हणून त्यांनी वैद्यकीय अधीक्षक कार्यालयालाही एक उंची अन् मान मिळवून दिला तो त्यांच्या कामामुळे. देहदानापासून अवयवदानापर्यंत प्रत्येक उपक्रमात ते हिरीरीने सहभागी होतात. त्याशिवाय नव्या योजना विद्यार्थी, रुग्णांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांचा आग्रह कायम असतो. त्यामुळेच त्यांना आता सहसंचालक म्हणून अतिरिक्त कार्यभाराचा मान वैद्यकीय शिक्षण विभागाने पुन्हा दिला आहे. मी वैद्यकीय अधीक्षक म्हणून काम केले. त्यावेळी ते उपअधिष्ठाता म्हणून काम करत होते. त्यानंतर मी सर्जरी विभागाकडे दुर्लक्ष होतो म्हणून पुन्हा विभागात लक्ष देण्यासाठी विनंती केल्यावर मला पूर्वीच्या अधिष्ठातांनी कसेबसे मुक्त केले. त्यानंतर पुन्हा डॉ. शिवाजी सुक्रे अधिष्ठाता म्हणून येण्यापूर्वी अधीक्षकपदाचा कार्यभार अचानक सोपवला गेला. डॉ. शिवाजी सुक्रे हे अधिष्ठाता म्हणून परतल्यावर मला विभागात परतण्याची इच्छा मी बोलून दाखवली. मात्र, त्यांनी माझा काहीसा भार हलका करून मला सर्जरी विभागातील कामात अडचण येणार नाही याची काळजी घेऊन अधीक्षक म्हणून काम करण्यासाठी प्रेरित केले. या सर्व धावपळीत वैद्यकीय अधीक्षकपदासोबत मला शल्यचिकित्सा विभागात काम करण्याची संधी देऊन त्यांनी माझा क्लिनिकल टच ते विसरू देत नाहीत हे विशेष. डॉ. सुक्रे सरांची कामाची धडाडी पाहून मलाही कामाचा हुरूप आला. त्यात हे वर्ष कसे सरले ते कळले नाही. कार्यकाळ संपल्यावरही पुन्हा त्यांनी मला याच पदावर राहण्यास भाग पाडले आहे. सांघिक काम, प्रत्येकाला त्याच्या कामाचे श्रेय ते देतात. त्यामुळे त्यांनी घाटी रुग्णालयात नियमित कामाशिवाय काम करणाऱ्यांची एक फौज तयारी केली. ती शक्ती आज घाटी रुग्णालयाचा चेहरामोहरा बदलण्यात महत्त्वाची भूमिका निभावत घाटीसारख्या संस्थेला राज्यात नावारूपाला आणण्यात मोठे योगदान देत आहे. मी निमित्तमात्र असलो तरी यामागे करते करविते हे 'डॉ. शिवाजी द बॉस' आहेत. आपण अधिष्ठातापदाचा पदभार घेतला त्या आलेखाची वर्षपूर्ती झाली. अशा अनेक वर्षपूर्ती येवोत. त्यातून आपली आणि घाटी या मातृसंस्थेची भरभराट होवो. या सदिच्छांसह तुम्हाला पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा...

"तुमचा जीवनातील उद्देश हा तुमचा उद्देश शोधणे आणि तुमचे संपूर्ण हृदय आणि आत्मा त्यास अर्पण करणे आहे. - बुद्ध"

डॉ. सुरेश हरबडे
सहयोगी प्राध्यापक (सर्जरी विभाग)
वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

# मनोगत



डॉ. शिवाजी सुक्रे, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे (GMCH) अधिष्ठाता, हे वैद्यकीय शिक्षण व आरोग्यसेवेच्या क्षेत्रात प्रभावी कामगिरीसाठी ओळखले जातात. त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाची वैशिष्ट्ये आणि योगदान:

१. सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचा शुभारंभ:

डॉ. सुक्रे यांच्या नेतृत्वाखाली GMCH सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आंतररुग्ण विभाग (IPD) सुरू करण्यात आला आहे. या सुविधा हृदयविकार, न्यूरोलॉजी, मूत्रविज्ञान, नवजात शिशू काळजी आणि प्लास्टिक सर्जरी यासारख्या आठ प्रमुख वैद्यकीय शाखांमध्ये अद्ययावत उपचार प्रदान करतात. यामुळे अत्याधुनिक वैद्यकीय सेवा रुग्णांना उपलब्ध होत आहे.

२. दुखणे व्यवस्थापन क्लिनिक (पेन क्लिनिक):

दीर्घकालीन वेदनांचा शास्त्रीय पद्धतीने उपचार करण्यासाठी, दुखणे व्यवस्थापन क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. येथे अल्ट्रासोनोग्राफी, नर्व्ह स्टिम्युलेटर अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांच्या वेदनांचे निदान व उपचार केले जातात.

३. सामाजिक आरोग्य उपक्रम:

आरोग्य जनजागृती मोहिमा, विशेषतः अवयवदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी, डॉ. सुक्रे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे रुग्णालय आणि समाजामधील सहकार्य वाढले आहे.

४. वैद्यकीय शिक्षणाचा विकास:

शिक्षणासोबतच प्रशिक्षित डॉक्टर, नर्स आणि इतर वैद्यकीय कर्मचारी घडवण्यासाठी त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रणालीत अनेक सुधारणा केल्या आहेत.

डॉ. सुक्रे यांच्या नेतृत्वात GMCH ने उच्च दर्जाच्या आरोग्यसेवा आणि शिक्षणासाठी एक आदर्श निर्माण केला आहे.

डॉ. अब्दुला अन्सारी
वैद्यकीय उप-अधीक्षक
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

# मनोगत



## कर्मयोगी अधिष्ठाता

या स्मरणिकेमध्ये आपल्या भावना व्यक्त करताना अतिशय आनंद होत आहे. डॉ. शिवाजी सुक्रे यांनी मा. अधिष्ठाता पदाचा पदभार स्वीकारून त्यांना आज ०१ वर्ष पूर्ण झाले. सरांनी पदभार स्वीकारल्यापासून घाटी रुग्णालयाचा कायापालट होण्यास सुरुवात झाली. अतिशय वेगवान निर्णय घेणारे व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून सर लोकप्रिय आहेत. माणूस खरा आपल्या कार्याने मोठा होतो. हे सरांच्या बाबतीत तंतोतंत खरे आहे. सरांच्या या कार्यकालामध्ये सरांनी परिचारिका व सर्वांचे सर्व प्रश्न समजून घेऊन मार्गी लावायला सुरुवात केली. बरेच दिवसांपासून रखडलेले परिचारिका वसतिगृहाच्या भिंतीचे सुरक्षा गेट अतिशय कमी वेळेत पूर्ण केले. तसेच परिचारिका वसतिगृहास भेट देऊन पाहणी केली व तेथील अडचणी सोडविण्याचे तात्काळ आदेश दिले. परिचारिका संवर्गाच्या प्रत्येक कार्यक्रमास सर आवर्जून उपस्थित राहून आम्हाला मोलाचे मार्गदर्शन करतात. मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे रुग्णहिताच्या दृष्टिकोनातून केलेले चिठ्ठीमुक्त घाटी. आज सर्व प्रकारची औषधी व रुग्णसेवेसाठी लागणारे सर्व साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे रुग्ण समाधानी असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलत आहे. अनेक विभागांचे नूतनीकरणाचे काम सुरू आहे. जसे की अपघात विभाग, नर्सिंग होम, शस्त्रक्रियागृह, केएमसी वॉर्ड आदी परिसर स्वच्छता व पार्किंग नियोजन यावर देखील विशेष भर दिला आहे. तसेच रुग्णहित व रुग्णसेवा सर्वश्रेष्ठ समजून सर रुग्णालयात नियमित पाहणी करतात, रुग्णांशी संवाद साधतात व विविध अडचणी समजून घेऊन त्यावर तात्काळ कार्यवाही करतात. परिचारिका संवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी कौशल्य विकास कार्यक्रम, विविध परिषद तसेच विविध प्रकारचे प्रशिक्षण घेण्यासाठी नेहमी आमचे मनोबल वाढवून मार्गदर्शन करतात.

तसेच अतिविशेषोपचार इमारत ही मनुष्यबळाअभावी गतीहीन झाली होती, या अडचणीवर देखील मात करून खऱ्या अर्थाने गोरगरीब रुग्णांसाठी अतिविशेषोपचार इमारत सुरू करण्याचे काम सरांनी केले. या इमारतीमध्ये दिनांक ०३/१२/२०२४ रोजी पहिली हृदयशस्त्रक्रिया यशस्वी पार पडली व खऱ्या अर्थाने गोरगरीब रुग्णांना अतिविशेषोपचार मिळण्यास सुरुवात झाली. नुकतेच सरांना वैद्यकीय शि. संचालनालयाचा सहसंचालक पदाचा अतिरिक्त पदभार सरांना देण्यात आला, ही बाब घाटी रुग्णालयासाठी अभिमानास्पद आहे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते, सरांनी मा. अधिष्ठातापदाचा पदभार स्वीकारला व खऱ्या अर्थाने घाटी रुग्णालयाचे नंदनवन होण्यास सुरुवात झाली. सर आम्हाला आपल्या या प्रत्येक कार्याचा सार्थ अभिमान आहे.

आपण आम्हास दिलेल्या प्रत्येक प्रेरणेसाठी, मार्गदर्शनासाठी व सहकार्यासाठी आम्ही आपले शतश: आभारी आहोत.

श्रीमती संजीवनी गायकवाड,
अधिसेविका
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर.

# मनोगत



डॉ. शिवाजी सुक्रे, ज्या दिवसापासून यांनी डीन म्हणून चार्ज घेतला, त्या दिवसापासून संपूर्ण घाटीमध्ये एक उत्साह संचारला. त्यांच्या कामामध्ये असलेली धडाडी पदोपदी दिसू लागली.

त्यांची करडी नजर सर्व डिपार्टमेंटवर आणि त्यामध्ये असलेल्या त्रुटींवर गेली आणि अनेक डिपार्टमेंटमध्ये आमूलाग्र बदल त्यांनी घडवून आणला. हेच नव्हे मराठवाड्यातील एका महत्त्वाच्या रुग्णालयास संपूर्ण चिठ्ठीमुक्त आणि डिजिटल रुग्णालय करण्याचा मान त्यांनी आपल्या या रुग्णालयाला मिळवून दिला. अशा उत्साहमूर्तीमुळे, कामाच्या या धडाडीमुळे मराठवाड्यातील दीनदुबळ्या, गरिबांच्या या रुग्णालयाला सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचा मान त्यांनी मिळवून दिला.

याचबरोबर डॉ. सुक्रे विद्यार्थीहिताचे निर्णय घेण्यामध्ये अग्रेसर आहेत. मी मार्डचा अध्यक्ष म्हणून अनेक समस्या त्यांच्याकडे घेऊन गेलो. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन त्या मार्गी लावण्यासाठी आम्हाला भरपूर सहकार्य केले. या अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला आमच्या मार्डतर्फे पुढील कार्यासाठी शुभेच्छा. धन्यवाद.

डॉ. ऋषिकेश अनिल देशमुख
अध्यक्ष, निवासी डॉक्टरांची संघटना
२०२४-२०२५

# मनोगत



डॉ. शिवाजी सुक्रे सरांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर महाविद्यालयाचे अधिष्ठाता म्हणून रुजू झाल्याबरोबरच घाटी रुग्णालयाच्या सर्वांगीण विकासाचे शिवधनुष्य हाती घेतले. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच गेल्या वर्षभरात घाटी रुग्णालयाचे रूप पालटताना दिसून येत आहे. रुग्णांच्या हितासाठी सर नेहमीच प्रयत्नशील असतात. सरांनी रुग्णालयातील विभागात लागणारे अनेक उपकरणे तसेच विभागांचे नूतनीकरण व रुग्णालयाची स्वछता यावर नेहमीच भर दिला आहे. रुग्णांना लागणारी सर्व औषधे मोफत मिळावी यासाठी सरांनी राबवलेल्या चिठ्ठीमुक्त घाटी या उपक्रमाची दखल खुद्द राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे. सरांनी राबवलेला हा विकासाचा पॅटर्न राज्यभर 'सुक्रे पॅटर्न' म्हणून प्रसिद्ध झलेला आहे.

मार्ड संघटनेमध्ये काम करत असताना सरांची कार्यपद्धती खूप जवळून अनुभवता आली. सरांनी त्यांच्या महाविद्यालयीन काळात मार्ड संघटनेमध्ये काम केल्यामुळे निवासी डॉक्टरांच्या सर्व समस्या त्यांनी अगदी जवळून पाहिल्या आहेत व त्या समस्यांची सरांना पूर्णपणे कल्पना आहे. यामुळेच त्यांनी नेहमीच निवासी डॉक्टरांच्या समस्या सोडवण्यावर भर दिला आहे. सर ज्यावेळी महाविद्यालयात अधिष्ठाता म्हणून रुजू झाले त्याच वेळी आमची मार्ड २०२३-२४ समिती नव्याने तयार झाली. तेव्हा आमच्यासमोर निवासी डॉक्टरांचे अनेक प्रश्न व समस्या होत्या. यामध्ये निवासी डॉक्टरांचे होणारे अनियमित विद्यावेतन, वसतिगृहांची झालेली दूरावस्था तसेच निवासी डॉक्टरांची सुरक्षा यासारखे अनेक गंभीर प्रश्न उभे होते; पण सरांनी या सर्व समस्यांचा पाठपुरावा करून या समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले. यामुळेच गेल्या वर्षभरापासून निवासी डॉक्टरांचे विद्यावेतन हे नेहमी वेळेवर होत आहे, तसेच वसतिगृहांचेही नूतनीकरण व पिण्याचे पाणी यासारखे अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत.

अनेकदा मार्ड संघटनेला आपल्या मागण्यांसाठी आंदोलने करावी लागलेली आहेत; पण प्रत्येक वेळी सर आमच्यामागे खंबीरपणे उभे राहिले. त्यांनी नेहमीच आमचे प्रश्न अगदी सहानुभूतीपूर्वक हाताळले. अनेकदा डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला. अशा वेळी अगदी मध्यरात्री सुद्धा सर निवासी डॉक्टरांच्या मदतीला धावून आले. डॉक्टरांच्या सुरक्षेत झालेली वाढ तसेच निवासी डॉक्टरांसाठी वॉर्डच्या साइड रूम्स यासारख्या अनेक गोष्टींमध्ये गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. मार्ड संघटनेने केलेल्या संपाच्या वेळी सरांनी घेतलेली भूमिकाही अत्यंत वाखाणण्याजोगी होती. संपाच्या वेळी रुग्णसेवेवर कुठलाही परिणाम होऊ न देता त्यांनी डॉक्टरांच्या समस्याही वरिष्ठांपर्यंत पोहोचवल्या. यातून सरांमध्ये असलेल्या एका 'उत्तम प्रशासकाची' जाणीव सर्वांना झाली.

गेल्या वर्षभरात मार्ड संघटनेत काम करत असताना वेळोवेळी आपले मार्गदर्शन लाभले. आपल्यातील असलेले एक उत्तम प्रशासक, रुग्णसेवेप्रति आपले समर्पण तसेच एक सहृदयी व्यक्तिमत्त्व अत्यंत जवळून अनुभवता आले. अनेक अडचणींचा सामना कसा करायचा व त्यावर प्रभावीपणे मार्ग कसा काढायचा हे आपणाकडून अनुभवले, त्याचबरोबर अनेक नवीन गोष्टी मी आपणाकडून शिकलो, ज्या पुढील आयुष्यात नक्कीच मोलाच्या ठरतील. आपण वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्यासाठी मी सदैव आपला ऋणी राहीन. मी मनापासून आपले खूप खूप आभार मानतो.

- डॉ. रोहन गायकवाड
अध्यक्ष, मार्ड
२०२३-२४

# रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील अपघात विभाग म्हणजे अतिशय संवेदनशील ठिकाण. एखाद्या प्रियजनाचा झालेला अपघात असो अथवा जवळच्या व्यक्तीला आकस्मिकपणे आलेला आजार असो, रुग्णाचे नातेवाईक अत्यंत धावत-पळत अस्वस्थ रुग्णास घेऊन येण्याची जागा म्हणजे अपघात विभाग. या अपघात विभागात येणारे रुग्ण व त्यांची मानसिकता अशा अडचणीच्या वेळेला अत्यंत दोलायमान झालेली असते. वाढती लोकसंख्या व वाढते अपघात यामुळे अपघात विभागातील रुग्णसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. अशावेळी जर अपघात विभागात पुरेशा खाटा नसतील तर रुग्ण व त्यांचे नातेवाईक आक्रमक होतात व अप्रिय घटना घडतात. तसेच जर विभागात काम करायला पुरेशी जागा नसेल तर निवासी डॉक्टर्स, परिचारिका व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागतो. हे सर्व लक्षात घेऊन डॉ. शिवाजी सुक्रे यांनी अपघात विभागाच्या विस्तारीकरणाचे व नूतनीकरणाचे कार्य प्राधान्याने हाती घेतले. अपघात विभागात पूर्वी ३० खाटा होत्या. या खाटांची संख्या आता ४२ इतकी होणार आहे. तसेच अपघात विभागात सर्व अद्ययावत सुधारणा असाव्यात याकडेही त्यांचे कटाक्ष आहे. अपघात विभागावर येणारा ताण लक्षात घेऊन बाह्यरुग्ण विभाग दुपारच्या सत्रात देखील कार्यरत राहील अशा सूचना दिल्या.



मा. जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी अपघात विभागाच्या नूतनीकरणाची पाहणी करताना.





अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे डिजिटल बोर्ड उद्घाटन करताना.




बाह्यरुग्ण विभागात डिजिटल बोर्ड बसवला यामुळे सर्व रुग्णांना व त्यांच्या नातेवाइकांना कोणते डॉक्टर कोणत्या दिवशी कुठल्या विभागात उपलब्ध आहेत हे सहजरीतीने समजते.





बाह्यरुग्ण विभागात रुग्णांच्या सोयीसाठी उद्वाहकाची सोय केली. त्यामुळे ज्येष्ठ व अपंग रुग्ण तसेच त्यांचे नातेवाईक यांची सोय झाली.

महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी नवीन कार्यालयाची निर्मिती केली. सर्व पायाभूत सुविधांचा या कार्यालयात अंतर्भाव केला. योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या सर्व अडचणींचा प्राथमिकतेने निपटारा करीत जास्तीत जास्त रुग्ण या योजनेचा लाभ घेऊ शकतील यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली व त्यामुळे रुग्णनोंदणीत झपाट्याने वाढ झाली.



# चिठ्ठीमुक्त घाटी अभियान

- मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या संकल्पनेतून चिठ्ठीमुक्त घाटी अभियान राबविण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना मोफत औषधी उपलब्ध झाली आहे.
- मा. मुख्यमंत्री महोदयांनी घाटी रुग्णालयाला भेट दिली असता चिठ्ठीमुक्त अभियानाचे कौतुक केले.
- कुठल्याही रुग्णाला उपचाराविना राहावे लागणार नाही, याबाबत प्रभावीपणे उपाययोजना करण्यात येत आहे.
- डिसेंबर २०२३ पर्यंत बऱ्याच औषधीचा घाटी रुग्णालयात तुटवडा जाणवत होता व केवळ ११८ प्रकारची औषधे उपलब्ध होती.
- सदरील बाब प्रशासकीय स्तरावर गंभीरपणे घेण्यात आली.
- औषध खरेदी समितीची बैठक घेऊन त्यावर उपाययोजना करण्याकरिता मा. अधिष्ठातांनी संबंधितांना निर्देश दिले.
- औषधी उपलब्धतेमध्ये सुधारणा करण्याकरिता तातडीने पावले उचलण्यात आली.
- जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२३-२४, २१ सामुग्री व पुरवठा, MJPJAY अंतर्गत निधी उपलब्ध करून रुग्णांसाठी आवश्यक असणाऱ्या औषधे, चिकित्सालयीन विभागांच्या मागणीनुसार, बाह्य व आंतररुग्ण विभागात मुबलक प्रमाणात उपलब्ध करण्यात आली आहेत, तसेच डीपीडीसी २०२४-२५ अंतर्गत १० कोटी इतका निधी औषध खरेदीसाठी उपलब्ध करण्यात आला असून पुढील आठ ते नऊ महिने औषधांची कमतरता भासणार नाही याबाबतचे नियोजन करण्यात आले आहे.
- सद्य:स्थितीत घाटी रुग्णालयात ३३० इतक्या प्रकारची औषधे उपलब्ध आहेत.
- महत्त्वाची बाब म्हणजे सर्व प्रकारच्या जीवरक्षक औषधी (लाइफ सेविंग मेडिसिन) ची १००% उपलब्धता करण्यात आली आहे.
- काही महागडी परंतु जीवरक्षक औषधे जसे की जीबीएसच्या रुग्णांसाठी लागणारे आयव्हीआयजी, स्ट्रोकच्या रुग्णासाठी लागणारे टेनेकटेप्लेस, अतिदक्षता विभागात लागणारे ह्यूमन अल्बुमिन किंवा नवजात अर्भकांसाठी लागणारे Lung Surfactant ही औषधे विहित पद्धतीने खरेदी करून उपलब्ध करण्यात येत आहेत.
- बाह्यरुग्ण विभागामध्ये दरदिवशी येणाऱ्या २५०० पेक्षा अधिक रुग्णांना विविध प्रकारच्या औषधींचा पुरवठा नियमितपणे करण्यात येत आहे. जसे उच्च रक्तदाब, हृदयरोग, मधुमेह, मिर्गी, मानसिक रुग्ण व इतर आजारांसाठी लागणारी औषधी अखंडपणे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
- विविध शस्त्रक्रिया व अतिदक्षता विभागात लागणाऱ्या जीवरक्षक औषधीचा पुरेसा साठा उपलब्ध राहील याची दक्षता घेतली जात आहे. विविध शासकीय योजना जसे की MJPJAY, PM-JAY, JSSK या योजनेअंतर्गत तातडीने औषधी उपलब्ध करून त्याचा पुरवठा योजनेतील रुग्णांना करण्यात येत आहे, जेणेकरून कुठलाही गंभीर रुग्ण उपचाराविना राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
- रुग्णालयामध्ये श्वानदंश व सर्पदंशासाठी लागणारी जीवरक्षक औषधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.


**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे वर्षभरात वाढलेली औषधाची संख्या**

| महिना | उपलब्ध औषधींची संख्या | | |
|---|---|---|---|
| | बाह्यरुग्ण विभाग | आंतररूग्ण विभाग | एकूण संख्या |
| डिसेंबर २०२३ | ३२ | ८६ | ११८ |
| नोव्हेबर २०२४ | १०५ | २२८ | ३३३ |


**घाटी रुग्णालयात उपलब्ध असलेली महागडी परंतु जीवरक्षक औषधी**

| अ. क्र. | औषधी | रुग्णांची संख्या | औषधीचे दर प्रती नग |
|---|---|---|---|
| १ | Inj. Tenecteplase<br>पक्षाघात रुग्णांसाठी | परती महनिा ४-५ | रु. २०,००० |
| २ | Inj. IVIG<br>GBS च्या रुग्णांसाठी | प्रती महिना १० | रु. ९००० |
| ३ | Inj. Human Albumin 20%<br>आयसीसीयू मधील रुग्णांसाठी | परती महनिा १५०-२०० | रु. ६३०० |
| ४ | Inj. Lung Surfactant<br>नवजात अर्भकांसाठी | परती महनिा ४०-५० | रु. ८५०० |

**औषधी बाबींची माहे जाने. ते नोव्हें. पर्यंतची उपलब्धता**




**एक वर्षापूर्वीचा व सद्यस्थितीतील औषधीसाठा दर्शवणारा तुलनात्मक तक्ता:**



# शल्यचिकित्सा भांडार




## डॉ. शिवाजी सुक्रे सरांचे शल्यचिकित्सा साठवण व्यवस्थापनातील योगदान

मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सरांनी संस्थेतील शल्यचिकित्सा साठवण व्यवस्थापनात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. शल्य साहित्य सुरक्षितपणे साठवणे व गरजेनुसार सुलभतेने उपलब्ध करून देणे यासाठी त्यांनी सर्जिकल स्टोअरच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण केले.

सर्जिकल साहित्याच्या सुरक्षित साठवणीसाठी आधुनिक साधने, प्रगत व्यवस्थापन प्रणाली आणि सुव्यवस्थित लेआउट यांचा अवलंब करून स्टोअर अधिक कार्यक्षम व सुरक्षित करण्यात आले. यामुळे शल्यचिकित्सा साहित्याची नासधूस थांबविण्यासोबतच, वेळेवर साहित्य उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे.

डॉ.सुक्रे यांच्या या दूरदृष्टीमुळे शल्यचिकित्सा विभागाची कार्यक्षमता वाढली असून, रुग्णसेवेतील गुणवत्ता उंचावली गेली आहे. त्यांच्या या अभिनव कामगिरीने संस्था शिस्तबद्धतेसह आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने पुढे वाटचाल करत आहे.

शल्य चिकित्सा भंडारमध्ये आधी फक्त २१८ प्रकारचे साहित्य होते व सध्या ४२८ प्रकारचे साहित्य उपलब्ध झाले आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, एमबीबीएस मुलींचे वसतिगृह, पाणचक्की रोड, घाटी



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, घाटी या संस्थेस घडविण्यात अनेकांचा मोलाचा वाटा आहे. मी श्रीमती प्रभा माधवराव बेले (अधिक्षिका) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुलींचे वसतिगृह, घाटी, गेल्या ३२ वर्षापासून सेवा करत आहे. १९९३ ते २०२४ या कालावधीत किमान १४ ते १५ अधिष्ठाता या महाविद्यालयात होऊन गेले. प्रत्येकासोबत काम करण्याची संधी मिळाली; परंतु डॉ. शिवाजी सुक्रे सर येथे प्राध्यापक, विभागप्रमुख, वैद्यकीय अधीक्षक, सहाय्यक अधिष्ठाता आणि गेल्या वर्षभरापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता म्हणून रुजू झाल्यापासून वारंवार भेटी होत आहेत व प्रशासकीय कामे करण्याचा योग आलेला आहे. सर येथे विभागप्रमुख असल्यापासून मुलींच्या अडचणी सोडवण्यासाठी मला नेहमी सहकार्य करत आलेले आहेत. आता अधिष्ठाता पदावर असल्यापासून मुलींच्या वसतिगृहाच्या बऱ्याच समस्या होत्या त्या युद्धपातळीवर सोडवण्यास मदत झाली आहे. वसतिगृहाच्या अडचणी घेऊन गेल्यावर नेहमी सकारात्मक व त्वरित सोडवण्याकडे सरांचा कटाक्ष राहिलेला आहे. शिवाय ते काम कसे झाले, व्यवस्थित झाले की नाही, स्वतः येथे येऊन पाहणी करणे व वेळेत पूर्ण करणे यावर भर दिलेला आहे. वसतिगृहासाठी या वर्षात बऱ्याच जुन्या खिडक्या काढून नवीन स्लाइडिंग व काच असलेल्या, भरपूर सूर्यप्रकाश रूममध्ये येईल अशा खिडक्या जुन्या व नव्या वसतिगृहास बसवून मिळाल्या आहेत. वसतिगृहात नवीन लाईट फिटिंग करून मिळाली तसेच नवे गिझर बसवण्यात आले. नव्या व जुन्या वसतिगृहात प्रत्येक मजल्यावर मुलींसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याचे वॉटर कुलर बसविण्यात आले आहेत. आरो सिस्टीम सहित विद्यार्थिनीसाठी वॉटर कुलरचे पाणी २४ तास उपलब्ध आहे. रीडिंग हॉलमध्ये अभ्यासासाठी वातानुकुलित एसी बसवण्यात आलेला आहे. सर्व विद्यार्थिनी यांच्यासाठी वसतिगृहात अभ्यास उपयोगी वाय-फाय उपलब्ध करून दिलेले आहे. माझ्या सेवा कालावधीत कधी नव्हे एवढे कामे या एका वर्षात झालेले आहेत. वसतिगृहात स्वच्छता राहावी यासाठी स्वच्छता निरीक्षक तसेच एक क्लर्क उपलब्ध करून देऊन दैनंदिन कामासाठी सफाई कामगार उपलब्ध करून दिलेले आहेत. प्रत्येक विद्यार्थिनीकरिता वसतिगृहात प्रवेश देण्याची सोय केलेली आहे. शनिवार/रविवार सुट्टीच्या दिवशी वसतिगृहास व वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी आवर्जून भेट देण्यात येते. प्रत्येक विद्यार्थिनीसोबत सुसंवाद साधून व काही अडचणी असल्यास त्या कशा सोडवता येतील यासाठी प्रयत्न केला जातो. या सर्व बाबींची दखल घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यात येत आहेत. वसतिगृह व मुलींच्या अडचणी या कामासाठी कधीही जा, त्यांच्या कार्यात कितीही कार्यमग्न असले तरीही वसतिगृहात राहणाऱ्या मुलींच्या कामासाठी नेहमी मदत व सहकार्य मिळाले आहे. दूरध्वनी असो, एखादा मेसेज असो तात्काळ उत्तर व समस्या निवारणासाठी सतत मदत असते. प्रथम वर्ष प्रवेशाच्या वेळी अनेक पालक वसतिगृहास भेट देण्यासाठी प्रथम येतात व वसतिगृह पाहतात तेव्हा येथील वातावरण, शांतता, सुरक्षितता, सोयीसुविधा, स्वच्छता, निसर्गरम्य वातावरण व रोड ओलांडून समोर महाविद्यालय पाहून असे सांगतात, मॅडम आम्हाला येथेच रिटेन्शन भरून द्यावयाचे आहे. आम्हाला पुणे, मुंबई नंबर लागला तरी नको. वसतिगृह पाहून प्रभावित होतात. या सर्व बाबींचे सर्व श्रेय डॉ. शिवाजी सुक्रे सर अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना जाते. या २०२३-२४ शैक्षणिक वर्षामध्ये सरांनी वसतिगृहाचा आतून-बाहेरून संपूर्ण कायापालट केलेला आहे. सभोवतीचा परिसर नेहमी नीटनेटका, मेससाठी स्वतंत्र मोठा हॉल, मुलींच्या गाड्यांसाठी पार्किंग, अशी खूप कामे या वर्षात झाली. मुलींसाठी मागील गेट उघडे केले तसेच आतील स्पेस गट्टू बसवून स्वच्छ करून मिळाला आहे. एका वर्षात सरांच्या सहकार्याने मुलींच्या वसतिगृहाचे रंग-रूप बदलले आहे. वसतिगृहात राहणाऱ्या सर्व विद्यार्थिनी अतिशय आनंदाने व समाधानाने अधिकाधिक कालावधी रूमवर असतात. तसेच अभ्यासिकेत असतात. सर्व सुविधायुक्त वसतिगृह मुलींसाठी आहे. विद्यार्थी हेच दैवत समजून त्यांच्या सोयीसुविधेसाठी सतत अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांची मदत असते. एखाद्या संस्थेच्या नावलौकिकाची उंची केवळ तेथील इमारत पाहून नव्हे तर तेथे काम करणारे व्यक्ती किती वेळ देतात, त्याग, सचोटी, सतत मेहनत, कार्याची कसोटी, उदारता, उच्च विचार, समर्पण इत्यादी गुणांवर त्या संस्थेचा नावलौकिक असतो. त्यापैकी सर्वगुणसंपन्न अधिष्ठाता, कुशल प्रशासक व व्हिजन असलेले अधिष्ठाता म्हणजे डॉ. शिवाजी सुक्रे सर आहेत. केवळ वसतिगृहच नव्हे तर संपूर्ण विद्यार्थी, यूजी असो, पीजी असो, नर्सिंग असो, इतर विभागाचे विद्यार्थी असो, तसेच सर्व स्टाफ, सर्व सहकारी डॉक्टर्स, सर्व रुग्ण, संस्थेला भेटी देणारे सर्व पदाधिकारी, अधिकारी, या सर्वांना सोबत घेऊन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगरचा नावलौकिक आहे. मराठवाड्यातील एक अग्रगण्य महाविद्यालय म्हणजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर आहे. इंग्रजी भाषेत एक म्हण आहे Great Men Never Show Their Deed. त्यापैकीच एक अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर आहेत. या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगरचा सतत नावलौकिक वाढत राहो ही मनापासून सदिच्छा.

श्रीमती प्रभा बेले
अधिक्षिका, मुलींचे वसतिगृह



वसतिगृहातील विद्यार्थिनींशी सांस्कृतिक कार्यक्रमात सुसंवाद साधताना अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे



वातानुकुलित वाचन कक्ष

# वेदनाशमन विभाग Pain Clinic

वेदना शमन/निवारण ही आधुनिक वैद्यकशास्त्राची अत्याधुनिक शाखा आहे. वेदना ही रोगाचे लक्षण असते असं आपण समजतो. काही अंशी ते योग्य देखिल आहे; पण हे केवळ कमी कालावधीच्या वेदना (३ महिन्यांपेक्षा कमी) साठी; जेव्हा वेदना या जुनाट रूप घेतात तेव्हा त्या केवळ रोगाचे लक्षण मानणे ही एक गंभीर चुक ठरू शकते. वेदना जेव्हा जुनी म्हणजे ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची असते तेव्हा ती केवळ एक लक्षण न राहता एक आजाराचं रूप धारण करते. आणि म्हणूनच साध्या वेदनाशामक गोळ्या औषधींनी तिचे निवारण करणे योग्य ठरत नाही. जुनाट वेदनांकरिता (उदा. चेहऱ्यावरील वेदना, ट्रायजेमिनल न्यूरालजिया, मणक्याच्या वेदना, गुडघेदुखी, सांधेवात, कर्करोग) नियमित वापरात येणारी वेदनाशामक (Pain killer) औषधी वापरणे असंयुक्तिक ठरते व शास्त्रीयदृष्ट्या योग्य नाही. आधुनिक वेदनाशामक उपचार पद्धतीमध्ये रिजनरेशन थेरेपी म्हणजे प्लेटलेट रिच प्लाज्मा, ओझोन थेरेपी, पोलोझोनथेरेपी, जेनीकुलर ब्लॉक किंवा रेडिओफ्रिक्वेन्सी अॅब्लेशन या प्रक्रिया केल्यास रुग्णास चांगला आराम मिळतो. या प्रक्रिया वेदना शमन क्लिनिक म्हणजे पेन मॅनेजमेंट सेंटर येथे उपलब्ध आहेत. या सर्व उपचारपद्धती डे केयर तत्त्वावर करता येतात. घाटी रुग्णालयात प्रथमच ट्रायजेमिनल न्यूरलजिया या दुर्धर आजारावर रेडिओफ्रिक्वेन्सी अॅब्लेशनचे उपचार करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील कोणत्याही शासकीय महाविद्यालयातील अशा प्रकारची ही पहिलीच वेळ असावी. घाटी रुग्णालयातील अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी पेन क्लिनिकची गरज लक्षात घेता ही सुविधा आपल्या रुग्णालयामध्ये अत्यंत आवश्यक असल्याच्या जाणिवेतून पेन क्लिनिकची सुरुवात केली. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांची दूरदृष्टी व सतत रुग्णभिमुख सेवा देण्याच्या स्वभावामुळे नवीनच सुरू झालेल्या pain clinic ला रुग्ण भरभरून प्रतिसाद देत आहेत. सद्य:स्थितीत ही सेवा सोमवार व गुरुवार दुपारी ३ ते सायं. ५ वाजेपर्यंत ओपीडी क्र. १४३ मध्ये सुरू करण्यात आलेली आहे. सध्या दैनंदिन १० ते १५ रुग्ण ओपीडीमध्ये या सेवेचा लाभ घेतात. आजतागायत ४०० रुग्णांनी ओपीडीमध्ये या सेवेचा लाभ घेतला आहे. या ठिकाणी विविध प्रकारच्या हस्तक्षेपात्मक वेदना व्यवस्थापन (Inter ventional pain Management) प्रक्रिया करण्यात येतात. अद्यापपर्यंत ३० रुग्णांनी या हस्तक्षेपात्मक वेदना व्यवस्थापन प्रक्रियेचा लाभ घेतला आहे. या सर्व प्रकिया शस्त्रक्रियागृहात होतात. शासकीय सुटीमुळे सोमवारी व गुरुवारी ओ.पी.डी. बंद असल्यास याचा फटका रुग्णांना बसू नये म्हणून अधिष्ठाता यांनी यापुढे अशा सुट्ट्या आल्या तरी दुसऱ्या दिवशी पेन ओ.पी.डी. सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सध्या सुरू केलेल्या पेन क्लिनिकच्या रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतरण करण्याचा मानस ठेवून, त्यासाठी त्या सदैव प्रयत्नशील राहण्याचा सल्ला अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दिला आहे. याकरिता आवश्यक ती यंत्रसामुग्री तातडीने पुरवण्याची हमी मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दिली आहे. अधिकाधिक गरजू रुग्णांना या सेवेचा लाभ घेता यावा याकरिता आवश्यक ते सर्व प्रयत्न मा. अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागामध्ये करण्याचा मानस वेदनाशमन विभाग सांभाळत असणारे वेदना निवारण तज्ज्ञ डॉ. अरविंद राजगुरे यांचा आहे. आजतागायत या पेन क्लिनिकचा लाभ घेणाऱ्या सर्व रुग्णांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिलेली आहे.



वेदनाशमन क्लिनिकचे उद्घाटन करताना मा.श्री. शिवाजी सुक्रे

# संस्थेत वर्षभरात केलेले सुशोभीकरण






डॉ. शिवाजी सुक्रे यांनी अधिष्ठातापदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशस्त वास्तूच्या सभोवतालच्या परिसराचे सुशोभीकरण करण्यास सुरुवात केली. या भव्य वास्तूचे प्रवेशद्वारही तेवढेच भव्य व संरक्षक असावे म्हणून त्यांनी प्रवेशद्वाराच्या सुशोभीकरणाचे कार्य हाती घेतले.





रुग्णालयातील वाहनतळाचा प्रश्न सोडवला.







या प्रतिष्ठित महाविद्यालयात २०० पदवीपूर्व व २५० पदव्युत्तर विद्यार्थी दरवर्षी प्रवेश घेतात. अनेक सन्माननीय अध्यापक त्यांना ज्ञानार्जन करतात, ज्ञानार्जनाची ही प्रक्रिया अधिक सुखकारक व्हावी म्हणून त्यांनी परिसरातील उद्यानाच्या संवर्धनाचे कार्य हाती घेतले. महाविद्यालयाची मुख्य इमारत, क्ष-किरण विभाग, बाह्यरुग्ण विभाग येथील उद्यानाच्या संवर्धनाचे काम सुरू असतानाच बजाज अध्यापन संकुलाचा मागील जागेत गुलाबाच्या फुलांचा एक सुंदर ताटवा त्यांनी उभा केला.

# बजाज अध्यापन संकुल







बजाज ऑटो लिमिटेड यांनी १२ कोटी रुपये देणगी स्वरूपात खर्च करून १००० आसनाचे बजाज अध्यापन संकुल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांना हस्तांतरीत केले. याप्रसंगी बजाज ऑटो लिमिटेडचे अध्यक्ष श्री. नीरज बजाज, श्रीमती शैफाली बजाज, माजी अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर तसेच बजाज रुग्णालयचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. चंद्रप्रकाश त्रिपाठी हे उपस्थित होते.

# Medical Education Unit

Medical Education Unit हा कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयाचा आत्मा असतो. मा. अधिष्ठाता, डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या कारकीर्दीमध्ये संस्थेच्या MEU मध्ये अत्यंत भरीव कामगिरी झालेली आहे. MEU ने संस्थेतील अध्यापकांसाठी Faculty Development चे तीन महत्त्वाचे Workshops घेतले. MEU उपक्रमांमध्ये पदव्युत्तर विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घेण्यात आले. निवासी डॉक्टरांसाठी Resident As Teacher Workshop घेण्यात आले. तसेच मा. अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत मान्यवर व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. जसे की, Dying with Dignity या विषयावरील उपक्रमासाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे डॉ. रूपकुमार गुरुसहानी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी देखील विविध उपक्रम राबविण्यात आले.



CISP, सप्टेंबर 2024



दर महिन्याला होणाऱ्या clinical meetings





मेडीकल एज्युकेशन युनिटच्या कार्यशाळेत अधिष्ठाता विद्यार्थी म्हणून

# ग्रंथालय
## Library











सरांना या संस्थेत अधिष्ठाता म्हणून एक वर्ष पूर्ण होत आहे त्याबद्दल सर्वप्रथम सरांचे मनापासून अभिनंदन. ज्या संस्थेत शिक्षण घेतले त्याच संस्थेत सर्वोच्च पदापर्यंत पोहोचून काम करण्याचा जो आनंद आहे तो आपल्याइतका क्वचितच लोकांना अनुभवता येत असेल. यातच मानाचा तुरा म्हणजे आपणास सहाय्यक संचालक या पदाचाही कार्यभार मिळाला आहे. यातून आपण आपल्या नजरेतून जो संस्थेचा विकास करण्याचा ध्यास घेतला आहे तो पूर्णत्वास जावो हिच सदिच्छा. ग्रंथालयाच्या बाबतीत झालेल्या सुधारणा सांगायचे झाल्यास सर्वप्रथम सरांनी Knimbus हा Online journal Mm database खरेदी करण्यासाठी परवानगी दिली. दुसरे म्हणजे ग्रंथालयात WI-FI ची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तीन नवीन इंटरनेटचे वार्षिक प्लॅन असणारे कनेक्शन घेऊन दिले. तिसरे म्हणजे ग्रंथालयात शांत वाटावे व विद्यार्थ्यांचे मन रमावे यासाठी नवीन कलर करून दिला, तसेच गड्डू बसवून दिले. सरांनी चौथे उल्लेखनीय काम करून दिले ते म्हणजे UG च्या Out-Side Reading Hall मध्ये वातानुकुलित यंत्र बसवून दिले. पाचवे व विद्यार्थीहिताचे काम सरांनी करून दिले ते म्हणजे ग्रंथालयाला असणाऱ्या वॉल कंपाउंडला सुरक्षाजाळीचे काम. सरांचे सहावे कार्य म्हणजे ग्रंथालय येथून महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यात पायऱ्या व रेलिंग बसवून दिले. सातवे व अतिशय महत्त्वाचे कार्य म्हणजे मागील तीन वर्षांपासून खरेदी केलेल्या पुस्तकांचे, जर्नलचे देयके सरांनी संबंधितांना तात्काळ अदा करवून दिले. ग्रंथालयासाठी अभिमानाचे असणारे सरांचे आठवे कार्य म्हणजे जवळपास १३०० पुस्तकांची पहिल्यांदा एकत्रित खरेदी सरांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी करून दिली. वरील सर्व बाबींची पूर्तता सरांनी प्रशासक म्हणून तर केलीच; पण आणखी उल्लेखनीय बाब म्हणजे आमचे एक सहकारी ज्यांच्या भावाची तब्येत अचानक बिघडली त्यांना सरांनी सर्वतोपारी वैयक्तिक लक्ष घालून मदत केली. अशा सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या नेतृत्वाला आणखी उंच शिखरे पादाक्रांता करायची असतात, त्या शिखरावर पोहोचून सरांनी आम्हाला पुढील कामे करण्यास आदेशीत करावे, याकरिता सरांना मनापासून शुभेच्छा...

ग्रंथपाल
डॉ. संतोष शेळके

# शरीररचनाशास्त्र विभाग
## Anatomy Department

उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः !

अर्थात, फक्त इच्छा केल्याने कोणत्याही व्यक्तीची मनोरथे पूर्ण होत नाहीत, तर त्यासाठी मेहनतही करावी लागते. या उक्तीप्रमाणेच डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या अथक परिश्रमातून साकारलेली शरीररचनाशास्त्र विभागातील कौशल्य प्रयोगशाळा म्हणजेच Skill Lab.

सराव माणसाला परिपूर्ण बनवतो, या विचाराला अनुसरून कौशल्य प्राप्त करण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत कौशल्य प्रयोगशाळेची (Skill Lab) उभारणी मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या पुढाकाराने दि. १९ एप्रिल २०२४ रोजी करण्यात आली. स्किल लॅबमध्ये विविध स्किल स्टेशन्स् आणि लेबर रूमचा समावेश आहे. जिथे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण, मॅनिक्विन्स, सिम्युलेशन एक्सरसाईझ, प्रात्यक्षिके, व्हिडिओ आणि प्रेझेन्टेशन्सवर सराव करून मूलभूत कौशल्ये शिकतात.

कृत्रिम मानवी शरीर (मॅनिक्विन्स) - कौशल्य प्रयोगशाळेत सध्या २० रबराचे कृत्रिम शरीर आहेत. खऱ्या रुग्णांवर होणाऱ्या शस्त्रक्रिया, तपासण्या, प्रसुती आदिचा सराव करणे शक्य होते. तसेच इलेक्ट्रॉनिक संयंत्रकाच्या साहाय्याने कृत्रिम शरीरातील काही आजार, त्यांची लक्षणे तसेच काही क्रिया दाखवून त्याआधारे विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाते. देहदानाविषयी जनजागृती वाढविण्यासाठी मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शरीररचनाशास्त्र विभागाने देहदानपर व्याख्याने घेतली तसेच प्रसार माध्यमांचा उपयोग करून रेडिओवर पण माहिती पुरविली.









आदरणीय डीन डॉ. शिवाजी सुकरे सर, यांनी GMC संभाजीनगर संस्थेत अवघ्या एका वर्षाच्या कमी कालावधीत उत्तुंग यशाचा आणि वैद्यकीय समृद्धीचा टप्पा गाठला आहे.

या संस्थेचे डीन म्हणून एक वर्ष पूर्ण करताना त्यांनी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आणि रुग्णांसाठी आवश्यक असणारी वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यासाठी वेळोवेळी पुढाकार घेतला आहे.

सरांच्या या अथक प्रयत्नांमुळे चिठ्ठीमुक्त अभियान आणि संध्याकाळची ओपीडी सेवा यांसारख्या आरोग्य सेवा प्रणालीमध्ये गंभीर बदल घडून आले.

तसेच त्यांनी महाविद्यालयात विभागीय नूतनीकरण आणि शैक्षणिक सुविधांमध्ये सुधारणा केली.

त्यांच्या या दूरदर्शी दृष्टीकोनाचा स्थानिक स्तरापासून ते मंत्रालय स्तरावर सर्वांनी कौतुक केले आहे.

भविष्यात ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था नक्कीच नवीन उंची गाठत राहील व प्रत्येकाला उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देईल अशी आशा मी करते.

अर्चना कल्याणकर
प्राध्यापक व विभागप्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

# शरीरक्रियाशास्त्र विभाग
## Physiology Department





अवयवदान वक्तृत्व घोषवाक्य स्पर्धा



हिमॅटॉलॉजी प्रयोगशाळेचे नूतनीकरण



अधिष्ठातांचे व्याख्यान MBBS बॅच २०२४ (Dean's Address MBBS Batch 2024)



मा. अधिष्ठाता, डॉ. शिवाजी सुक्रे सर दि. २० डिसेंबर २०२३ ला या संस्थेत अधिष्ठाता पदावर रुजू झाले. लवकरच सरांचा या संस्थेत अधिष्ठाता म्हणून एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण होत आहे. या अल्पशा कालावधीत सरांनी आपल्या संस्थेत रुग्णसेवा आणि विद्यार्थी हिताकरिता अनेक आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. प्री-क्लिनिकल विभागाची प्राध्यापक व विभागप्रमुख, तसेच ॲन्टीरॅगिंग कमिटीची अध्यक्ष म्हणून गेल्या वर्षात मी अशी दोन उदाहरणे पाहिली आहेत की ज्यामध्ये सराच्या प्रशासकीय निर्णयक्षमतेचा आम्हाला प्रत्यय आला. रॅगिंग प्रकरणी सरांनी विद्यार्थ्यांना एका सत्रासाठी परीक्षेस बसू दिले नाही. तसेच त्यांना वसतिगृहातून निलंबित करून रु. २५०००/- दंड आकारण्यात आला.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती व शिस्तशीरपणा सुधारला आहे. सरांमुळे मला झालेला वैयक्तिक फायदा म्हणजे माझ्या विभागातील हिमॅटॉलाजीची प्रयोगशाळा नूतनीकरण करण्याची आवश्यता होती. ती केवळ सरांच्या सहकार्यामुळे. सद्य:स्थितीत अत्याधुनिक उपकरणे व यंत्रसामुग्रीने अद्यायावत करून देण्यात आली आहे. त्याचा फायदा प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांना होणार आहे. या वर्षामध्ये सरांनी आमच्या विभागाला खूप वर्षापासून असणारी मागणी जसे की यंत्रसामुग्री, काचसामान, रसायने आणि फर्निचर इत्यादी पूर्ण केली आहे.

मी व माझ्या विभागातील अधिकारी व कर्मचारी, वेळोवेळी सरांनी आम्हाला व आमच्या विभागाला केलेल्या सहकार्याकरिता आभारी असून कायम सरांचे ऋणी राहू. भविष्यातही असेच सहकार्य आम्हाला लाभेल ही आशा करते.

धन्यावाद.

डॉ. शेख अफ्रोज
प्राध्यापक व विभागप्रमुख,
शरीरक्रियाशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# जीवरसायनशास्त्र विभाग
## Biochemistry Department



### यत्र विज्ञान तत्र प्रगति:

जिथे विज्ञान तिथे प्रगती निश्चित आहे, असा विश्वास संस्कृत भाषेतील या सुभाषितातून व्यक्त होतो.

मानवी उत्क्रांतीच्या प्रवासात विज्ञान आणि त्या आधारे विकसित झालेले तंत्रज्ञान ही प्रमुख साधने ठरली.

विज्ञानातून घडलेल्या नवनवीन आविष्कारांचे रुग्णसेवेत, वैद्यकीय शिक्षणात आणि संशोधनात असलेले महत्त्व जाणून घेऊन माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी जीवरसायनशास्त्र विभागात ए.बी.जी. मशीन हे उपकरण आणले.

ए.बी.जी. मशीनद्वारे अतिदक्षता विभागातील गंभीर रुग्णांच्या उपचारांची दिशा ठरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची व उपयुक्त चाचणी केली जाते.

रुग्णसेवेसाठी आवश्यक असणाऱ्या अत्यावश्यक चाचण्यांसाठी इतर अनेक किट्स व साधने मिळाली. जीवरसायनशास्त्र विभागाच्या मध्यवर्ती चिकित्सालयीन प्रयोगशाळेत पूर्वी सरासरी रोज ३००० चाचण्या व्हायच्या. आता नवीन सुरू झालेल्या चाचण्या व किट्सचा नियमित पुरवठा यामुळे दररोज सरासरी ३८०० चाचण्या होत आहेत.

विशेष म्हणजे थायरॉईड चाचण्या रोज केल्या जातात. सगळ्या प्रसुतीपूर्व, प्रसुतीपश्चात व स्तनदा मातांचे थायरॉईड प्रोफाईल या वर्षीपासून घाटीतच केले जात आहे. २०२४ मध्ये आतापर्यंत १७७५४ थायरॉईड चाचण्या केल्या आहेत.





अधिष्ठातांची प्रयोगशाळा भेट

जीवरसायनशास्त्र विभागाच्या मध्यवर्ती चिकित्सालयीन प्रयोगशाळेत पूर्वी सरासरी रोज ३००० चाचण्या व्हायच्या. आता नवीन सुरू झालेल्या चाचण्या व किट्सचा नियमित पुरवठा यामुळे दररोज सरासरी ३८०० चाचण्या होत आहेत.

विशेष म्हणजे थायरॉईड चाचण्या रोज केल्या जातात. सगळ्या प्रसुतीपूर्व, प्रसुतीपश्चात व स्तनदा मातांचे थायरॉईड प्रोफाईल या वर्षीपासून घाटीतच केले जात आहे. २०२४ मध्ये आतापर्यंत १७७५४ थायरॉईड चाचण्या केल्या आहेत.

## २०२३-२०२४ रक्त चाचण्यांचा तुलनात्मक तक्ता

| SR NO | MONTH | 2023 | 2024 | INCREASED INVESTIGATIOS |
|---|---|---|---|---|
| 01 | JANUARY | 97105 | 121498 | 24393 |
| 02 | FEBRUARY | 92460 | 120318 | 27858 |
| 03 | MARCH | 97299 | 101740 | 4441 |
| 04 | APRIL | 89510 | 98132 | 8622 |
| 05 | MAY | 99424 | 110506 | 11082 |
| 06 | JUNE | 95115 | 113023 | 17908 |
| 07 | JULY | 98454 | 119199 | 20745 |
| 08 | AUGUST | 97853 | 127975 | 30122 |
| 09 | SEPTEMBER | 94611 | 135560 | 40949 |
| 10 | OCTOBER | 104699 | 127119 | 22420 |
| 11 | NOVEMBER | 111644 | 115333 | 3689 |
| | TOTAL | 1078178 | 1290403 | 212223 |



# घाटीमध्ये 'एबीजी' चाचणी सुरू

**अतिदक्षता रुग्णांना होणार लाभ**

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

'आयसीयू', 'एमआयसीयू', 'टीआयसीयू', 'एनआयसीयू' रुग्णांसाठी आवश्यक असलेल्या 'आर्टेरियल ब्लड गॅस ॲनालिसिस' (एबीजी) चाचणीला अखेर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) मुहूर्त लागला. या चाचण्यांसाठी लागणारे उपकरण घाटीत अलीकडेच उपलब्ध झाले होते व 'रिएजंट्स' उपलब्ध होताच अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते उपकरणाचे उद्घाटन झाले व चाचण्यांना एकदाचा प्रारंभ झाला.

घाटीतील बाह्य रुग्ण विभागाच्या इमारतीमध्ये कक्ष क्रमांक १२७ येथे असलेल्या मध्यवर्ती चिकित्सालयीन प्रयोगशाळेत (सीसीएल) ही चाचणी

> एबीजी चाचणीसाठी लागणारे सर्व प्रकारचे वैद्यकीय साहित्य उपलब्ध झाले असून, चाचणीतील अडथळे दूर झाले आहेत. त्यामुळे ज्या ज्या रुग्णांना या चाचणीची गरज असेल त्या सर्वांच्या चाचण्या आता घाटीत होतील.
>
> – डॉ. शिल्पा आसेगावकर, जीवरसायनशास्त्र विभागप्रमुख, घाटी

एबीजी चाचण्यांसाठी लागणारे मशीन घाटीत कार्यरत झाले आहे.

मटा इम्पॅक्ट

होणार आहे. शॉकमध्ये गेलेल्या तसेच गंभीर व अतिदक्षता विभागात दाखल असलेल्या रुग्णांच्या रक्तातील ऑक्सिजन व कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण व समतोल, तसेच रक्तातील 'ॲसिड बेस बॅलेन्स' लक्षात घेण्यासह इतरही बाबी स्पष्ट होण्यासाठी ही चाचणी महत्त्वाची मानली जाते. मात्र या चाचणीची सोय अनेक दिवसांपासून घाटीत नव्हती. त्यामुळे रुग्णहितासाठी ही चाचणी लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी होत होती. दरम्यान, या चाचणीसाठी लागणारे उपकरण अलीकडेच उपलब्ध झाले होते; परंतु चाचणीसाठी लागणारे रिएजंट्स उपलब्ध होणे बाकी होते. या संदर्भात जीवरसायनशास्त्र विभागाच्या तत्कालिन विभागप्रमुख डॉ. विना गढिया यांच्याकडून पाठपुरावा सुरू होता. या विषयाकडे 'मटा'ने २२ डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तामधून लक्ष वेधले होते. या वृत्ताची घाटी प्रशासनाने तातडीने दखल घेत लवकरात लवकर चाचणी सुरू होण्याच्या दृष्टीने हालचालींना वेग आला आणि त्याचाच परिणाम म्हणून रिएजंट्स उपलब्ध होताच अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांच्या हस्ते उपकरणाचे उद्घाटन झाले.



आदरणीय अधिष्ठाता डॉ. सुक्रे सर, आपल्या कार्यकाळात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व घाटी रुग्णालयाचा खरोखरच आमूलाग्र बदल झालेला आहे. आपली कार्यशैली, कामाविषयीची तळमळ आणि सहकाऱ्यांना घेऊन पुढे जाण्याची वृत्ती यामुळे संस्थेने एक उच्च स्तर गाठला आहे. आमच्या विभागात तर अनेक चांगले बदल घडताना दिसत आहेत. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या CCL च्या एकत्रीकरणासह, काही रूटिन चाचण्या नव्याने सुरू करणे, थायरॉईडची चाचणी दररोज करून त्वरित अहवाल देणे यासारख्या सुधारणा आपल्या पाठबळामुळे शक्य झाल्या आहेत. मनुष्यबळाचा योग्य वापर करण्याबाबत तुमचं मार्गदर्शन उपयुक्त ठरते. विशेषतः १५ ऑगस्टला आपण वर्ग तीन आणि वर्ग चार कर्मचाऱ्यांचा सत्कार केला, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि संस्थेविषयी त्यांची तळमळ अधिक दृढ झाली. CCL मध्ये २४ तास पिण्याचे पाणी, कपाटे, खुर्च्या यासारख्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत. आम्ही लेक्चरर असताना वर्षानुवर्षे कपाट नसल्याने पुस्तकं व पर्स खांद्यावर घेऊन फिरत असायचो; परंतु आता केवळ अध्यापकांनाच नव्हे, तर सर्व कर्मचारी आणि रेसिडेंट्सना स्वतंत्र फर्निचर मिळाले आहे. किट्ससाठी बजेट नाही म्हणून आम्ही पूर्वी जैसे थे परिस्थितीत राहायचो; पण आपण आल्यापासून आमच्या टेस्ट मेन्यूमध्ये व चाचण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली, ज्यामुळे रुग्णसेवेत आमचेही योगदान असल्याचे समाधान मिळाले. विद्यार्थ्यांसाठी आपण अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या वर्षीच्या नवीन बॅचच्या विद्यार्थ्यांना तर आपण स्वतःचा वैयक्तिक फोन नंबर दिला, ज्यामुळे त्यांच्यात आणि त्यांच्या पालकांमध्ये एक विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. माझ्या मैत्रिणीच्या मुलीने तर तिसऱ्या फेरीत छत्रपती संभाजीनगरच्या वरचे बाकी प्रेफरन्स रद्द करून आपल्याच महाविद्यालयात प्रवेश निश्चित केला. यातून तुमच्या कामाबद्दल खराखुरा चांगला सकारात्मक अभिप्राय मिळतो. आपल्या नेतृत्वात संस्था अधिकाधिक भरीव कामगिरी करेल आणि महाराष्ट्रातील क्रमांक एकचे वैद्यकीय महाविद्यालय ठरेल, असा विश्वास आहे. आपल्या कार्यासाठी मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!

डॉ. शिल्पा आसेगावकर
प्राध्यापक व विभागप्रमुख, जीवरसायनशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

# औषधशास्त्र विभाग

## Pharmacology Department






मा. अधिष्ठाता, डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर फार्मकोविजिलन्स (Pharmacovigilance) कार्यक्रमाचे उद्घाटन करताना.



मा. अधिष्ठाता, डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर फार्मकोविजिलन्स (Pharmacovigilance) कार्यक्रमामध्ये भितीपत्रकांचे निरीक्षण करताना.




मा. अधिष्ठाता, डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर फार्मकोविजिलन्स (Pharmacovigilance) कार्यक्रम साजरा करताना समितीचे सदस्य आणि नर्सिंग विद्यार्थ्यांसोबत





आदरणीय डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर, महाविद्यालयातील तुमच्या उत्तुंग आणि सकारात्मक योगदानाबद्दल मी एक सहकारी म्हणून तुमच्याबद्दलच्या माझ्या भावना व्यक्त करण्याची ही संधी घेतो.

महाविद्यालयात सुविधा वाढविण्याचा तुमचा दृष्टिकोन, रुग्णांच्या सेवेचा उच्च दर्जा सुनिश्चित करणे आणि जलद आणि प्रभावी निर्णय घेण्याची तुमची क्षमता यामुळे संस्थेला खूप फायदा झाला आहे. स्वच्छ आणि सुंदर कॅम्पस राखण्याच्या तुमच्या वचनबद्धतेमुळे महत्त्वपूर्ण फरक पडला आहे, ज्यामुळे शिकण्यासाठी आणि उपचारांसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. आमच्या वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी इष्टतम काळजी आणि सुविधा प्रदान करण्यासाठी तुमचे समर्पण खरोखरच प्रशंसनीय आहे आणि अनेकांना प्रेरणा मिळाली आहे. शिवाय, तुमची सहानुभूती आणि सर्व रुग्णालयातील सहाय्यक कर्मचाऱ्यांची काळजी तुमचे अपवादात्मक नेतृत्वगुण व भूमिका स्पष्ट करते.

मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या संकल्पनेतून चिठ्ठीमुक्त घाटी अभियान राबविण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना मोफत औषधी उपलब्ध झाली आहे. कुठल्याही रुग्णाला उपचाराविना राहावे लागणार नाही, याबाबत प्रभावीपणे उपाययोजना करण्यात येत आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी घाटी रुग्णालयाला भेट दिली असता मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या विशेष प्रयत्नामुळे चिठ्ठीमुक्त अभियानाचे कौतुक केले.

एक सहकारी या नात्याने, तुमच्या निरंतर यशासाठी माझ्या खूप खूप शुभेच्छा...

जय महाराष्ट्र.


डॉ. मिर्झा सिराज बेग,
प्राध्यापक व विभागप्रमुख, औषधशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# विकृतीशास्त्र विभाग
## Pathology Department



संत निरंकारी महारक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना



रक्तदान शिबीर संयोजकांच्या सत्कार सोहळ्याचे उद्घाटन



महर्षी वाल्मीकी जयंती साजरी करताना

### मागील एक वर्षाच्या कालावधीमध्ये विभागात झालेली कामे :

१) कर्करोगाचे लवकर निदान करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या AI Machine ची स्थापना करून कार्यान्वित केले ज्यामुळे कर्करोगाचे लवकर निदान होऊन रुग्णांवर वेळेवर उपचार करण्यास मदत होते.

२) मध्यवर्ती चिकित्सालयीन प्रयोगशाळा (CCL), विभागीय रक्तकेंद्र (Blood Bank) व विकृतीशास्त्र विभागातील विविध लॅबमध्ये रुग्णांच्या तपासण्या करण्याकरिता लागणारे केमिकल्स, रिएजन्ट व किट्स यांचा विनाविलंब पुरवठा करण्यात आल्यामुळे सर्व लॅबमध्ये दैनंदिन रुग्णसेवा करणे सुलभ झाले.

३) पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमाकरिता लागणाऱ्या सर्व बाबींची पूर्तता तात्काळ करण्यात आल्यामुळे शैक्षणिक व संशोधनात्मक कार्य व्यवस्थितरीत्या पार पडत आहे.

४) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्याकरिता बजाज अध्यापन संकुलाचा वापर करण्यास मुभा देण्यात आल्यामुळे तेथे शैक्षणिक वर्ग घेण्यात येत आहेत.

५) विकृतीशास्त्र विभागातील सर्व लॅब तसेच सीसीएल व विभागीय रक्तकेंद्र येथे रुग्णसेवेकरिता ज्या ज्या मागण्या करण्यात आल्या त्या सर्वांची पूर्तता करण्यात आली, त्यामुळे रुग्णसेवा सुरळीत पार पाडणे सुलभ झाले.

६) मध्यवर्ती चिकित्सालयीन प्रयोगशाळा (CCL), विभागीय रक्तकेंद्र (Blood Bank) व विकृतीशास्त्र विभागामध्ये सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक त्या सर्व ठिकाणी CCTV Camera बसविण्यात आले.

डॉ. भारत सोनवणे
प्राध्यापक
विकृतीशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

# मनोगत



फिनिक्स झाले बहु होतील बहु तरी या सम हा, या उक्तीला अनुसरून ज्यांची कीर्ती केवळ अल्पावधीतच पंचक्रोशीत पसरली असे या छत्रपती संभाजीनगरच्या ख्यातनाम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे आमचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांना मानाचा मुजरा. एका व्यक्तीचे एवढे बहुआयामी व्यक्तिमत्त्व हे केवळ दुर्मिळच. डॉ. सुक्रे यांच्या कार्याबद्दल लिहिताना स्वतःलाच नव्हे तर या संस्थेतील प्रत्येक अल्लुमिनी किंवा घटकाला सुद्धा अभिमान वाटेल अशा सुधारणा केवळ काही महिन्यातच घडवून आणण्याची किमया त्यांनी केली आहे. रुग्णालय म्हणजे रुग्णसेवा या सेवेबद्दल शिवभावे जीवसेवा करण्यासाठी आपले सर्व प्रशासकीय कौशल्य त्यांनी अत्यंत प्रभावीपणे राबविले. रुग्णांबद्दल आत्मीयता असणारा एक अधिष्ठाता म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला. रुग्णसेवेसोबत वक्तशीरपणा, स्वच्छता यादेखील बाबींमध्ये त्यांनी विशेष सुधारणा घडवून आणल्या. वैद्यकीय महाविद्यालय म्हणजे Academics देखील त्यांचा अविभाज्य घटक आहे. याबद्दल त्यांनी प्रोत्साहनच दिले नाही तर या काळात सर्वच विभागांनी विविध प्रकारच्या कार्यशाळा, CME या आयोजित केल्या. त्याबद्दल सर्व विभागांचे डॉ. सुक्रे यांनी गौरवोद्गारच काढले. संस्थाप्रमुख या नात्याने त्यांनी प्रशासनात गतिमानता व प्रगती घडवून आणली. हे करताना त्यांचा दांडगा प्रशासकीय अनुभव, धडाडी व निर्णयक्षमता दिसून आली. केवळ निर्णयक्षमताच नव्हे तर प्रत्येक गोष्टीमध्ये त्याला पर्सनल टच कसा मिळेल याची त्यांनी प्रचिती आणून दिली. डॉ. शिवाजी सुक्रे यांचे संयोजन क्षमता, लोकाभिमुख प्रशासन, सुधारणावादी दृष्टिकोन तसेच लोकसंग्रह हे विशेष उल्लेखनीय गुण आहेत. त्यांनी वैद्यकीय महाविद्यालयाचा केलेला कायापालट ज्यात पार्किंग असेल, बागेतील सुधारणा असतील, दुपारच्या बाह्यरुग्ण विभागाची सुरुवात असेल, अनेक विभागांचे पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण तसेच अद्ययावत यंत्रसामुग्री खरेदी असेल अशा काही गोष्टींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. डॉ. शिवाजी सुक्रे यांची फिनिक्स पक्ष्यासारखी भरारी मी वैद्यकीय अध्यापक म्हणून प्रत्यक्ष अनुभवली आहे. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, त्याप्रमाणे MARD सेक्रेटरी ते मराठवाड्याच्या अत्यंत मान्यताप्राप्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता हा त्यांचा चढता आलेख वाखाण्याजोगा आहे. त्यांचे कार्य असेच चालू राहो यासाठी खूप शुभेच्छा. अशा व्यक्तिमत्त्वासाठी बा. भ. बोरकरांच्या ओळीच आठवतात 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती' व सार्थ ठरतात.

डॉ. अनिल जोशी
प्राध्यापक व विभागप्रमुख,
शरीरविकृतीशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर.



रक्तदान शिबीर संयोजकांच्या सत्कार सोहळ्यामध्ये संयोजकांचा सत्कार करताना.




आंतरराष्ट्रीय रक्तदाता दिवसानिमित्त आयोजित घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करताना.



AI Machine प्रात्यक्षिक



आंतरराष्ट्रीय रक्तदाता दिवस कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना



डॉ. शिवाजी सुक्रे - कार्यकर्ता प्रशासक (अधिकारी)

माझ्या २७ वर्षाच्या अध्यापकीय सेवेमध्ये १०-१२ अधिष्ठाता यांचेसमवेत जवळून काम करण्याची संधी मिळाली, त्या सर्वांमध्ये फार कमी अधिष्ठाता यांचा माझ्या जीवनावर प्रभाव आहे, त्यामध्ये आपल्या कार्यप्रणालीने मी प्रभावित आहे. डॉ. शिरोळे सर, डॉ. भोपळे सर इ. यांचाही फार प्रभाव आहे. आपल्यासमवेत काम करताना माझेही या संस्थेच्या जडणघडणीत योगदान आहे याचा मला अभिमान वाटतो.

जलदगतीने प्रशासकीय निर्णय घेऊन समाजातील गरजू व गरीब माणसाला केंद्रस्थानी मानून त्यांना वेळेत मदत मिळाली पाहिजे अशी तळमळ असते. ते या संस्थेचा विद्यार्थी असल्यामुळे या संस्थेचा विकास कसा होईल, या संस्थेचं नाव कसं मोठं होईल हाच ध्यास मनात बाळगून दिवसरात्र रुग्णसेवेत कार्यरत असतात. ग्रामीण भागातील विद्यार्थीजीवन, शिक्षण व आरोग्य प्रत्यक्ष जगल्यामुळे त्या लोकांना काय अभिप्रेत आहे याची जाण असल्यामुळे तसेच त्यांनी जीवनात भरपूर चढ-उतार पाहिल्यामुळे ते कितीही कठोर प्रसंगाला सहज सामोरे जातात आणि त्यातून मार्ग काढतात. या अशा प्रदीर्घ अनुभवास आम्ही सर्व मित्र त्यांना 'कार्यकर्ता प्रशासक' असे संबोधतो. या संस्थेतून बाहेर पडणारा पदवीपूर्व व पदव्युत्तर डॉक्टर सुसंकृत, परिपूर्ण असावा हे त्यांना अगदी मनापासून वाटते नि म्हणूनच ही धडपड आणि आपल्या या देदीप्यमान कार्यास माझा सलाम.

डॉ. भारत सोनवणे

प्राध्यापक

विकृतिशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर.

# सूक्ष्मजीवशास्त्र विभाग
## Microbiology Department







EPTB निदान, व्यवस्थापन आणि आव्हाने, २१ सप्टेंबर २०२४, छत्रपती संभाजीनगर



EPTB निदान, व्यवस्थापन आणि आव्हाने, २१ सप्टेंबर २०२४, छत्रपती संभाजीनगर



जागतिक AMR जागरूकता सप्ताह २०२४ - पोस्टर स्पर्धा



MAHASAR अंतर्गत MIC, AST WHONET वर प्रशिक्षण व कार्यशाळा

मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी आज आपल्या संस्थेचा कार्यभार सांभाळून ०१ वर्ष पूर्ण झाले. या एका वर्षात त्यांनी जी महत्त्वाची उद्दिष्टे गाठली आहेत, ती खूपच प्रेरणादायक आहेत. त्यांच्यामध्ये संस्थेची उन्नती, आरोग्य सेवेमध्ये सुधारणा आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा वाढविण्याची इच्छाशक्ती अनमोल आहे. गरीब आणि गरजू रुग्णांची काळजी घेताना त्यांचा दिलदारपणा अत्यंत स्पृहणीय आहे. आम्ही त्यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शन आणि पाठिंब्याबद्दल अत्यंत आभारी आहोत.

१) सरांनी आमच्या मूलभूत सुविधांमध्ये आमच्या प्रात्यक्षिक कक्षासाठी फर्निचर खरेदी केले आणि आम्हाला वस्तू संग्रहीत करण्यासाठी जागा दिली.

२) नवीन उपकरणे खरेदी करून दिली असल्यामुळे ऑटोमेशनला मदत मिळाली. त्यामुळे आम्हाला रुग्णांस वेळेत रिपोर्ट देणे शक्य झाले.

३) CSSD मधील ऑटोक्लेव्ह्स कधीही बंद पडण्याच्या मार्गावर होते तसेच त्यांची संख्याही अपुरी होती; परंतु सरांनी ऑटोक्लेव्ह्स खरेदी केले व त्याकरिता जागा देखील निश्चित केली.

४) CCL साठी स्वतंत्र जागा नव्हती ती आता उपलब्ध झाली आहे. रुग्णांसाठी जी अतिशय फायदेशीर गोष्ट आहे.

५) स्वच्छतागृहांचे नूतनीकरण केले आहे.

६) संसर्ग निवारण व त्यांच्या प्रतिबंधात्मक उपायांवर भर दिला आहे. अँटीबायोटिक्सचा विवेकपूर्ण वापर करण्यावरही विशेष भर दिला आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी चिठ्ठीमुक्त घाटी ही संकल्पना पूर्ण करून दाखवली आहे.

मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या कार्यप्रणालीला सलाम.

डॉ. ज्योती बजाज
प्राध्यापक व विभागप्रमुख,
सूक्ष्मजीवशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

# कान-नाक-घसा विभाग

## Ear-Nose-Throat Department






नूतनीकरण झालेल्या कान-नाक-घसा विभागाचे माननीय अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे उद्घाटन करताना



कान-नाक-घसा विभागातर्फे आयोजित केलेल्या म्युकर-मायक्रोसिस या कार्यक्रमामध्ये माननीय अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांचा सत्कार करताना विभागप्रमुख




माननीय अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर हे म्युकर-मायक्रोसिस या विषयावर वैद्यकीय अधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करताना






माननीय अधिष्ठाता यांचा बाह्यरुग्ण विभाग कान-नाक-घसा तर्फे सी.एम.ई. मध्ये सत्कार



## घाटीच्या विकासाचा ध्यास घेतलेला एकमेव अधिष्ठाता : डॉ. शिवाजी सुक्रे सर

मी गेली ४० वर्षे येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहे. बऱ्याच वेळा वैद्यकीय विद्यार्थी आणि शिक्षक म्हणून काम केले असून गेल्या चार दशकात घाटी येथे बरेच अधिष्ठाता होऊन गेले आणि त्यांनी त्यांचे परीने चांगले काम करण्याचा प्रयत्न केला; परंतु गेल्या वर्षीपासून अधिष्ठाता म्हणून रुजू झालेले याच महाविद्यालयाचे विद्यार्थी असलेले डॉ. शिवाजी सुक्रे सर यांनी रुजू झाल्यापासून अक्षरशः दिवसरात्र मेहनत करून चिकित्सालयीन, अचिकित्सालयीन, प्रशासकीय, वर्ग ३, वर्ग ४, रुग्णालय, वसतिगृह सुधारणा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे घाटी रुग्णालयात दाखल होणाऱ्या सर्व गोरगरीब जनतेला चांगल्यात चांगले आणि वेळेवर योग्य उपचार होतात याची काळजी घेतली आहे. चिठ्ठीमुक्त घाटी रुग्णालय या त्यांच्या अत्यंत चांगल्या उपक्रमाची तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे साहेब यांनी सुद्धा दखल घेतली आहे. त्यांच्या अशा खूप छोट्या एक वर्षाच्या कारकीर्दीत कित्येक गोष्टी अशा केलेल्या आहेत की अगदी असे वाटते की हे स्वप्न तर नाही ना.

विशेष म्हणजे आमच्या कान-नाक-घसा विभागासाठी गेल्या ३५ वर्षात कोणत्याही प्रशासकांनी करू न शकलेले ओपीडी १३४ येथील नूतनीकरण हे तर खरंच अगदी फार मोठे काम असून आमच्या विभागासाठी देणगी आहे. त्यामुळे आमच्या विभागातील रुग्णसेवा ही अधिक बळकट आणि चांगली होण्यास खूप मदत झाली आहे. याशिवाय आमच्या विभागातर्फे त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३ मोठ्या शैक्षणिक परिषदा सुद्धा पार पडलेल्या आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आमच्या कर्करोग रुग्णालयातील सुपरस्पेशालिटी कोर्स सुरू होणे (Mch Head neck surgery) हा फक्त डॉ. शिवाजी सुक्रे यांच्याच मुत्सद्दीपणाचा परिपाक आहे. त्यांचे आमच्या कान-नाक-घसा विभाग घाटी रुग्णालय आणि कर्करोग रुग्णालयातील सर्व सहकाऱ्यांतर्फे खूप खूप आभार.

डॉ. सुनील देशमुख
प्राध्यापक
कान-नाक-घसाशास्त्र विभाग
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

# नवजात शिशुशास्त्र विभाग

## Neonatology Department




सुक्रे सरांचे स्वागत



एफ बी एन सी प्रशिक्षणार्थी सोबत (जानेवारी २०२४)



डिजिटल एक्स रे पॅनल प्रणाली छत्रपती संभाजीनगर फर्स्ट कडून सी एस आर अंतर्गत देणगी स्वीकारताना (२२ मार्च २०२४)




एस टी एल कडून सी एस आर देणगी के एम सी कक्ष हस्तांतरण (३१/०५/२०२४)

### मागील एक वर्षाच्या कालावधीमध्ये विभागात झालेली कामे :

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील नवजात शिशुशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉक्टर लक्ष्मीकांत शेषराव देशमुख हे संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एकमेव डीएम निओनेटोलॉजी प्रशिक्षित प्राध्यापक पूर्णवेळ म्हणून कार्यरत आहेत. या विभागाअंतर्गत निओनेटोलॉजी विषयातील अभ्यासक्रम सुरू आहे तसेच डी एम हा अतिविशेष उपचार अभ्यासक्रम राष्ट्रीय आयुर्विज्ञान संस्था (एन एम सी) च्या मानकानुसार (चार विद्यार्थी क्षमता दरवर्षी) असा सुरू आहे. यावर्षी माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या विशेष प्रयत्नातून प्रवेश क्षमता वाढवून पाच पर्यंत नेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### प्रशिक्षण -

या वर्षभरात नवजात शिशू विभागाअंतर्गत नियोनेटल रिससिटेशन प्रोटोकॉल (NRP) च्या चार कार्यशाळा घेण्यात आल्या. दोन कार्यशाळा परिचारिकांसाठी तर दोन कार्यशाळा बालरोगतज्ञांसाठी घेण्यात आल्या. हा विभाग कांगारू मदर केअर करिता सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून युनिसेफतर्फे मान्यताप्राप्त आहे. त्यांअंतर्गत पहिले राज्यस्तरीय केएमसीचे (टी ओ टी) प्रशिक्षकांचे प्रशिक्षण पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्यात आपल्या संस्थेमध्ये घेण्यात आले. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हा रुग्णालयातील एस एन सी यू मध्ये कार्यरत असलेले बालरोगतज्ञ व बालरोग परिचारिकांना दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये एकूण ७० प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. फॅसिलिटीबेस्ड न्यू बॉर्न केअर या कार्यक्रमांतर्गत नव्याने रुजू झालेल्या मेडिकल ऑफिसर, परिचारिका व बालरोगतज्ञांना प्रशिक्षण देण्यात आले. शासकीय रुग्णालयातील न्यू बॉर्न स्टेबलायझेशन युनिट (एन बी एस यू) चे प्रशिक्षण मराठवाड्यात प्रथमच यावर्षी या विभागातर्फे घेण्यात आले. या कार्यशाळेत कम्युनिटी हेल्थ ऑफिसर व ए एन एम अशा परिचारिकांना प्रसुतीनंतर नवजात शिशूंना स्टॅबिलाइज करण्याचे व संदर्भपूर्व सेवाबद्दलचे प्रशिक्षण देण्यात आले.

### CSR -

रुग्णसेवा उंचावण्याकरिता नवजात शिशुशास्त्र विभागातर्फे सीएसआरअंतर्गत व्यावसायिक सामाजिक जबाबदारीसाठी विविध संस्थांना आवाहन केले होते. त्यातील छत्रपती संभाजीनगर फर्स्ट या संस्थेने यावर्षी १२ लाख रुपये किमतीची डिजिटल रेडिओग्राफी सिस्टीम या विभागास दिली.

विविध शासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सी एस आर अंतर्गत स्टरलाइट टेक्नॉलॉजी लिमिटेडकडून २ कोटी रुपये खर्च करून नव्याने उभारण्यात आलेल्या कांगारू मदर केअर वार्डचे हस्तांतरण दिनांक ३१ मे २०२४ रोजी माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या उपस्थितीत पार पडले. हा कक्ष कार्यान्वित करण्याकरिता वेगवेगळ्या

स्तरावरील येणाऱ्या प्रशासकीय अडचणींचा धडाडीने छडा लावत रुग्णसेवेसाठी माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी हा कक्ष खुला करून दिला, त्याबद्दल त्यातील सर्व गरजू माता व त्यांची कमी वजनाची बालके हे सर्व ऋणी राहतील.

**रुग्णसेवा -**

नवजात शिशू अतिदक्षता कक्षात दरवर्षी सुमारे साडेतीन हजार अत्यवस्थ बालके दाखल होतात व त्यांना नानाविध प्रकारची औषधी व सर्जिकल साहित्य वारंवार आवश्यक असते; परंतु संसाधनांच्या कमतरतेमुळे सर्व रुग्णांना आवश्यक ती सर्व सेवा पुरवताना खूप अडचणी निर्माण होत होत्या. डॉ. शिवाजी सुक्रे सरांनी चिठ्ठीमुक्त घाटीचा नारा सत्यात उतरवून नवजात शिशूला आवश्यक असलेली सर्व औषधी, सर्जिकल साहित्य वेगवेगळ्या स्रोतामार्फत उपलब्ध करून दिले. त्यामुळे अभिमानाने नमूद करू इच्छितो की यावर्षी अनेक एक्स्ट्रीम लो बर्थ वेट (ई एल बी डब्ल्यू) ६०० ते ९९९ ग्रॅम अशी अत्यंत कमी वजनाची बालके व जन्मजात पचनसंस्थेची/इतर विकृती असलेली बालके त्यांना आवश्यक ते ऑपरेशन होऊन दीड ते दोन महिना वास्तव्यानंतर एन आय सी यू तून सुखरूप घरी जात आहेत.



अमृतधारा मातृ दुग्ध पेढी कार्यान्वित करताना (जून २०२४)



पहिले राज्यस्तरीय के एम सी (टी ओ टी) प्रशिक्षण (जुलै २०२४)



या संस्थेचे अधिष्ठाता माननीय डॉ. शिवाजी सुक्रे यांना त्यांच्या विद्यार्थीदशेपासून मी ओळखतो. आजपर्यंत विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी, अधिव्याख्याता, सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय उपअधीक्षक, वैद्यकीय अधीक्षक, प्राध्यापक, उपअधिष्ठाता व आता तेवढ्याच जोमाने काम करणारे अधिष्ठाता म्हणून त्यांच्या प्रगतीच्या आलेखाचा मी साक्षीदार आहे.

रुजू झाल्यापासून कमालीच्या वेगाने, सकारात्मक निर्णय घेऊन, वेगवेगळे प्रशासकीय पेच त्यांनी सोडवलेले आहेत.

वसतिगृह असेल किंवा प्रशासन असेल किंवा औषधी व सर्जिकल साहित्याचा अविरत पुरवठा असेल किंवा बांधकाम दुरुस्ती असेल, अशा नानाविध अगणित प्रश्नांची वेळोवेळी उकल करून चिठ्ठीमुक्त घाटीचा संकल्प पूर्ण करून दाखवला.

त्यांच्या या कार्याचा सर्वांना व वैयक्तिकरीत्या मला या संस्थेचा विद्यार्थी म्हणून त्यांचा अभिमान आहे. याच संस्थेत त्यांनी वर्षपूर्तीसारखेच उत्तरोत्तर अशीच यशाची शिखरे गाठून संस्थेचा नावलौकिक वाढवावा ही शुभेच्छा!

एल. एस. देशमुख



एन आर पी कार्यशाळा

# घाटीत रात्रीचे शवविच्छेदन सुरू

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) शनिवारी (२ मार्च) रात्रीपासून शवविच्छेदन सुरू झाले. या निमित्ताने, तांत्रिक वैद्यकीय अडचणी नसलेल्या सर्व केसेसमध्ये रात्री शवविच्छेदन केले जाईल, असे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी स्पष्ट केले. परिणामी, कुटुंबीयांची मोठी सोय होणार असल्याचे मानले जात आहे.

यापूर्वी घाटीत संध्याकाळनंतर शवविच्छेदन होत नव्हते आणि त्यामुळे अनेकदा कुटुंबियांना ताटकळावे लागत होते. त्यातही बाहेरगावहून येणाऱ्यांची जास्त अडचण होत होती. या पार्श्वभूमीवर अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी पदभार घेतल्यानंतर रात्रीचे शवविच्छेदन सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार शनिवारपासून शवविच्छेदन सुरू झाले आणि शनिवारी रात्री दोन केसेसमध्ये शवविच्छेदन झाले. या पुढील काळात तांत्रिक अडचण नसलेल्या सर्वच केसेसमध्ये रात्रीही शवविच्छेदन होईल, असेही त्यांनी सांगितले.

## दुपारी अचानक राउंड

घाटीत रविवारी दुपारी दीड ते चार या वेळेत डॉ. सुक्रे यांनी अचानक राउंड घेतला. या निमित्ताने त्यांनी रुग्णालय परिसर, सीसीएल प्रयोगशाळा; तसेच अपघात विभागाचा राउंड घेतला. या राउंडमध्ये दोन इंजेक्शन वगळता सर्व प्रकारची औषधे उपलब्ध होती, असेही निरीक्षण त्यांनी नोंदवले. तर, घाटीच्या स्वयंपाकगृहाच्या पाहणीत कार्यभार सुरळीत सुरू असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले.



**अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी रविवारी दुपारी घाटीच्या किचनची पाहणी केली.**



# 'पीएम'साठी रात्रभर ताटकळणे आता थांबले

## १० महिन्यांत रात्री १५० शवविच्छेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** घाटी रुग्णालयात गेल्या १० महिन्यांत रात्रीच्या वेळी १५० शवविच्छेदन झाले आहेत. घाटीत १० कोटींची औषधी खरेदी प्रक्रिया सुरू असून, यात स्ट्रोक, 'जीबीएस' सारख्या आजारावरील महागडी असलेली १ कोटींची औषधीही खरेदी करण्यात येत आहे. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ५ विषयात सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने तयारी करीत असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नंदुरबार, अंबाजोगाई, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर येथे अधिष्ठाता म्हणून जबाबदारी पार पाडण्यास ५ वर्षे पूर्ण झाली आणि या काळात केलेल्या कामांची माहिती देण्यासाठी डॉ. सुक्रे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत संवाद साधला.

कोरोना काळात अंबाजोगाई येथे काम करताना आलेला अनुभव कायम स्मरणात राहील.

घाटीत गेल्या वर्षभरात चिठ्ठीमुक्त रुग्णालय, दुपारची ओपीडी, रात्रीचे शवविच्छेदन, पेन क्लिनिक, शासकीय कर्करोग रुग्णालयात सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवा आदी केल्याचे डॉ. सुक्रे यांनी सांगितले.

### या ५ विषयांत अभ्यासक्रमाच्या हालचाली

घाटीतील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये 'डीएम कार्डिओलॉजी', 'एमसीएच सिव्हिटीएस', 'एमसीएच युरोलॉजी', 'एमसीएच न्युरोसर्जरी', आणि 'एमसीएच प्लास्टिक सर्जरी' या पाच विषयांत सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम सुरु करण्याची तयारी सुरु असल्याचेही डॉ. सुक्रे यांनी सांगितले.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शवविच्छेदन, मध्यवर्ती चिकित्सालयीन प्रयोगशाळेच्या एकत्रीकरणासह, ABG सारख्या महत्त्वाच्या चाचण्या नव्याने सुरू करणे यासारख्या सुधारणा केल्या आहेत. यापूर्वी संध्याकाळी व रात्रीच्या वेळी शवविच्छेदन होत नव्हते. त्यामुळे मृत व्यक्तीच्या नातेवाइकांना प्रचंड त्रास होत असे. डॉ. शिवाजी सुक्रे यांनी अधिष्ठाता म्हणून पदभार हाती घेतल्यानंतर या गोष्टीची गंभीर दखल घेत रात्रीच्या वेळी शवविच्छेदन करण्याच्या सूचना दिल्या. गेल्या १० महिन्यांत १५० च्या वर शवविच्छेदन रात्रीच्या वेळेत पार पडले.



डॉ. शिवाजी सुक्रे सर अधिष्ठाता म्हणून दि. २० डिसेंबर, २०२३ रोजी आपल्या महाविद्यालयात रुजू झाले. मला वाटते हा दिवस म्हणजे आपल्या संस्थेचा एक सुवर्णकांचन योग आहे.

न्यायवैद्यकशास्त्र या विभागामध्ये आदरणीय डॉ. सुक्रे सर यांच्या पुढाकारामुळे सकारात्मक बदल झालेले आहेत.

नवीन शवचिकित्सागृहाचे नूतनीकरण करण्याबाबत आदरणीय डॉ. सुक्रे सर यांनी वेळोवेळी प्रयत्न व शासनस्तरावर पाठपुरावा केला आहे.

शासकीय नियमानुसार २४ तास शवचिकित्सेचे कार्य चालू ठेवणेसंबंधी सरांचा नेहमीच पाठिंबा राहिला आहे व त्यानुसार सद्य:स्थितीत या विभागांतर्गत २४ तास शवचिकित्सेचे काम करण्यात येत आहे. न्यायवैद्यकशास्त्र विभागांतर्गत रोज सरासरी १० ते १५ शवचिकित्सा होतात. रात्रीची शवचिकित्सा सुरू करण्याच्या आदरणीय अधिष्ठाता यांच्या आदेशामुळे आत्तापर्यंत ३५८ शवचिकित्सा या रात्री झाल्या असून त्यामुळे मयतांच्या नातेवाइकांना उपयोग झाला आहे.

सरांच्या पुढाकारामुळे मयताचे नातेवाईक यांच्यासाठी प्रतिक्षागृहाचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे.

सरांच्या पुढाकारामुळे शवचिकित्सागृहात शितगृह स्थापन करण्यात आलेले आहे. ज्याचा उपयोग हा विभाग करत आहे. शवचिकित्सागृहात वेळोवेळी भेट देणारे हे एकमेव अधिष्ठाता आहेत.

सदैव उपलब्ध असलेले हे अधिष्ठाता येणाऱ्या काळामध्ये आपल्या महाविद्यालयाला उत्तुंग शिखरावर घेऊन जातील याबद्दल माझ्या व या विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या मनात तीळमात्र शंका नाही.

डॉ. गणेश निटूरकर
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख,
न्यायवैद्यकशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# औषधवैद्यकशास्त्र विभाग
## General Medicine



नर्सिंग विद्यार्थ्यांचे एच. आय. व्ही. बाबतचे प्रशिक्षण




क्रिटिकल केअर विज्ञान परिषदेचे उद्घाटन



जागतिक एड्स दिवस



एन. व्ही.एच.सी.पी. जागतिक हिपॅटायटिस दिवसानिमित्त प्रशिक्षण




बेसिक अँड अडव्हान्स लाईफ सपोर्ट ट्रेनिंग पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगरचे मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांना वर्षपूर्तीच्या अनंत शुभेच्छा. अत्यंत धाडसी आणि दुर्मिळ असे नेतृत्वगुण असलेले डॉ. सुक्रे हे अतिशय मायाळू आहेत. रुग्णसेवेसाठी त्यांची तळमळ व तत्परता वाखाणण्यासारखी आहे. 'न भूतो न भविष्यती' या उक्तीप्रमाणे चिठ्ठीमुक्त घाटी या त्यांच्या मोहिमेमुळे गोरगरीब रुग्णांना मिळालेला दिलासा रोज आम्ही अनुभवत आहोत. स्वतःचे शारीरिक व मानसिक संतुलन सांभाळून संपूर्ण संस्थेला भक्कम आधारस्तंभ देऊन, सगळ्यांना सोबत घेत आपण करीत असलेल्या वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेछा...

डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य
प्राध्यापक व विभागप्रमुख,
औषधवैद्यकशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर



औषधवैद्यकशास्त्र विभाग कक्षातील रुग्णसेवेचा आढावा घेताना अधिष्ठाता



पदवीपूर्व विद्यार्थ्यांचे डायबिटीस प्रशिक्षण

# शल्यचिकित्साशास्त्र

## General Surgery




अवयवदान जनजागृती कॅम्प आयोजन




रक्तदान शिबिराचे आयोजन



शल्यचिकित्साशास्त्र विभागातर्फे मा. अधिष्ठाता यांच्या हस्ते मुलींचे वसतिगृह येथे वृक्षारोपण करण्यात आले.






अवयवदान जनजागृती पथनाट्य आयोजन






Surgery Seminar Hall नूतनीकरण मा. अधिष्ठाता, डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या अथक प्रयत्नाने शल्यचिकित्साशास्त्र विभाग व्याख्यान कक्ष (Surgery Seminar Hall) चे नूतनीकरण करण्यात आल्याने शल्यचिकित्साशास्त्र व्याख्यानकक्ष रुग्णहितास्तव तथा पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव परिपूर्ण झाले.



MEU अंतर्गत आयोजित Clinical Meet मध्ये शल्यचिकित्साशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण डॉ. कृतिका मखमले (Congenital Diaphragmatic Hernia A Miss-diagnosis) डॉ. जयश्री मुनेश्वर (Spontaneous penumomediastinum) कनिष्ठ निवासी-३



नूतनीकरणापूर्वी



नूतनीकरणानंतर

# स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
## OBSTETRICS GYNAECOLOGY DEPARTMENT



पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी लागणाऱ्या प्रगत लॅप्रोस्कोपी, हिस्ट्रोस्कोपी आणि कृत्रिम पुनरुत्पादन तंत्र सिम्युलेशन लॅबचे उद्घाटन करताना मा.अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, व मान्यवरासमवेत विभागातील अद्यापक वर्ग.



उत्कृष्ट काम केल्याबद्दल मा.डॉ. शिवाजी सुक्रे, अधिष्ठाता यांच्या हस्ते डॉ. श्रीनिवास एन. गडप्पा, प्राध्यापक व विभागप्रमुख यांचा सत्कार.



मा. प्रधान सचिन, श्री. दिनेश वाघमारे साहेब, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांचा स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभागातील वार्डांचा पाहणी दौरा



सन्मानपूर्वक मातृत्वसेवा कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मा.डॉ. शिवाजी सुक्रे, अधिष्ठाता व डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक यांच्यासमवेत डॉ. श्रीनिवास एन. गडप्पा, प्राध्यापक व विभागप्रमुख.



शस्त्रक्रियागारगृह-४ चा नूतनीकरण कार्यक्रम



प्रसुती कक्षाचा नूतनीकरण कार्यक्रम साजरा



स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभागाच्या सन २०२४ च्या पुनर्जागरण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मा.डॉ. शिवाजी सुक्रे, अधिष्ठाता यांचा सत्कार करताना डॉ. श्रीनिवास एन. गडप्पा, प्राध्यापक व विभागप्रमुख.



शस्त्रक्रियागारगृह-४ च्या नूतनीकरण प्रसंगी तेथील परिचारिकांचा सत्कार



प्रसुती कक्षात स्तनपान सप्ताह साजरा करताना



वार्ड क्र. २९ चा नूतनीकरण कार्यक्रम साजरा करताना उपस्थित मान्यवर व अध्यापक/परिचारिका वर्ग



मा. अधिष्ठाता आणि विद्यमान सहसंचालक डॉ. शिवाजी सुक्रे सरांनी संस्थेच्या विकासासाठी कार्यक्षम नेतृत्वाचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण टप्प्यांपैकी एक म्हणजे अधिष्ठाता म्हणून त्यांनी पूर्ण केलेल्या एका वर्षाचा गौरवशाली प्रवास.
दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी डॉ. सुक्रे सरांच्या अधिष्ठाता कार्यकाळास एक वर्ष पूर्ण होत आहे. या कालावधीत त्यांनी रुग्णहित, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने अनेक नवीन उपक्रम राबविले, गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान केल्या आणि संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती साधली. सरांच्या या उल्लेखनीय योगदानाला सलाम करताना, त्यांच्या कार्याचा आढावा घेणारी आणि संस्मरणीय क्षण साठवणारी स्मरणिका प्रकाशित करण्याचा प्रशासनाचा निर्णय स्वागतार्ह आहे. ही स्मरणिका केवळ सरांच्या कार्यकाळाचा गौरव करणारी नाही, तर त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाला एक आदरांजलीही ठरणार आहे. या स्मरणिकेद्वारे आपण डॉ. सुक्रे सरांच्या कार्यशैलीचे आणि त्यांच्या दृष्टिकोनाचे दस्तऐवजीकरण करू, ज्याचा पुढील पिढ्यांना उपयोग होईल आणि संस्थेच्या प्रगतीसाठी नवा दृष्टिकोन मिळेल.

डॉ. शिवाजी सुक्रे सरांच्या नेतृत्वाखालील महत्त्वपूर्ण कार्य

१. आधुनिक पायाभूत सुविधा उभारणी : सरांनी संस्थेतील पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणावर विशेष लक्ष केंद्रित केले. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची खरेदी, उपचार विभागांचे नूतनीकरण आणि रुग्णालयाच्या विविध विभागांना नव्या तंत्रज्ञानाने सज्ज करणे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

२. शैक्षणिक उपक्रमांचा विस्तार : वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी सरांनी शैक्षणिक कार्यक्रम अधिक प्रभावी केले. विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, चर्चासत्रे आणि नवनवीन संशोधन प्रकल्प यांना चालना देण्यात आली. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर तज्ज्ञांना व्याख्यानांसाठी आमंत्रित करून विद्यार्थ्यांना जागतिक दृष्टिकोन दिला.

३. चिठ्ठीमुक्त अभियान : चिठ्ठीमुक्त अभियानातील सरांचे योगदान : डॉ. शिवाजी सुक्रे सरांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेले चिठ्ठीमुक्त अभियान हे रुग्णहिताच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम ठरले आहे. या अभियानामुळे रुग्णांना त्यांच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या औषधांचा, शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याचा मोफत पुरवठा सुनिश्चित करण्यात आला. या उपक्रमामुळे रुग्णांचे आर्थिक ओझे कमी झाले आणि गरजू रुग्णांना वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण उपचार मिळाले. यामुळे संस्थेवरचा रुग्णभार लक्षणीयरीत्या वाढला; परंतु सरांच्या कुशल व्यवस्थापनामुळे वाढीव रुग्णसंख्येची देखील प्रभावी हाताळणी करण्यात आली.
चिठ्ठीमुक्त अभियानाने रुग्णसेवा अधिक सुलभ, परवडणारी आणि प्रभावी केली, ज्याचा थेट लाभ समाजातील सर्व स्तरांतील लोकांना झाला. हा उपक्रम रुग्णहित साधणाऱ्या उपक्रमांचा एक आदर्श ठरला आहे.
४. वाहतूक आणि पार्किंग व्यवस्थापन : संस्थेत वाढत्या रुग्णसंख्येच्या गरजांना लक्षात घेऊन, सरांनी वाहनतळाचे व्यवस्थापन अधिक प्रभावी केले. वाहनतळाचे क्षेत्र वाढवणे, नियोजनबद्ध पार्किंग प्रणाली लागू करणे आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष उपाययोजना यशस्वीरीत्या राबविल्या.
डॉ. शिवाजी सुक्रे सरांच्या या दूरदृष्टीमुळे संस्था रुग्णसेवा, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन या तिन्ही आघाड्यांवर उत्तुंग यशाची वाटचाल करत आहे.

डॉ. श्रीनिवास गडप्पा
प्राध्यापक व विभागप्रमुख,
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# बालरोगशास्त्र विभाग
## Paediatrics Department

माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे हे या संस्थेत रुजू झाल्यापासून बालरोग विभाग विकासाकडे आगेकूच करत आहे. या एक वर्षाच्या शासन काळात बालरोग विभागात कुठल्याही औषधीची कमतरता भासली नाही, मग तो बाह्यरुग्ण विभाग असो की आंतररुग्ण विभाग. माननीय अधिष्ठाता यांनी बालरोग विभागाकडून आयोजित होणाऱ्या प्रत्येक उपक्रमास आपला पूर्ण पाठिंबा देऊन त्यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. कुठलीही समस्या उद्भवल्यास अधिष्ठाता यांनी त्या समस्येचे त्वरित व कार्यशील असे निवारण केले. सरांच्या या रुग्णसेवेसाठी असलेल्या भावनेला बालरोग विभागाकडून मानाचा मुजरा.




सिम्पोझिअम स्पर्धा - स्थूलता जागरूकता दिनानिमित्त आमच्या उत्साही एचओडी डॉ. प्रभा खैरे मॅडम यांच्या नेतृत्वाखाली पीजी विद्यार्थ्यांसाठी एक बहुविद्याशाखीय परिसंवाद स्पर्धा. १० संघांनी सहभाग घेतला आणि उत्कृष्ट सादरीकरणे सादर केली. आमचे माननीय डीन डॉ. शिवाजी सुक्रे सर यांनी प्रोत्साहन दिले.



अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या उपस्थितीत गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला.



मान्नीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या उपस्थितीत बालरोग विभागामध्ये क्लिनिकल स्किल वर्कशॉप आयोजित केले.
एकूण २० रहिवासी डॉक्टरांनी त्यात सहभाग नोंदविला.



आमचे माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या शुभ उपस्थितीत जागतिक लठ्ठपणा जागरूकता दिनानिमित्त विभाग प्रमुख डॉ. प्रभा खैरे व डॉ. अभिषेक जैन यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी एक मनमोहक आणि उद्बोधक कार्यक्रम सादर केला.




अवयवदान मोहिमेनिमित्त बालरोग विभाग आणि नाक,कान,घसा विभागातर्फे आमचे आदरणीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कविता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पदवीपुर्व, नर्सिंग विद्यार्थी, नर्सिंग कर्मचारी आणि प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.

# क्ष-किरणशास्त्र विभाग
## Radiology Department





आदरणीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या हस्ते सोनोग्राफी वार्ड ११ चे उद्घाटन.





आदरणीय अधिष्ठाता यांच्या हस्ते सोनोग्राफी बाह्यरुग्ण विभाग १०८ चे उद्घाटन.

डॉ. शिवाजी सुक्रे यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरचा अधिष्ठाता म्हणून कार्यभार स्वीकारल्यापासून नेहमीच महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहेत. महाविद्यालयातील रेडिओलॉजी विभागात मोठ्या प्रमाणावर रुग्णांच्या तपासण्या केल्या जातात याची त्यांना पूर्णपणे कल्पना आहे. यामुळेच रेडिओलॉजी विभागाच्या विकासासाठी ते नेहमीच प्रयत्न करतात.

यामध्ये विभागासाठी लागणाऱ्या अद्ययावत अशा मशीन्स उपलब्ध करून देण्यामध्ये अधिष्ठाता यांनी खूप प्रयत्न केले. यामुळेच विभागात अद्ययावत अशा सोनोग्राफी आणि X-ray मशीन्स उपलब्ध झाल्या. याचा रुग्णांना मोठ्या प्रमाणावर फायदा होताना दिसत आहे. विभागात नवीन CT scan मशीन मिळण्यासाठी ते वारंवार पाठपुरावा करीत आहेत.

विभागातील मशीनबरोबरच सरांनी बाह्यरुग्ण विभाग १०८ चे नूतनीकरण आणि नवीन वॉर्ड ११ रेडिओलॉजी विभागास दिल्यामुळे विभागात मोठ्या संख्येने येणाऱ्या रुग्णांना पुरेशी जागा मिळालेली आहे. यातून डॉ.सुक्रे यांची रुग्णसेवेबद्दलची तत्परता दिसून येत आहे.

रुग्णसेवेबरोबरच विभागातील निवासी डॉक्टरांसाठी विभागात साइड रूम्स तयार केल्यामुळे निवासी डॉक्टरांना राहण्यासाठी चांगली जागा मिळालेली आहे.

डॉ.शिवाजी सुक्रे यांनी गेल्या वर्षभरात विभागात केलेल्या कामांमुळे रेडिओलॉजी विभागात बदल झालेला दिसून येत आहे. यामुळे संपूर्ण रेडिओलॉजी विभाग त्यांचा मनापासुन आभारी आहे.



आदरणीय अधिष्ठाता राष्ट्रीय परिषदेतील विजयवाडामध्ये झालेल्या यशासाठी क्ष-किरणशास्त्र विभागाच्या निवासी डॉक्टरांचा सत्कार करताना



क्ष-किरणशास्त्र विभाग हा महाविद्यालयातील एक महत्त्वाचा विभाग आहे. येथे नेहमीच रुग्णांची वर्दळ असते. विभागात दररोज ५०० पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी होते याची सरांना पूर्णपणे कल्पना आहे. यामुळेच अगदी सुरुवातीपासूनच ते विभागाच्या विकासासाठी प्राधान्य देत आहेत. विभागासाठी लागणाऱ्या अद्ययावत अशा मशीन्स उपलब्ध करण्यावर त्यांनी भर दिला आहे. म्हणूनच विभागात अद्ययावत अशा सोनोग्राफी आणि एक्स-रे मशीन्स उपलब्ध झाल्या आहेत. विभागात येणाऱ्या रुग्णांच्या सोयीसाठी दूरगामी दृष्टिकोन ठेवून त्यांनी नवीन असा वॉर्ड ११ विभागास दिलेला आहे, यामुळे रुग्णांसाठी पुरेशी जागा मिळाली आहे. याबरोबरच बाह्यरुग्ण विभाग १०८ चे नूतनीकरणही करण्यात आले आहे. येत्या काळात विभागात नवीन सिटी स्कॅन मशीन यावी यासाठी ते वारंवार पाठपुरावा करत आहेत. सरांच्या या कामांसाठी संपूर्ण क्ष-किरणशास्त्र विभाग त्यांचा आभारी आहे.

सरांसोबत काम करत असताना त्यांनी रुग्णसेवेसाठी व महाविद्यालयाच्या विकासासाठी घेतलेला वसा दिसून येतो. इतर वेळेला शांत व संयमी असणारे सुक्रे सर जेव्हा रुग्णसेवेचा प्रश्न येतो त्या प्रसंगी कठोर भूमिका घेतानाही दिसून येतात. या महाविद्यालयाशी सरांचे एक अतूट असे नाते आहे. या महाविद्यालयाचा एक सामान्य विद्यार्थी ते महाविद्यालयाचे अधिष्ठाता असा हा त्यांचा देदीप्यमान प्रवास मी अत्यंत जवळून पाहिलेला आहे. सरांचे महाविद्यालयाप्रति असलेले विशेष प्रेम व महाविद्यालयाच्या विकासासाठी अहोरात्र घेत असलेले कष्ट महाविद्यालयाला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जातील, यात काहीच शंका नाही. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

डॉ. वर्षा रोटे-कागीनाळकर
प्राध्यापक व विभागप्रमुख,
क्ष-किरणशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग
## Ophthalmology Department





अद्ययावत उपकरणांचा लोकार्पण सोहळा



नेत्रविभाग नूतनीकरण लोकार्पण



प्राध्यापक व विभागप्रमुख यांचे दालनाचे नूतनीकरण



पदव्युत्तर विध्यार्थ्यांना प्रात्यक्षिक वर्कशॉप



CSR या उद्योगांच्या सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत अद्ययावत Microscope देणगी स्वरूपात Lifeline Medical Pvt. Ltd. यांच्याकडून प्राप्त



नेत्रदान पंधरवड्याची सांगता पद्मश्री डॉ. जीवन टिटियाल व डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या उपस्थितीत कार्यशाळा



नेत्रदान पंधरवडा उद्घाटन



नेत्र विभागास प्राप्त नवीन OT Table चे लोकार्पण



नेत्रनिगा प्रशिक्षार्थी वसतिगृहाचे नूतनीकरण



नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग, सर्वसामान्य जनतेकरिता दृष्टिदानाचे काम करणारा विभाग. दृष्टीहीन रुग्णांकरिता संजीवनी म्हणून काम करणारा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील हा विभाग ६० वर्षे जुन्या सर्जिकल इमारतीमध्ये कक्ष क्रमांक १५ व १६ मध्ये कार्यरत आहे. साठ वर्षांपासून कार्यरत असलेला हा विभाग सद्य:परिस्थितीत जुन्या संसाधनांवर चालत होता. या विभागाला नवसंजीवनीची अतिशय गरज होती. एक वर्षापूर्वी २० डिसेंबर २०२३ रोजी माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी पदभार स्वीकारला व केवळ नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभागाचेच नव्हे तर संपूर्ण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे रूपडे पालटले. पदभार स्वीकारल्यावर माननीय अधिष्ठाता यांनी नेत्ररुग्ण विभागाचा राउंड घेतला व दूरावस्थेत असलेला नेत्रकक्ष, रुग्णांचे स्वच्छतागृह, पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे नेत्र विभागातील कक्ष, शस्त्रक्रियागृह या सर्वांचे नूतनीकरण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागास दिले. सर्व कामे वेळेपूर्वी पूर्ण करून घेतली. यामुळे रुग्णांचे व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे विभागातील वास्तव्य सुखकारक झाले. तसेच नेत्रनिगा प्रशिक्षणार्थी वसतिगृहांच्या नूतनीकरणाचे कार्य उत्कृष्टपणे पूर्ण झाले आहे. वसतिगृहातील नवीन सुविधांमुळे तिथे वास्तव्य करणाऱ्या निवासी डॉक्टरांना आरामदायी वातावरण मिळाले आहे. यानंतर मा. अधिष्ठाता यांनी आपले लक्ष शस्त्रक्रियागृहाकडे वळविले. शस्त्रक्रियागृहातील सर्व यंत्रसामुग्री ही अतिशय जुनी झाली होती, ती तात्काळ लक्ष देऊन शस्त्रक्रियागृहासाठी ०५ शस्त्रक्रिया टेबल्स उपलब्ध करून दिले. याचा लोकार्पण सोहळा दिनांक २० मे २०२४ रोजी संपन्न झाला. पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी गरजेचा असणाऱ्या सेमिनार हॉलचे पूर्ण नूतनीकरण करण्यात आले व या हॉलमध्ये वातानुकुलित यंत्रे बसवण्यात आली. या नूतनीकरणाचा लोकार्पण सोहळा १९ एप्रिल २०२४ रोजी संपन्न झाला. मागील पंधरा वर्षांपासून नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभागात कुठलेही नवीन अद्ययावत उपकरण आले नव्हते. अतिशय जुन्या उपकरणांवर विभागाचे काम चालू आहे हे कळताच मा. अधिष्ठाता यांनी जिल्हा नियोजन विकास निधीअंतर्गत या विभागामध्ये सर्व अद्ययावत यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली. ही सर्व अद्ययावत उपकरणे माननीय अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनामुळे व अथक प्रयत्नांनी उपलब्ध झाली. या सर्व उपकरणांचा लोकार्पण सोहळा माननीय जिल्हाधिकारी दिलीपजी स्वामी यांच्या उपस्थितीत २७ नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडला. या सर्व अत्याधुनिक उपकरणांमुळे निवासी डॉक्टरांना शस्त्रक्रिया शिकणे सोयीस्कर झाले असून, या सर्वांचा लाभ असंख्य रुग्णांना होत आहे. नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभागात हा आमूलाग्र बदल घडवून आणण्यात माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचा सिंहाचा वाटा आहे.

डॉ. अर्चना पाटील-वरे,
प्राध्यापक व विभागप्रमुख,
नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग

# मनोगत



वैद्यकीय शिक्षणातला सुक्रे पॅटर्न

सुक्रे सर हे असे पहिले अधिष्ठाता आहेत की, ज्यांनी नंदुरबारसारख्या अतिमागास भागात जाऊन, ज्या ठिकाणी दहा वर्षात अनेक एम.सी.आय. इंस्पेक्शन होऊन देखील मान्यता मिळत नव्हती, त्या ठिकाणी १२ डिसेंबर २०१९ रोजी रुजू होऊन केवळ तीन महिन्यांत तत्कालीन मा. संचालक तात्याराव लहाने यांच्या मदतीने १०० टक्के त्रुटी पूर्ण करून महाविद्यालय सुरू केले. हे असे एकमेव महाविद्यालय आहे जे की कोविड काळात सुरू झाले आहे. अतिशय दुर्गम भागात ज्या ठिकाणी कोविड काळात २ फिजिशियनचीही उणीव जाणवायची त्या ठिकाणी आता सुक्रे सर यांच्यामुळे १०० इंटर्न डॉक्टर दरवर्षी सेवा देण्यास सज्ज होत आहेत. परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाबाबतीतही अनेक राजकीय व सामाजिक आंदोलने होऊन सुद्धा ५ वर्षापासून महाविद्यालय सुरू होत नव्हते. ज्यावेळी २ इंस्पेक्शन फेल झालेत त्या वेळी शासनाने सुक्रे सर यांची नियुक्ती परभणी येथे अधिष्ठाता म्हणून केली व याच सुक्रे पॅटर्नने फक्त दीड महिन्यात परभणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले. त्यानंतर सुक्रे सर यांनी अंबाजोगाई येथे स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व ग्रामीण रुग्णालय येथे कोविड महामारीमध्ये १३ महिने काम केले. नंदुरबार व परभणी असे दोन वैद्यकीय महाविद्यालय अवघ्या दोन ते तीन महिन्यात १०० टक्के त्रुटी पूर्ण करण्याची व सुरू करण्याची किमया फक्त सुक्रे सर यांच्या प्रयत्नांमुळे झाली.

छत्रपती संभाजीनगर ही सुक्रे सर यांची कर्मभूमी राहिलेली आहे. आपल्या संस्थेमध्ये ०१ वर्षाच्या काळात आमूलाग्र बदल करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय असलेल्या रुग्णालयास कार्पोरेटप्रमाणे लुक देण्याचे काम केले आहे. मनुष्यबळाच्या अनेक त्रुटी असताना सुद्धा सुक्रे सर यांनी हे काम केले. राज्य कर्करोग रुग्णालयाचे तीन सुपरस्पेशालिटीचे कोर्सेसचे सुद्धा नाकारण्यात आले होते. तेही ०२ अपीलमध्ये मिळविलेले आहेत. ६८ वर्षानंतर एमडी टीबी चेस्ट सारखे विषय सुक्रे सर यांनी मार्गी लावलेले आहेत. जे सुपरस्पेशालिटी रुग्णालय हे ०५ वर्ष झाले बांधण्यात आले होते ते कार्यान्वित होत नव्हते तेही कार्यान्वित करण्यात आले आहे. बजाज अध्यापन संकुल अनेक गोष्टीच्या आवश्यकतेअभावी बंद पडलेले होते त्या ठिकाणी आवश्यक गोष्टी देऊन ते वैद्यकीय विद्यार्थ्यांकरिता देण्यात आले आहे. रुग्णालय असो वा महाविद्यालय कमी कालावधीमध्ये दर्जेदार करून देण्यात आले आहे. अशा प्रकारे सुक्रे सर यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक अशक्य गोष्टी शक्य केल्या आहेत व ते पुढेही करत राहतील. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखविणे हेच सुक्रे पॅटर्न आहे.

डॉ. तपन जक्कल
सहयोगी प्राध्यापक
नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग

# मनोगत



आदरणीय सुक्रे सर,

आपल्या कार्यकाळात विकासासाठी केलेले योगदान आणि उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल आपल्याला मनःपूर्वक आभार. आपल्या ज्ञानाने, अनुभवाने आणि समर्पणाने आपण एक किर्तीमान गाठला आहे. आपल्या कार्यकाळात आपण या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी अनेक सकारात्मक बदल केले. आपली निर्णयक्षमता, कार्यपद्धती आणि टीमच्या विकासासाठी केलेले प्रयत्न आमच्यासाठी नेहमीच प्रेरणादायक राहतील. रुग्णांची सेवा करणे ही आपली प्राथमिकता असली, तरी त्यासोबतच आपण डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी देखील खूप काम केले. आपल्या योग्य मार्गदर्शनामुळे आमच्या संपूर्ण विभागाने एकत्रित होऊन कार्य केले व नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभागात अनेक सकारात्मक बदल घडून आले. विभागाचे नूतनीकरण झाले, विभागात सर्व अद्ययावत यंत्रसामुग्री आली आणि हे सर्व आपल्या प्रेरणादायक नेतृत्वामुळे साध्य झाले. आपल्या अथक प्रयत्नांमुळे प्रत्येक रुग्णासाठी घाटी ही चिठ्ठीमुक्त झाली आहे. आपला आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन नेहमीच आमच्याबरोबर राहील. आपल्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

माननीय सर आपले कार्य नेहमीच प्रेरणा देईल.

डॉ. महेश सोनपेठकर<br>
सहाय्यक प्राध्यापक,<br>
नेत्रशल्यचिकित्साशास्त्र विभाग

# बधिरीकरणशास्त्र

## Anaesthsia Department




वेदनाशमन क्लिनिकच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे



डॉ. प्रमोद अपसिंगकर यांचे व्याख्यान



वर्षभरापूर्वीपर्यंत महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेचे कामकाज पुरेशा मनुष्यबळाअभावी संथगतीने होत होते. डॉ. शिवाजी सुक्रे सरांच्या कार्यकुशल नेतृत्वामुळे तसेच त्यांनी स्वतः लक्ष घालून तात्काळ भरतीप्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने राबविली. त्यासोबतच योजनेच्या ऑनलाइन कामासाठी कॉम्प्युटर व इतर साहित्य उपलब्ध करून दिले. रुग्णांच्या व नातेवाइकांच्या सुविधेसाठी डॉ. सुक्रे सरांनी योजनेचे कार्यालय दर्शनीभागात अपघात विभागाशेजारी स्थलांतरित करण्यात केले. तेव्हापासून म. ज्यो. फु. ज. आ. योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. डॉ. शिवाजी सुक्रे सरांच्या कार्यकाळात घाटी रुग्णालयाला एका महिन्यात एक कोटीपेक्षा जास्त एवढा विक्रमी निधी जमा झाला आहे. तसेच योजनेच्या कामकाजात गतिमानता आली आहे.

डॉ. सुचिता अण्णासाहेब जोशी
प्राध्यापक, बधिरीकरणशास्त्र तथा अध्यक्ष म.ज्यो. फु. ज. आ. योजना समिती,
शासकीय वैद्यकीय महविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.



लोकमत

# काय सांगता? सोनोग्राफी मशीनच्या मदतीने रुग्णाला भूल

## घाटीत कार्यशाळा : दिल्लीतील 'एम्स'च्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** सोनोग्राफी म्हटले की, फक्त गरोदरपणाच्या तपासणीसाठी वापरले जाणारे वैद्यकीय उपकरण-यंत्र, असेच सर्वांच्या नजरेसमोर येते. मात्र, आता शस्त्रक्रियेसाठी रुग्णाला भूल देण्यासाठीही सोनोग्राफी मशीनचा वापर करण्यात येत आहे, हे अनेकांना माहीत नसेल. रुग्णाला अचूक पद्धतीने भूल देण्यासाठी आता सोनोग्राफी मशीनचा वापर केला जात असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि शासकीय कर्करोग रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सोनोग्राफी मशीनच्या मदतीने भूल देण्यासंदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी दिल्लीतील एम्स हॉस्पिटलच्या प्रो. डॉ. ज्योत्स्ना पुंज, डॉ. व्ही. डारलोग, डॉ. रवींदर पांडे यांची मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती. याप्रसंगी शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी व विविध डॉक्टर्स उपस्थित होते.



कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी दीप प्रज्वलन करताना डॉ. अरविंद गायकवाड. सोबत डॉ. भारत सोनवणे, डॉ. सुधीर चौधरी, डॉ. सुरेश हरबडे, अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. राजश्री विरशीद- सोनवणे.

### ५ मशीनद्वारे ५० जणांना प्रशिक्षण

सोनोग्राफी मशीनवर ५० जणांना भूल देण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेऊन घाटीत ५ मशीन आणले गेले होते. घाटीत भूल देण्यासाठी एक सोनोग्राफी मशीन असल्याचे सांगण्यात आले.

### १०० टक्के अचूकपणे भूल

सोनोग्राफी मशीनच्या मदतीने भूल देताना १०० टक्के अचूकता येते. तेच सोनोग्राफी मशीनच्या मदतीशिवाय भूल देताना कधी-कधी चूक होण्याची शक्यता असते.

- डॉ. ज्योत्स्ना पुंज, प्रोफेसर, एम्स हॉस्पिटल, दिल्ली

### योग्य प्रकारे भूल देण्यास मदत

शस्त्रक्रिया करण्यासाठी अनेकदा नसेऐवजी इंजेक्शनची सुई ही रक्तवाहिनीत जाते. त्यातून रक्तवाहिनीत भुलीचे औषध जाते. त्यातून हृदयावर, मेंदूवर परिणाम होण्याची भीती वाढते. परंतु, सोनोग्राफी मशीनच्या मदतीने भुलीचे इंजेक्शन योग्य ठिकाणी, योग्य प्रकारे देणे शक्य झाले आहे. - प्रा. डॉ. राजश्री विरशीद- सोनवणे

Hello Chhatrapati Sambhajinagar
Page No. 4 Feb 06, 2024
Powered by: erelego.com



या संस्थेत बधिरीकरणशास्त्र विभागाची स्थापना सन १९६१ साली झाली. सद्य:स्थितीत डॉ. गायत्री तडवळकर या विभागाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळीत आहेत. या विभागात अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांची एकूण संख्या १०० पेक्षा अधिक आहे.

या विभागामार्फत सर्जरी, गायनिक, ऑर्थो, ईएनटी, डेंटल, रेडिऑलॉजी, नेत्रशल्य, जनरल ओपीडी, पेन ओपीडी, कॅन्सर शस्त्रक्रिया व अतिविशेषोपचार, पल्मोनॉलॉजी, सायकॅट्री, आयसीयू आणि डीआरपी (जिल्हा निवासी कार्यक्रम) इत्यादी विभागांतील बधिरीकरणशास्त्रविषयक रुग्णसेवा (एका वर्षात सुमारे १८,००० ते २०,०००) दिली जाते.

गतवर्षीपासून बधिरीकरणशास्त्र विभागांतर्गत स्वतंत्र वेदनाशमन बाह्यरुग्ण व वेदनाशमन प्रक्रिया केल्या जात आहेत.

दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक बधिरीकरण दिनानिमित्त जनजागृती व शैक्षणिक कार्यकमांचे नियमित आयोजन केले जाते.

शैक्षणिक उपक्रमांतर्गत पदवीपूर्व, पदव्युत्तर, आंतरवासिता, ऑपरेशन थिएटर तंत्रज्ञ व नर्सिंग इ. विद्यार्थ्यांना बधिरीकरणविषयक प्रशिक्षण दिले जाते.

संस्थेतील ऑक्सिजनचे नियोजन व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेचे कामकाज बधिरीकरणशास्त्र विभागातर्फे केले जाते.

विभागातील कार्यरत अध्यापक वर्ग संस्थेतील समिती सदस्य व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी वैद्यकीय पथकांमध्ये सेवा देतात.

विभागातील सर्व कामकाजासाठी मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचे वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन व भक्कम पाठिंब्यामुळे सुकर होते.

मा.डॉ. शिवाजी सुक्रे यांनी बधिरीकरणशास्त्र विभागाला आधुनिक यंत्रसामुग्री व औषधी वेळोवेळी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे हा विभाग झपाट्याने प्रगती करीत आहे.

मा.डॉ. शिवाजी सुक्रे यांचे संस्थेचा सर्वांगीण विकास करून संस्थेला प्रसिद्धीच्या शिखरावर नेण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी या विभागातील अध्यापक व कर्मचारी अहोरात्र प्रयत्नरत आहेत.

डॉ. गायत्री तडवळकर
प्राध्यापक व विभागप्रमुख,
बधिरीकरणशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर.

# अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग

## Orthopaedics Department




मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी नवीन अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागाच्या इमारतीचे व नूतन शस्त्रक्रियागाराचे उद्घाटन करताना



### डॉ. शिवाजी सुक्रे यांचे असलेले जिव्हाळ्याचे नाते

एक वर्षाच्या कालावधीत मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी आपल्या रुग्णालयाचा कायापालट केला आहे. अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागाच्या वतीने सांगायचे झाले तर नवीन अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागाच्या इमारतीचे नूतनीकरणासाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचबरोबर अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असे शस्त्रक्रियागृह उपलब्ध करून रुग्णसेवेला चालना मिळाली. त्यामुळे लांबणीवर पडलेल्या शस्त्रक्रिया प्रगतीपथावर आल्या आहेत. शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य इम्प्लांट योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिल्यामुळे अत्याधुनिक शस्त्रक्रिया पार पडत आहेत.

डॉ. सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या ६ महिन्यांमध्ये घाटी रुग्णालयामध्ये १०० हून अधिक सांधेप्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत व त्याचबरोबर मणक्याच्या गुंतागुतीच्या शस्त्रक्रिया देखील करण्यात येत आहेत. तसेच डॉ. सुक्रे यांच्या प्रयत्नांमुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थ्रोस्कोप विभागास उपलब्ध झाले आहे. त्यामुळे आम्ही आमच्या ऑपरेशन थिएटरमध्ये विविध आर्थ्रो स्कोपिक शस्त्रक्रिया करत आहोत. डॉ. सुक्रे यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे वेगवेगळ्या संशोधन कार्यात देखील अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागाने लक्षणीय छाप पाडली आहे.




डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या प्रयत्नांमुळे २० वर्षापासून प्रलंबित असलेला अस्थिव्यंगोपचारशास्त्राच्या वेगळ्या शस्त्रक्रियागृहाचा प्रश्न मार्गी लागला.



डॉ. शिवाजी सुक्रे यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे स्मिथ व नेफ्यूच्या (4K) आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थ्रोस्कोप उपलब्धतेमुळे खांदा, गुडघ्याच्या विविध आर्थ्रोस्कोपिक शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे.



अस्थिव्यंगोपचार शास्त्र विभागाच्या नवीन इमारतीत शस्त्रक्रियागृहाच्या उद्घाटना समारंभी मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. चंद्रकांत थोरात, डॉ. एम.एन.कपाहटिया, विभागप्रमुख डॉ. मारुती लिंगायत, डॉ. अनिल धुळे, डॉ. प्रसाद देशपांडे, डॉ. भारत सोनवणे, डॉ. शिराज बेग.





अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. बी. लिंगायत राष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठित WIROC कॉन्फरन्स मध्ये व्याख्यान देताना. तसेच अस्थिव्यंगोपचार शास्त्र विभागाचे पथकप्रमुख डॉ. अनिल धुळे आणि डॉ. मुक्तदिर अन्सारी राज्यस्तरीय कॉन्फरन्स मध्ये व्याख्यान देताना. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या परिषदेमध्ये अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. दिनेश धायतडक सहभाग घेताना. तसेच राज्यस्तरीय परिषदेमध्ये पोर्स्टर प्रसेंटेशन अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. स्वप्निल पाटील याने द्वितीय पारितोषिक पटकावले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग आणि क्योर इंडिया यांच्या संयुक्त उपक्रमात क्लबफूट या जन्मजात पायच्या विकारावर एक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रशिक्षण प्रमुख डॉ. विकास गुप्ता सर व डॉ. भानू सर यांना आमंत्रण देण्यात आले. माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यासाठी देखील डॉ. सुक्रे यांचे मार्गदर्शन आम्हाला लाभले.

अशा प्रकारे घाटी रुग्णालयात विविध कामांना चालना दिल्याने रुग्णसेवाला गती मिळाली. अधिष्ठातांच्या अहोरात्र काम करण्याच्या सवयीतुन आम्हा सर्वांना देखील प्रेरणा मिळाली. सरांनी शिस्त, रिसर्च आणि नवनिर्मिती यांची संगत घालून रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा हे बिरुदच जणू घाटी रुग्णालयात रुजवले आहे. डॉ. शिवाजी सुक्रे हे सहसंचालक पदावर रुजू झाल्याने आमच्या सर्वांची छाती देखील अभिमानाने फुलून गेली आहे. ते त्यांच्या कामाद्वारे त्या पदाची देखील उंची वाढवतील अस आम्हाला विश्वास आहे. सरांच्या पुढील वाटचलीसाठी अस्थीव्यंग विभागाद्वारे खूप खूप शुभेच्छा.



मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सरांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील अधिष्ठाता पदाचा कार्यभार स्वीकारून एक वर्ष पूर्ण होईल. आपल्या सर्वांसाठी अभिमानाची व आनंदाची गोष्ट म्हणजे नुकतेच सरांनी वैद्यकीय शिक्षण सहसंचालक पदाचा कार्यभार हाती घेतला आहे.

मा. डॉ. शिवाजी सुक्रे सर नेहमीच आपल्या सर्वांसाठी एक प्रेरणास्त्रोत राहिले आहेत. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे सर्जनशीलता व शैक्षणिक उत्कृष्टतेला चालना देणारे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे अतूट समर्पण व दूरदर्शी नेतृत्व हे आपल्या संस्थेला आकार देण्यास कारणीभूत ठरले आहे.

त्यांच्या कार्यकाळात आपल्या संस्थेने एक नवी उंची गाठली आहे. त्यांनी कायमच कामाप्रती सर्मपन व नाविन्यास शाबासकीची थाप दिलेली आहे. त्यांचा शिस्तप्रिय स्वभाव, रुग्णाविषयीची संवेदनशील भावना ही त्यांची वेगळी ओळख निर्माण करते. तसेच त्यांची संशोधन व सामुदायिक सेवेसाठी असलेली वचनबद्धता याने रुग्णसेवेला वेगळी चालना मिळालेली आहे. या वैद्यकीय महाविद्यालयातील माझा सहकारी आज उच्च पदावर कार्यरत आहे याचा मला खूप अभिमान आहे.

डॉ. एम.बी. लिंगायत,<br>
प्राध्यापक व विभागप्रमुख<br>
अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग,<br>
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,<br>
छत्रपती संभाजीनगर.<br>
अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग आणि मा. अधिष्ठाता



# मनोविकृती चिकित्साशास्त्र विभाग

## Psychiatry Department





डॉ. शिवाजी सुक्रे, मा. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संवेदनशील स्वभावाची अनुभूति, मनोविकृती चिकित्सा शास्त्र विभागाने, अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी घेतलेल्या दोन निर्णयात आली.

सर्व प्रथम, दूर गाव खेड्यावरून येणार्या मनोविकाराने त्रासलेल्या, परंतु स्थिर असलेल्या रुग्णांसाठी, एक महिना औषधी देण्याच्या सूचना ओ.पी.डी फार्मसी ला दिल्या. या निर्णयात, अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी, दीर्घ काळ गंभीर मनोविकाराने पिढीत असलेल्या स्थिर रुग्णांची होणारी सोय बघितली व दर ७ – ते – १५ दिवसाला गोळ्या मिळविण्यासाठी दूर दुरून चकरा मारण्याची वेळ आणि पैसे खर्च करण्याचे प्रसंग टाळले. दुसरे महत्त्वाचे म्हणजे, मनोविकृती ने पिडीत व अस्थिर असलेल्या रुग्णांच्या उपचारासाठी हक्काचा सुरक्षित आंतर रुग्ण विभाग, मकयी गेट जवळ वॉर्ड क्र. ८ -९ नूतनीकरण रूपाने उपलब्ध करून दिला. सदर वॉर्ड क्र. ८ – ९ चे नूतनीकरण सुरू असते वेळी स्वतः लक्ष घालून, पाठपुरावा करत यंत्रणेकडून चांगल्या दर्जाचे काम पूर्ण होत असल्याची खातरजमा करून घेतली.

मनोविकाराने त्रासलेल्या लोकांच्या वैद्यकीय गरजा सहजपणे समजून घेत, त्या पूर्ण करण्याची खंबीर आणि विश्वासू भूमिका घेणारे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, मनोविकृती चिकित्सा विभागाच्या रुग्णसेवेच्या वाटचालीत सन २०२३-२४ मध्ये अत्यंत महत्त्वाचे केंद्र असल्याची अनुभूति झाली.







नूतणीकरण झालेले कक्ष



मला ज्ञात झालेले ऊर्जावंत व्यक्तिमत्त्व
– डॉ. शिवाजी सुक्रे

शासकिय अधिकारी हे ऊर्जा पूर्ण व्यक्तिमत्त्व असले की, प्रशासनात येणारी गती आणि दिसणारे जादुई परिणाम, ही समीकरणे अस्तित्वात येताना साक्षात दर्शन देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेतील विद्यमान अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर.

धडाडी, मैत्री, प्रसंगी कठोरता तसेच संवेदनशील दृष्टी, रुग्णांच्या प्रति तळमळ, नीट निटके पणाची आवड, सर्वे कसे व्यवस्थित असावे हा ध्यास घेऊन शासकीय यंत्रणेशी झटण्याची आणि परिणाम मिळविण्याची मनीषा असणारे व्यक्तिमत्त्व संस्थेला लाभणे हा दुर्मिळ योग जुळून आला आणि घाटी चा काया पालट सुरू झाला.

रुग्ण केंद्र स्थानी ठेऊन सर्वे विकास कामांना गती मिळाली. निसर्गाने दिलेले व्यक्तिमत्त्व पूर्ण पणे ध्येय वेडात कसे वाहिले जाते याचे जिवंत उदाहरण म्हणजे डॉ. शिवाजी सुक्रे.

न कळत प्रशासकीय जगात पण शिकायला संधी देणाऱ्या डॉ. सुक्रे सरांच्या कामाला सलाम करत, सरांना अनेक शुभ कार्यासाठी बेस्ट विशेस देतो.

डॉ.प्रसाद देशपांडे
प्राध्यापक व विभाग प्रमुख
मनोविकार शास्त्र

# श्वसन विकार शास्त्र
## Respiratory Medicine







एक्स्ट्रापल्मोनरी टयूबरक्युलोसिस या विषयावर सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या सहकार्याने सीएमई आयोजित करण्यात आली.

**लोकमत**

# घाटीत 'एमडी रेस्पिरेटरी मेडिसिन' अभ्यासक्रम

## ६८ वर्षे लागली : ५ जागांवर होणार प्रवेशप्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) तब्बल ६८ वर्षांनंतर 'एमडी रेस्पिरेटरी मेडिसिन' अभ्यासक्रम सुरू होत आहे. या अभ्यासक्रमाच्या ५ जागांसाठी याचवर्षी प्रवेशप्रक्रिया होणार आहे. त्यामुळे घाटीतील 'पीजी'च्या जागा वाढल्याने श्वसनविकाराच्या रुग्णांच्या उपचारातही वाढ होईल.

एमडी रेस्पिरेटरी मेडिसिनच्या ५ जागा वाढल्याने क्षयरोगाचे तसेच छाती आणि श्वसनविकाराच्या रुग्णांचे उपचार अधिक सुलभ होतील. शिवाय श्वसनविकारशास्त्र विभागही बळकट होणार आहे. विभागप्रमुख डॉ. अविनाश लांब यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्यअधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांच्या हस्ते बुधवारी डॉ. लांब यांचा सत्कार करण्यात आला.

### सर्व विषयांत 'पीजी'

एमडी रेस्पिरेटरी मेडिसिनचा मार्ग मोकळा झाल्याने आता घाटीत सर्व २९ विषयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. घाटीची यातून आणखी एक नवी ओळख निर्माण होणार आहे.

### दुसऱ्या, तिसऱ्या राउंडमध्ये प्रवेशप्रक्रिया



मराठवाड्यात नांदेड आणि अंबाजोगाई येथे एमडी रेस्पिरेटरी मेडिसिन अभ्यासक्रम सुरु होता. मात्र, अखेर हा अभ्यासक्रम आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातही (घाटी) सुरु होत आहे. याचवर्षी प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या आणि अथवा तिसऱ्या राउंडमध्ये एमडी रेस्पिरेटरी मेडिसिनसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातील. यामुळे डॉक्टरांची संख्यावाढीसह रुग्णसेवेलाही हातभार लागेल.

**- डॉ. अविनाश लांब,**
श्वसनविकारशास्त्र विभागप्रमुख, घाटी

Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 3 Nov 28, 2024
Powered by: erelego.com

# तीन सुपरस्पेशालिटी, एक पीजी अभ्यासक्रमाला मान्यता

## 'घाटी'त आनंदोत्सव : राज्य कर्करोग संस्था, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला यश

सकाळचे आहे लक्ष



**कर्करोग रुग्णालयात पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेशाची संधी**

**सध्या सुरू असलेले अभ्यासक्रम**

**एम.डी. रेस्पिरेटरी मेडिसिनच्या पाच जागा मंजूर**



मी श्वसनविकारशास्त्र विभागात फेब्रुवारी २०१९ मध्ये प्राध्यापक या पदावर कार्यरत झालो. २०20 मध्ये श्वसनविकारशास्त्र विभागात एमडी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाला आवेदन करण्यात आले होते. परंतू काही त्रुटी असल्यामुळे मान्यता मिळाली नाही.

नंतरचे २-३ वर्षे कोविड मध्ये गेली. २०२३ मध्ये विभागात परत एमडी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडे आवेदन केले. डॉ. शिवाजी सुक्रे अधिष्ठाता हे ज्या दिवशी रूजू झाले त्याचदिवशी त्यांनी बैठकीत विचारले की तुमच्या विभागात एमडी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी काय अडचणी आहेत. सहयोगी प्राध्यापकाची कमतरता आहे हे निदर्शनास आणुन दिले तेंव्हा अधिष्ठातांनी तात्काळ वरिष्ठ कार्यालयाला एक सहयोगी प्राध्यापक श्वसनविकारशास्त्र विभागाचे पद भरण्यासाठी पत्र पाठवले.

जेंव्हा जेंव्हा अधिष्ठाता हे संचालक, आयुक्त, प्रधान सचिव यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्यालयीन कामकाजासाठी महाविद्यालयात बैठक घेतली त्यावेळी त्यावेळी अधिष्ठातांनी सहयोगी प्राध्यापक श्वसनविकारशास्त्र हे पद भरण्यासाठी वरिष्ठांना विनंती केली.

दरम्यानच्या काळात राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने काहीं त्रुटीमुळे एमडी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी नाकारली. अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांनी त्यांच्या नंदुरबार, अंबेजोगाई, परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रशासकीय अनुभवावरुन लागलीच भारत सरकार स्वास्थ एवं परिवार कल्याण मंत्रालयाकडे द्वितीय अपील करण्यासाठी आदेशित केले. काही दिवसात द्वितीय अपील संदर्भात ऑनलाइन हियरींग जॉईन करण्यासाठी केंद्रशासनाकडून ईमेलद्वारे १५ मिनटे आधी दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल असे सांगितले. द्वितीय हियरींगच्या दिवशी अधिष्ठाता सकाळी ९ ते संध्याकाळी ६:३० पर्यंत अपील पूर्ण होईपर्यत एकाच जागी बसून महाविद्यालय व रुग्णालयातील सर्व कार्यक्रम रद्द करुन, कार्यालयीन कामकाज तेथूनच केले. त्या हियरींगमध्ये अधिष्ठातांनी स्वतः हून श्वसनविकारशास्त्र विभागाची सर्व माहिती सादर केली.

माझ्या विभागात एमडी अभ्यासक्रम चालू करण्याची इच्छा व तळमळ जेवढी माझी होती तेवढीच ईच्छा, तळमळ व दृढनिश्चय अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांचा दिसला.

दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ९: ४५ दरम्यान भारत सरकार स्वास्थ एवं परिवार कल्याण मंत्रालय यांचे लेटर ऑफ परमिशनचा ईमेल आला, ही बातमी देण्यासाठी मी अधिष्ठाता यांना कॉल केला तेंव्हा सरांच्या आवाजातील आनंद मला जाणवला आणि मी सरांना म्हणालो तुम्हीं माझ्या विभागासाठी परिसस्पर्श ठरले आहात.

डॉ. अविनाश लांब
प्राध्यापक व विभागप्रमुख श्वसनविकार शास्त्र भाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर

# वार्धक्य शास्त्र विभाग

## Geriatrics Department




ज्येष्ठ जागरिक दिनानिमित्त जिरियाट्रिक्स विभाग शा. वै. म. छत्रपती संभाजीनगर तर्फे भरवण्यात आलेल्या पोस्टर प्रर्दशन प्रसंगी डॉ. शिवाजी सुक्रे, अधिष्ठाता.



मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनासाठी खाली मतदान जनजागृतीचे रांगोळी व पोस्टर स्पर्धेचे उद्घाटन







मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या तर्फे जिरियाट्रिक्स विभागातील गुणवंत विद्यार्थीचे अभिनंदन करण्यात आले.




मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांची सहसंचालक (अतिरिक्त पदभार) पदी निवड निवड झाल्याबद्दल जिरियाट्रिक्स विभागातर्फे अभिनंदन



डॉ. शिवाजी सुक्रे सरांना मी त्यांच्या विद्यार्थी दशे पासून पाहिले आहे. सर्वांशी विनम्रतेने बोलणे,सन्मानाने वागविणे -आणि सकारात्मकताहा त्यांचा मूळ स्वभाव आहे. त्यांना शरीररचना शास्त्राचे अध्यापक, वैद्यकीय अधीक्षक, उप-अधिष्ठाता आणि ५ वर्षांपासून अधिष्ठाता - अश्या वेग वेगळ्या भूमिका आणि पदे मोठ्या मेहनतीने आणि शिस्ती ने निभावताना आपण पाहिले आहे. स्वछता, टाप टीप पण, कलात्मकता त्यांना म नापासून आवडतात आणि त्यामुळेच त्यांनी घाटी रुग्णालयाच्या स्वचछते कडे आणि त्याला एक 'कॉर्पोरेट लुक' यावा यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

औषधांची उपलब्धता प्रचंड प्रमाणात वाढविल्या मुळे त्यांचे सर्व स्तरावर कौतुक होते आहे. त्यांच्या कामाचा आवाका बघून आम च्या सारख्यां ना सुद्धा प्रेरणा मिळते. केवळ रुग्णच नाही, तर विद्यार्थ्यांना सुद्धा चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात, यासाठी ते झटत असतात.

ते अत्यंत महत्त्वाकांक्षी आहेत आणि ध्येय डोळ्या समोर ठेवून जीवापाड परिश्रम घेतात. त्यांनी महाविद्यालयात अनेक परिषदा आणि शैक्षणिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या इतके एमसि आय ची निरीक्षणे क्वचितच कुणी केली असतील ! त्या भक्कम अनुभवा मुळे आपल्या महाविद्यालयाच्या एम सि आय /एन एम् सि टीम आणि विभागांच्या प्रयत्नांनी अनेक नवीन ब्रॉड व सुपर स्पेंश्यालीटी अभ्यासक्रमांना या वर्षी मान्यता मिळाली आहे. विद्यार्थी व रुग्ण हित या साठी सदैव तत्पर असलेल्या अधिष्ठाता मा. सुक्रे सर यांच्या पुडील वाटचाली साठी मनापासून आशीर्वाद.

डॉ. मंगला बोरकर
प्राध्यापक, वार्धक्यशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर

# मनोगत



श्रीकृष्ण ने साफ कहा है कि, बस कर्म तुम्हारा कल होगा
और कर्म अगर सच्चाई है, तो कर्म कहाँ निष्फल होगा!
हर एक मुश्किल का हल होगा, वो आज नहीं तो कल होगा !!

माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सरांबद्दल शब्दात बोलायचे झालेतर वरील ओळींप्रमाणे त्यांचे कार्य व व्यक्तिमत्त्व दिसून येईल. जिरियाट्रिक्स (वार्धक्यशास्त्र विभाग) हा जेष्ठ नागरिकांच्या (६0 वर्षे व त्यावरील)आरोग्याशी संबंधित आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या विशिष्ट आजारांची व आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिरियाट्रिक्स विभाग हीकाळाची गरज आहे. ही गरज लक्षात घेऊन तत्कालीन विभागप्रमुख डॉ. मंगला बोरकरयांनी जिरियाट्रिक्स विभाग स्थापन करण्याची संकल्पना आखली. त्यानंतर पुढे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथेशासकीय वैद्यकीय महाविद्यालयात महाराष्ट्रातील पहिला व देशातीलतिसरा जिरियाट्रिक्स विभाग स्थापन झाला. हा जिरियाट्रिक्स विभागस्थापन करण्यासाठी मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांचा मोलाचावाटा आहे. २०१७ साली जिरीयाट्रिक्स विभागाला शासनाकडून मान्यता मिळाली. त्यानंतर लगेच जुलै महिन्यात भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरीक्षण अपेक्षित होते परंतु जिरीयाट्रिक्स विभागास स्वतंत्र कक्षच नव्हता. मेडिसिन बिल्डिंगच्या तिसऱ्या मजल्यावर तीन कक्ष रिकामे होते; पण ते अतिशयदयनीय स्थितीत होते. आम्हाला कक्ष मंजूरी साठीखूप अडचणी येतहोत्या. त्यावेळी मा. डॉ. शिवाजी सुक्रे हे उपवैद्यकीय अधीक्षक होते आणि सगळे चतुर्थश्रेणी कर्मचारी त्यांच्या अधिनिस्त होते. त्यांनी कक्षाची गरजलक्षात घेऊन ताबडतोब चतुर्थक्षेणी कर्मचाऱ्यांचा आदेश देऊन पूर्ण स्वच्छता करून घेतली व सामाजिक बांधकाम विभागाकडून युद्धपातळीवर कक्ष संवर्धन करून दिले.

सन २०१७ साली भारतीय आयुर्विज्ञान परिषद निरिक्षणासाठी जिरियाट्रिक्स विभागास कक्ष मिळवून देणे व निरिक्षण चांगल्या प्रकारे पार पडण्यामध्ये सरांचे अमूल्य योगदान आहे. त्यावेळी (मा. डॉ. शिवाजी सुक्रे सर त्यावेळी उपअधिष्ठाता व एम.सी.आय. कमिटीचे अध्यक्ष होते.)

रुग्णसेवा, प्रशासन, निवासी डॉक्टरांच्या समस्या, कक्षातील विविध अडचणींसाठी मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सरांचे तेव्हापासून आजपर्यंत निरंतर मार्गदर्शन व मदत मिळत आली आहे.

डॉ. शैलजा राव

सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख


जिरियाट्रिक्स विभाग

# राज्य कर्करोग रुग्णालय

## State Cancer Hospital



# मनोगत



रुग्णहितदक्ष, निष्णात प्रशासक, बहुआयामी संघर्षनायक मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे

डॉ. शिवाजी सुक्रे एक असामान्य प्रतिमेचे, अत्यंत दिलखुलास व कर्तव्यपूर्तीसाठी कठोर परिश्रम करणारे व्यक्ती आहेत. त्यांच्या बद्दल सविस्तर लिहिण्याचे ठरले तर मोठा ग्रंथ लिहावा लागेल असे त्यांचे अनेक क्षेत्रातील कर्तुत्व आहे. अगदी मोजक्या शब्दात त्यांच्या बद्दल लिहित आहे.

डॉ. शिवाजी सुक्रे यांना मी विद्यार्थीदशे पासून ओळखतो. एक मित्र म्हणून आमची मैत्री मागील तीन दशकांपासून आहे. विद्यार्थीदशेपासूनच ते कुशल संघटक, उत्कृष्ट वक्ते तथा सर्व कसोट्यांना लिलया सांभाळणारे, नेतृत्व देणारे नेते म्हणून विकसित होणारे व्यक्ती म्हणून मी त्यांना जवळून पाहिले आहे. डॉ. आंबेडकर मेडिकोज असोसिएशनचे अध्यक्ष मार्ड चे प्रमुख नेते, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आहेत. वैद्यकीय विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी व वैद्यकीय शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेले ते महाराष्ट्रातील एकमेव अधिष्ठाता आहेत अशी माझी खात्री आहे.

मी त्यांना संघर्षनायक म्हणून संबोधतो हालाखीची परिस्थिती असून सुद्धा हजारो रुग्णांना २४ तास मदत करणारे ते एक कारुण्यसागर आहेत. कोणताही रुग्ण असो ते त्यांना मदत करणारच घाटी औषधीचिठ्ठी मुक्त करणारा मुक्तिदाता म्हणून ते प्रशंसेस पात्र आहेत. आम्ही अनेक अधिष्ठातांचे प्रशासन जवळून पाहिले; परंतु या सम हेच असे आहेत.

एक मित्र म्हणून मैफिल रंगतदार करण्यात त्यांची स्वतःची शैली आहे. आम्ही त्यांना प्रेमाने ग्रामिण कथाकार म्हणतो उपमा देऊन उदाहरणे देउन हसत हसत बोलण्याची शैली ही अतिशय नैसर्गिक त्यांना लाभली आहे.

घाटी रुग्णालयाचा सर्वार्थाने कायापालट करणारे ते जादूगार आहेत. स्वच्छता, टापटिपपणा, नेटकेपणा, वक्तशीरपणा, सुशोभिकरण एकंदरीतच त्यांच्या जगण्याची साक्ष देते. त्यांच्या परिसस्पर्शाने त्यांनी नंदुरबार, अंबाजोगाई, परभणी व छत्रपती संभाजीनगर येथील वैद्यकीय महाविद्यालयात ऐतिहासीक कामगिरी केली आहे व आपल्या पाउलखुणा उमटवल्या आहेत.

राज्य कर्करोग रुग्णालयाचा विषेश कार्यअधिकारी म्हणून त्यांच्या नेतृत्वात काम करताना, अत्यंत अभिमान वाटतो. कॅन्सर रुग्णांच्या औषधी उपलब्धतेबाबत ते अतिशय दक्षराहून सदैव मदत करतात. कोणत्याही रुग्णास कोणतीही औषधी बाहेरून आणावी लागू नये म्हणून ते सदैव मदत करतात. लवकरच हे रुग्णालयही चिठ्ठीमुक्त करण्याचा विडा त्यांनी उचलला आहे. वर्ग-४ कर्मचारी, वर्ग परिचारिकांचे प्रश्न येथील निवासी डॉक्टरांचे प्रश्न असोत ते त्वरीत सोडवतात. तात्काळ निर्णय घेणे, स्पष्टपणे मत व्यक्त करणे, सत्य बोलणे, कुणाचाही मुलाहिजा न ठेवणे, सामान्य पद्धतीने पारदर्शक प्रशासन करणे, ही त्यांची काही ठळक वैशिष्ठे होत. त्यांच्या काळात शासकीय कर्करोग रुग्णालय या संस्थेत नवीन चार विषयात अतिविषेशोपचार ओटी सुरू झाली. एमसीएच इन हेड नेक सर्जर, एम. सी. एच. इन गायनॅकॉलॉजी, ऑकोलॉजी, डी. एम. इन मेडिकल ऑकोलॉजी डी. एम. इन ऑन्कोपॅथॉलॉजी या विषयात एकूण अनुक्रमे २,४,४, ४ एवढ्या जागांना एन. एम.सी. द्वारे मान्यता मिळाली. अत्यंत कठीण प्रसंगी ते स्वतः सेकंड अपिल प्रस्तूत करण्यासाठी केंद्रसरकारच्या कुटूंब कल्याण मंत्रालयात उपस्थित राहून त्यांनी आपल्या संस्थेची बाजू मांडली व सर्वांना ती पटवून दिली. तसेच टाटा कर्करोग रुग्णालयाचे शैक्षणिक संचालक डॉ. कैलाश शर्मा सर यांनी त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर आपली बाजू मांडली व या मुळे आपणास या जागा मंजूर झाल्या आम्ही या मनःपूर्वक आभारी आहोत. येणाऱ्या काळात पेटस्कॅन, मॉलेक्युलार लॅब, धर्मशाळा व विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल ही त्यांच्या कार्यकाळात पूर्ण होईल याची खात्री वाटते.

एक मित्र म्हणून, सहकारी म्हणनू, ते आमचे अधिष्ठाता आहेत ही अभिमानाची व समाधानाची गोष्ट आयुष्यात आहे याची जाणीव सतत होत असते.

त्यांच्यासाठी हा शेर आये हो निभाने को जब, किरदार जमींपर कुछ ऐसा कर चलोकी, जमाना मिसाल दे त्यांची कारकिर्द भविष्यात ही अशीच बहरत जावो ही प्रार्थना.

डॉ. अरविंद गायकवाड,
विशेषकार्यकारी अधिकारी
शासकीय राज्यकर्करोग संस्था रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर.

# मनोगत



आदरणीय सर,

तुम्ही या संस्थेला समर्पित सेवेचे एक वर्ष पूर्ण करत असताना तुमच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आमच्या कॅन्सर हॉस्पिटलने जी उल्लेखनीय प्रगती साधली आहे त्याबद्दल मी अत्यंत अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त करतो. गेल्या वर्षभरात, रुग्णसेवेतील लक्षणीय प्रगती, कॅन्सर प्रतिबंधक औषधांची उपलब्धता, अनेक प्रलंबित प्रस्तावांचे जलद मार्गी लावणे, मनुष्यबळ वाढवणे आणि आमच्या रुग्णालयाचा अत्याधुनिक ३०० खाटांच्या राज्य कर्करोग संस्थेत विस्तार यामुळे ही संस्था मजबूत झाली आहे.


वैद्यकीय अधीक्षक या नात्याने, विविध सुपरस्पेशालिटी विभागांच्या स्थापनेतील तुमचे योगदान आणि यासाठी तुम्ही घेतलेल्या वैयक्तिक अथक परिश्रमाबद्दल मी विशेष आभार मानू इच्छितो. हे सुपर-स्पेशालिटी कार्यक्रम सुरू झाल्याने रुग्णांच्या सेवेवर मोठा परिणाम होईल. हे कार्यक्रम एक प्रमुख शिक्षण आणि संशोधन संस्था म्हणून रुग्णालयाची प्रतिष्ठा वाढवतील. या जागा मिळवून, तुम्ही केवळ संस्थेचा दर्जा उंचावला नाही तर रुग्णांना सर्वोत्तम उपलब्ध उपचार मिळतील याचीही खात्री केली आहे.

रुग्णाची काळजी, शैक्षणिक उत्कृष्टता आणि संस्थात्मक विकासासाठी तुमच्या समर्पणाने एका वर्षात काय साध्य करता येईल यासाठी तुम्ही एक नवीन बेंचमार्क सेट केला आहे.

तुम्हाला चांगले आरोग्य आणि उत्कृष्ट भविष्यासाठी शुभेच्छा.

डॉ. दर्पण जक्कल
वैद्यकीय अधीक्षक,
राज्य कर्करोग संस्था

# मनोगत



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर संस्थेचा कार्यभार मा. अधिष्ठाता, डॉ. एस. बी. सुक्रे सर यांनी स्वीकारून दि. २१ डिसेंबर २०२४ रोजी एक वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे. त्या बद्दल मेडीकल ऑन्कोलॉजी विभागातर्फे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांचे हार्दीक अभिनंदन.

मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सरांनी मेडीकल ऑन्कोलॉजी या विषयात D.M.Medical Oncology हा अतिविशेषोपचार अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्याकरिता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली व केंद्र शासन यांच्या कडे केलेल्या यशस्वी प्रयत्नांमुळे शैक्षणीक वर्ष २०२४-२५ करिता D.M. Medical Oncology या अतिविशेषोपचार अभ्यासक्रम ाच्या ०४ जागां करिता मान्यता मिळाली आहे.

तसेच या विषयात राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार लागणाऱ्या अध्यापकांची आपण आपल्या स्तरावरून तसेच मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे स्तरावरून नियुक्ती केली असल्यामुळे वरील अभ्यासक्रम चालू करू करण्यास मोलाची मदत झाली. या विभागात येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना आवश्यक असणारी सर्व औषधी आपल्या प्रयत्नांमुळे उपलब्ध झाली आहेत.

या रुग्णालयामध्ये १६५ खाटा नव्याने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच रुग्ण सेवे करिता लागणारी विविध उपकरणे आपण उपलब्ध करून दिलेली आहेत. त्यामुळे गरजू रुग्णांना नितांत मदत झाली आहे. वरील बाबींकरिता मेडीकल ऑन्कोलॉजी विभाग आदरनीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सरांचा अत्यंत आभारी आहे, सरांच्या पुढील वाटचालीस या विभागातर्फे हार्दीक शुभेच्छा.

डॉ. प्रभाकर जिरवणकर
प्राध्यापक व विभागप्रमुख मेडीकल ऑन्कोलॉजी विभाग
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर.

# कर्करोग विभाग

## ONCOLOGY DEPARTMENT



हडको गणेश मंडळ येथील आरोग्य शिबिरास मा. डॉ. सुक्रे व मा. डॉ. अरविंद गायकवाड यांची भेट



आरोग्य शिबिरामध्ये मा. डॉ. शिवाजी सुक्रे हे रुग्णांची आस्थेवाईक पणे चौकशी करताना




हीलिंग हार्मनी या कर्करोग रुग्णांसाठी आयोजित कार्यक्रम प्रसंगी माननीय डॉ. शिवाजी सुक्रे डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. एल.एस. देशमुख, डॉ. अनघा वरुडकर, डॉ. विनोद मुंदडा, डॉ. ऋषिकेश खाडिलकर व डॉ.वसंत पवार.

शासकीय कर्करोग रुग्णालयामध्ये कर्करोग प्रतिबंधक व समाजसेवा विभागातर्फे माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व माननीय विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड सर यांच्या पुढाकाराने नियमितपणे छत्रपती संभाजीनगरच्या विविध भागात उदाहरणार्थ शाळा,महाविद्यालये, कार्यालये, विविध संस्था, गणेश मंडळे, ग्रामीण भाग, शहरी भागातील, समाज मंदिरे झोपडपट्ट्या औद्योगिक वसाहती इत्यादी मध्ये कर्करोग जनजागृती वर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले तसेच निरंतर कर्करोग निदान शिबिरांचेही आयोजन करण्यात आलेले आहे. धूम्रपान व तंबाखू पासून व्यसनमुक्ती मिळवण्यासाठी करावयाच्या उपायोजना यावर डॉक्टरांसाठी कार्यशाळेचे सुद्धा आयोजन करण्यात आले. याचबरोबर या विभागामार्फत गरजू व गरीब रुग्णांना विविध सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तीं मार्फत मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले तसेच रुग्णांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत या योजनांबाबत माहिती देण्यात आली.

कर्करोगाच्या जनजागृतीसाठी, ४ फेब्रुवारी जागतिक कर्करोग दिन शासकीय कर्करोग रुग्णालय वर्धापन दिन याचे औचित्य साधून विविध शाळा महाविद्यालय व ग्रामीण भागात शिबिरांचे व जनजागृती चे कार्यक्रम घेण्यात आले. कर्करोग पीडित रुग्ण व नातेवाइकांसाठी त्यांचे दुःख हलके व्हावे व वेदना कमी होण्याच्या साठी डॉ. कैलाश शर्मा सर संचालक टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई यांच्या सहकार्यातून हीलिंग हार्मोनी हा संगीताचा कार्यक्रम डॉ. शेखर कुलकर्णी यांनी सादर केला.

राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष माननीय उपमुख्यमंत्री (ग्रह/विधी व न्याय यांचे कार्यालय) व वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग व निरामय सेवा फाउंडेशन च्या समन्वयाने सप्टेंबर व ऑक्टोबर २०२४ या दोन महिन्यांमध्ये मा. अधिष्ठाता डॉ. सुक्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर व शासकीय कर्करोग रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्यातून १९ रोगनिदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले या शिबिरांमध्ये एकूण २१२८ रुग्णांची तपासणी करण्यात आली व त्यांच्यावर आवश्यक ते उपचार शिबीर स्थळी औषधी देऊन करण्यात आले. शिबिराच्या ठिकाणीच ५८६ रुग्णांची रक्त तपासणी व ३८५ रुग्णांची ईसीजी ची तपासणी सुद्धा करण्यात आली. १५३ रुग्णांना पुढील तपासण्या व उपचारांसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे संदर्भित करण्यात आले.

डॉ. ऋषीकेश अरविंदराव खाडिलकर
सहयोगी प्राध्यापक,
शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

# सूक्ष्मजीवशास्त्र विभाग
## Microbiology Department



१. सूक्ष्मजीवशास्त्र विभागात विविध प्रकारचे नमुणे जसे की रक्त, पु,लघवी,जखमेवरचा स्वॅब ईत्यादी हया सर्व प्रकार च्या नमुण्याची culture sensitivity करण्यात येते.
२. शस्त्रक्रियागारांचे निर्जंतुकीकरण योग्य पद्धतीने झाले की नाही याची देखील चाचणी केली जाते.
३. जैविक घन कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याचे योग्य त्या पदद्धतीने विल्हेवाट लावण्याचे प्रशिक्षण स्टाफ व चतुर्थश्रेणी कर्मचारी वेळोवेळी देण्यात येते.
४. कर्करोग रुग्णांची प्रतिकारशक्ती कमी झालेली असल्याने त्यांना कुठल्याही जंतु प्रादुर्भाव होऊ नये त्या बाबतीची खबरदारी घेण्यास सांगितली जाते जसे की हॅंडहाजीन व मास्क चा योग्य तो वापर करण्यासाठी शिकविले जाते.
५. १८ नोव्हेंबर ते २४नोव्हेंबर दरम्यान प्रतिजैविकांचा प्रतिकार कमी करण्यासाठी रुग्णांना व त्यांच्या नातेवाइकांना पोस्टर द्वारे जन जाग्रती केली.



राज्य कर्करोग रुग्णालय सूक्ष्म जीवशास्त्र विभागाची कार्यशाळा

# क्ष-किरणशास्त्र विभाग
## DEPARTMENT OF RADIODIAGNOSIS



माननीय अधिष्ठाता डॉ. सुक्रे सर,

आपल्या कार्यकाळात संस्थेमध्ये आमूलाग्र बदल जाणवत आहेत, काम करणाऱ्यांना कौतुकाची थाप तसेच कामचुकार कर्मचाऱ्यांमधे भिती आहे. आपल्यासोबत काम करताना उत्साहाचे वातावरण असते, तसेच हाती घेतलेले काम पूर्णत्वास जाणार हा आत्मविश्वास असतो. आपल्या कारकीर्दीत कर्करोग रुग्णालयात क्ष किरणशास्त्र विभागात अतिशय अद्ययावत यंत्रसामुग्री प्रस्थापित होत आहे त्यामध्ये 128 slice CT SCAN, DIGITAL MAMMOGRAFY, ULTRASONOGRAFY प्राप्त झाली आहेत त्यामुळे याचा लाभ कर्करोग पिडीत गरीब रुग्णांना होत आहे. आपली रुग्ण विषयीची तळमळ, विद्यार्थ्यांविषयीचे प्रेम आणि सहकार्याबद्दलची आपुलकी आपल्या कामातून व सौहार्दपूर्ण वागणुकीतून प्रतीत होते. आपण अल्पकालावधीत कॅन्सर केअर रिसर्च आणि उपचारात उच्चांक गाठला आहे. आपल्या कामातून आपण एक आदर्श निर्माण केलेला आहे, आपल्या कार्यासाठी अभिनंदन व शुभेच्छा !

डॉ. अंजली प्रविणकुमार वासडीकर
विभागप्रमुख, क्ष किरणशास्त्र विभाग
शासकीय कर्करोग रुग्णालय छत्रपती संभाजीनगर

# कर्कस्त्रीरोग विभाग

## Department of Gynaecological Oncology

१. डी.एम ऑंकोपॅथॉलॉजी (०४ सीटस) हा सुपरस्पेशलिटी अभ्यासक्रम २०२४-२५ शैक्षणिक वर्षापासून सुरू करणे साठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगा कडुन परवानगी मिळाली.

२. डिजीटल पॅथॉलॉजी या कर्करोग निदानाच्या आधुनिक प्रणालीवर कार्यशाळा यशस्वी रीत्या संपन्न झाली. (दि.१४/१०/२०२४)

३. फ्लोसायटोमीटरही कर्करोग निदानाची आधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध होण्याची प्रकीय पूर्णत्वाकडे.

४. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांचे कडून ऑंकोपॅथॉलॉजीचे अध्यापक म्हणून या विभागातील अध्यापकांना मान्यता प्राप्त झाली आहे.

५. नॅशनल कॅन्सर ग्रीड व टाटा मेमोरीयल हॉस्पिटल यांचे तर्फे होणाऱ्या क्वालीटी कंट्रोल (EQAS) मध्ये या विभागातील हिस्टोपॅथॉलॉजी रिपोर्टींग, टेकनीक व आय.एच.सी. टेस्टींग या चाचण्यां मध्ये ९५ते १००%गुणवत्ता प्राप्त झाली आहे.

६. नवीन अतिविशेष उपचार अभ्यासक्रम MCh गायनॅकॉलॉजीकल ओन्कॉलॉजी या अभ्यासक्रमाला एन एम सी ची मान्यता वर्ष २०२३-२०२४ पासून प्राप्त झाली आहे. दरवर्षी चार विद्यार्थी या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणार आहे. संपूर्ण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मध्ये सर्वात प्रथम सुरू होणारा हा अभ्यासक्रम आहे. संपूर्ण भारतात फक्त दहा कॅन्सर इन्स्टिट्यूट मध्ये हा अभ्यासक्रम सध्या सुरू आहे.

७. गायनॅकॉलॉजीकल ओन्कॉलॉजी या विभागात रोबोटिक सर्जिकल सिस्टीम साठी राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. एक दोन महिन्यात कॅन्सर सर्जरी या रोबोटिक सर्जिकल सिस्टीम द्वारा करण्यात येतील.

८. असोसिएशन ऑफ गायनॅकॉलॉजीक अन्कॉलॉजीस्ट द्वारा प्रकाशित नॅशनल ॲटलास मध्ये GTN ची दुर्मिळ केस प्रकाशित झाली आहे.



अत्यंत धडाडीचे नेतृत्व, व्यक्तिमत्त्वातील निडरपणा, रुग्णांविषयीची तळमळ आणि अत्याधुनिक अद्ययावत तंत्रज्ञानाचा आरोग्य सेवेमधील उपयोग करणारी अशी आहे आदरणीय डॉ. सुक्रे सरांची एक्सप्रेस.. अत्यंत कमी वेळात अशी कॅन्सर हॉस्पिटलची प्रगती फक्त आदरणीय डॉ. सुक्रे सरांनाच शक्य आहे. मागील एका वर्षात नवीन अति विशेष उपचार अभ्यासक्रम एम सी एच गायनॅकॉलॉजीकल ओन्कॉलॉजी या सुपरस्पेशालिटी अभ्यासक्रम ला एनएमसी ची मान्यता मिळाली आहे आणि हे शक्य झालं आहे ते सरांच्या मार्गदर्शनामुळे. रोबोटिक सर्जिकल सिस्टीम चे मान्यता मिळून येत्या एक दोन महिन्यात स्त्री कर्करोग विभागात रुग्णसेवेसाठी उपलब्ध राहील. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा अशीच रुग्णसेवा त्यांच्या हातून अखंडपणे सुरू राहील ईश्वरचरणी अशी प्रार्थना.

डॉ. अर्चना राठोड  
प्राध्यापक व विभागप्रमुख  
स्त्रीरोग कर्करोग विभाग,  
शासकीय कर्करोग रुग्णालय,  
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर



# महिन्यात रोबोटिक सर्जरी

शहरातील सरकारी कर्करुग्णालयांत सर्वप्रथम लाभ

मटा विशेष

एचपीव्ही लस अनुपलब्धच

शासकीय विभागीय कर्करुग्णालयात लवकरच रोबोटिक सर्जरी सुरू होत आहे.

नवीन कर्करोगग्रस्त

विविध कर्करोगांत लाभ



लोकमत

शासकीय कर्करोग रुग्णालय : रोबोटिक सर्जिकल सिस्टम विथ ॲक्सेसरीज खरेदीस मंजुरी

# आता 'रोबोटिक'ने होईल कॅन्सर सर्जरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोणत्या शस्त्रक्रिया होतील?

रोबोटिक सर्जरीचा फायदा

Hello Chhatrapati Sambhajinagar  
Page No. 3 Jul 30, 2024

# कर्करोग शरीर विकृती शास्त्र

## DEPARTMENT OF ONCOPATHOLOGY

१. सर्जिकल ओंकोलोजी विभागात दर वर्षी दोन शस्त्रक्रियागार मध्ये सरासरी ५००ते ६०० मेजर व १०० ते १२० मायनर शस्त्रक्रिया होतात. या वर्षी २२ एप्रिल २०२४ अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी सर्जीकल ओंकोलोजी या अजून एक शस्त्र क्रियागृह निर्माण करून दिल्या मुळे गत वर्षात ७३२ मेजर व १७५ मायनर शस्त्रक्रिया झाल्या.
२. सर्जीकल ओंकोलोजी मध्येओंको- प्लास्टिक सर्जरीचया ४२ फ्री फ्लाप या क्लिष्ट शस्त्रक्रिया प्रथमच येवढ्या प्रमाणात झाल्या
३. या वर्षी ब्रेस्ट कॅन्सर युनिट मध्ये ....... १००... ब्रेस्ट conservative सर्जरी झाल्या.
३. या वर्षी थोरेकोस्कोपि ने अन्ननलिकेच्या कॅन्सरच्या शस्त्रक्रिया सुरू झाल्या व १२ रुग्गांनावर यशस्वी उपचार झाले
४. विभागात या वर्षी लिव्हर रीसेक्षण या लिव्हर व गाल ब्लाडर या कॅन्सरच्या १८ शस्त्रक्रिया यशस्वी
५. सरजिकल ओंकोलोजी विषयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ५ संशोधन प्रबंध वाचले. एका विद्यार्थ्याला राज्यस्तरीय परिषदेमध्ये सर्वोत्कृष्ट पेपर साठी पारितोषक मिळाले.

डॉ. हेमत कोकंडकर
प्राध्यापक व विभागप्रमुख
कर्करोग शरीर विकृती शास्त्र



सामना

आता शासकीय कर्करोग रुग्णालयातही होणार रक्तपेढी

नातेवाईकांची धावपळ थांबणार

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - मराठवाड्यासह महाराष्ट्र भरातून कर्करोगाच्या उपचारासाठी राज्य कर्करोग संस्थेत रुग्ण येतात. यासाठी या शासकीय कर्करोग रुग्णालयात रक्ताची गरज पडल्यास घाटी किंवा इतर खासगी रक्तपेढीकडे धावाधाव करावी लागते. घाटीचे अधिष्ठाता शिवाजी सुक्रे व विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांनी यासंदर्भात आढावा घेतल्यानंतर कर्करोग रुग्णालयात रक्तपेढी उभारण्याचा निर्णय घेतल्याने आता रुग्णांच्या नातेवाईकांची धावपळ थांबणार आहे.

कर्करोग रुग्णालयात १ नोव्हेंबरपासून चिठ्ठीमुक्त रुग्णालय मोहीम सुरू होणार आहे. यादरम्यान आता रुग्णांची वाढणार असल्याने साहजिकच रक्ताची गरज लागणार आहे. यामुळे एकाच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध झाल्यास मोठा फायदा होईल. मोफत उपचार पद्धतीसह आता औषधी व रक्ताच्या पिशव्या मोफत मिळाल्यास रुग्णांच्या नातेवाईकांना दिलासा मिळेल. उपअधिष्ठाता डॉ. भरत सोनवणे यांनी सांगितले की, कर्करोग रुग्णालयात दररोज १५ ते २० रक्ताच्या पिशव्याची गरज असते. तसेच घाटीत ७० पेक्षा जास्त पिशव्याची गरज पडते. त्यामुळे कर्करोग रुग्णाल लवकरच रक्तपेढी उभारल्यास नातेवाईकांची धावपळ थांबेल. कर्करोगाच्या रुग्णांसाठी हे रुग्णालय आशेचा किरण ठरत असून महिन्याला एक ते दीड हजार रुग्ण उपचारासाठी दाखल होतात.

धर्मशाळेसाठी क्रीडा विभागाची जागा ठरेल सोयीची

शासनस्तरावर प्रयत्न केल्यास क्रीडा विभागाची जागा शासकीय कर्करोग रुग्णालयाच्या धर्मशाळेसाठी मिळू शकते. घाटी परिसरात व इतर रुग्णांच्या नातेवाईकांना वाहतुकीचा खर्च परवडत नाही. तसेच स्वयंसेवी संस्थांमुळे अन्नदानाची सोय येथे होते. यामुळे शासनाने ठरवले तर अशक्य नाही. क्रीडा विभागाल विभागीय क्रीडा संकुलात मुबलक जागा उपलब्ध आहेत. त्यामुळे या जागेवर कर्करोग रुग्णाच्या नातेवाईकांना थांबण्यासाठी धर्मशाळा होऊ शकते.

Sambhajinagar Edition Edition
Sep 12, 2024 Page No. 8
Powered by: erelego.com



# कर्कबालरोग विभाग

## Paediatric Oncology



आदरणीय अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांचे बालकर्करोग विभागातर्फे, अधिष्ठाता या नात्याने स्वागत करतांनाचा कार्यक्रम



माननीय अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते शायकीय कर्करोग रुग्णालय येथे सप्टेंबर बालकर्करोग जागरूकता महिना गोल्डन रिबन लाइटनिंगसह साजरा करण्यात आला.



माननीय डीन महोद्यांच्या शुभहस्ते बालकर्करोग विभाग, शासकीय कर्करोग रुग्णालय येथे सप्टेंबर राष्ट्रीय पोषण महिना साजरा



माननीय जैन सर यांच्या हस्ते बालकर्करोग विभागातील मुलांसाठी RMHC फॅमिली रूमचे उद्घाटन आणि माननीय डीन सरांच्या मार्गदर्शनाखाली ICMR इस्कॉल प्रकल्प सुरू झाला.

**लोकमत**

कर्करोग रुग्णालय : फॅमिली रुम- 'डे केअर विथ प्ले रुम'ला मान्यता

### बालकर्करोग रुग्णांवर आता होतील खेळता खेळता उपचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** बालकर्करोगाच्या रुग्णांना शासकीय कर्करोग रुग्णालयात खेळता खेळता उपचार घेता येणार आहे. येथील बालकर्करोग विभागात फॅमिली रूम (डे केअर विथ प्ले रूम) साठी मान्यता दिली आहे. यासंदर्भात गुरुवारी सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली.

शासकीय कर्करोग रुग्णालयातील बालकर्करोग विभागात 'आरएमएचसी' फाऊंडेशनतर्फे हे रूम करण्यात येणार आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, टाटा हॉस्पिटलचे अकॅडमिक डीन डॉ. कैलाश शर्मा, 'आरएमएचसी'चे डायरेक्टर निशित पांडे, बालकर्करोग विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. फारूख अजिज यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार झाला. या उपक्रमासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले, घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, विशेष कार्यअधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. अदिती लिंगायत यांनी परिश्रम घेतले.



सामंजस्य करारावर स्वाक्षरी करताना मान्यवर.

**काय होईल फायदा?** फॅमिली रुममध्ये कर्करोगग्रस्त मुले किमोथेरपी व इतर उपचार घेताना त्यांना विविध खेळ खेळता येतील. त्यांना खेळता खेळता शिक्षणही दिले जाईल. किमोथेरपी देताना होणाऱ्या वेदनांचा विसर पडावा, मुले आनंदी रहावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. याठिकाणी रुग्ण व त्यांच्या पालकांसाठी राहण्याची, भोजनाचीही व्यवस्था राहील.

Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 4 Jun 21, 2024
Powered by: erelego.com

# किरणोपचार विभाग
## Radiation Oncology

**रेडिएशन ऑनकोलॉजी विभागात ट्रू-बिम लिनियर ॲक्सलरेटर ही जागतिक दर्जाची अद्ययावत उपचार प्रणाली कार्यान्वित..**

रेडिएशन ऑनकोलॉजी विभाग वर्ष १९८१ पासून कर्करुग्णांच्या सेवेत आहे. प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ, खांदेश व पश्चिम महाराष्ट्रातील जवळपास १४ जिल्ह्यातील गरीब व गरजू रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात येतात व महात्मा जोतीबा फुले जीवनदायी आरोग्य योजनेतून त्यांच्यावर मोफत उपचार केले जातात.वाढती कर्करुग्णसंख्या व अद्ययावत उपचारप्रणालीचा विकसित होत असल्याने महाराष्ट्र शासनाने दि.२१ सप्टेंबर २०१२ पासून स्वतंत्रपणे समर्पित कॅन्सर हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे. केंद्र शासनाने ऑक्टोबर २०१६ मध्ये राज्य कर्करोग संस्था म्हणून मान्यता दिलेली आहे.दिवसेंदिवस कर्करुग्णसंख्या वाढत असल्यामुळे शासनाने रुग्णालयात ट्रू-बिम लिनियर ॲक्सलरेटर ही जागतिक दर्जाची अद्ययावत उपचार प्रणाली दि ०३.१०.२०२४ पासून कार्यान्वित केली आहे.

व्हेरियन ट्रूबीम (True Beam) ho state-of-the-art अत्याधुनिक मेडिकल लिनियर ॲक्सलरेटर असून अंदाजे किंमत २५ कोटी आहे.सदर प्रणाली अचूक,नावीन्यपूर्ण आणि प्रगत रेडिएशन उपचार प्रदान करते.हे मशीन इमेज-गाइडेड रेडिओथेरपी (IGRT) आणि (IMRT) यासह प्रगत उपचार पर्यायांची विस्तृत श्रेणी देते. ही लवचिकता डॉक्टरांना प्रत्येक रुग्णाच्या विशिष्ट गरजेनुसार क्लिष्ट ठिकाणी असणाऱ्या कर्करोगाच्या गाठीवर उपचार करण्यास अनुमती देते.

True Beam हे रुग्ण-केंद्रित उपचार मशीन आहे जे रुग्णाला आरामदायी आणि अत्यंत जटिल रेडिएशन योजना अचूकपणे वितरीत करून उपचार प्रदान करते. यामुळे उत्कृष्ट कार्यक्षमतेने आणि सातत्यपूर्ण उच्च-गुणवत्तेचे उपचार केले जातात.हे डोके आणि मान, मेंदू, स्तन, फुफ्फुस, अन्ननलिका, प्रोस्टेट आणि गर्भाशय यासह शरीरात कोठेही अत्यंत अचूक रेडिएशन उपचार प्रदान करते. पिनपॉइंट पोझिशनिंग, उच्च-गुणवत्तेचे सीटी इमेजिंग आणि ३६०-डिग्री रोटेशनल ही वैशिष्ट्ये आहेत.

डॉ. बालाजी शेवाळकर
प्राध्यापक व विभागप्रमुख,
किरणोपचार विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.



रेडिएशन ऑनकोलॉजी विभागातील वैदक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी आदरणीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांचे स्वागत करताना रेडिएशन ऑनकोलॉजी विभागाचे विभागप्रमुख डॉ. बी. के. शेवाळकर, डॉ.अरविंद गायकवाड.



रेडिएशन ऑनकोलॉजी विभागातील नवीन वास्तू मध्ये CME परिषदेचे उद्घाटन करतांना अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ.अनघा वरुडकर, डॉ.बालाजी शेवाळकर,डॉ.प्रभाकर जिरवणकर, डॉ. अजंली वासडीकर, डॉ. सुरेश हरबडे, डॉ.दर्पण जक्कल, अधिसेविका लता ढाकणे.



रेडिएशन ऑनकोलॉजी विभागातील लिनीअर ॲक्स्लरेटर मशीनची पाहणी करताना मनपा आयुक्त श्री. जी. श्रीकांत, अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ.अरविंद गायकवाड.

# अतिविशेषोपचार रुग्णालय

## Super Speciality Block



# मनोगत




माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचा मागील एक वर्षाचा कार्यकाळ हा सुवर्ण अक्षरात लिहावा असच आहे. या एक वर्षाच्या कालावधीत सरांनी रुग्णहित, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन यांना अग्रक्रम देत आपल्या संस्थेत अनेक कामे केली. विशेषतः सरांच्या पुढाकारामुळे अतिविशेषोपचार रुग्णालयात दिनांक ०५/११/२०२४ पासून स्वतंत्र नोंदणी विभाग सुरू झाला आणि रुग्णांसाठी तो आशेचा किरण ठरला. नोंदणी सुरू झाल्यामुळे रुग्णालयाला स्वीय प्रपंची खाते (PLA fund) मिळाले. सरांच्या अथक प्रयत्न आणि मार्गदर्शनामुळे अतिविशेषोपचार रुग्णालयात आंतर रुग्ण विभाग (IPD) सुरू करणे शक्य झाले. माननीय अधिष्ठाता सरांच्या प्रयत्न आणि प्रेरणेमुळे आपल्या अतिविशेषोपचार रुग्णालयात भरती झालेल्या रुग्णाची ASD closure शस्त्रक्रिया यशस्विरीत्या पार पडली व त्याला Intensive cardiac rehabilitation यशस्विरीत्या देण्यात आले त्यामुळे रुग्ण व्यवस्थितपणे बरा होत आहे.

माननीय सरांच्या मार्गदर्शन आणि सहयोगातून भविष्यात Angioplasty तसेच Neonatology, Urology, CVTS विभागांतर्गत येणाऱ्या विविध शस्त्रक्रिया लवकरच चालू होतील यात काही शंका नाही.

अधिष्ठाता यांना रुग्णांसाठी चा कळवळा पाहता निश्चितच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ची प्रगती आणखीनच सर्वोत्तमच शिखर गाठेल यात शंका नाही

डॉ. वैशाली (लोखंडे)उने
विशेष कार्य अधिकारी
अतिविशेषोपचार रुग्णालय

# मनोगत



## डॉ. सुक्रे सर : अधिष्ठाता म्हणून एक वर्षाचा प्रेरणादायी प्रवास

वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता म्हणून डॉ. सुक्रे सर यांनी आपला कार्यकाल यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या एका वर्षात त्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

माझ्या वैयक्तिक अनुभवातून मला त्यांचा दूरदृष्टीपूर्ण आणि न्याय्य नेतृत्वाचा परिचय झाला. मी एक मानसेवी वैद्यक अधिकारी म्हणून काम करत होतो आणि डॉ. सुक्रे सर यांच्या सहकार्यामुळेच मला संस्थेच्या नियमांमध्ये सामावून घेत नियमित करारावर असोसिएट प्रोफेसर बनण्याची संधी मिळाली. यासाठी मी त्यांच्या प्रति मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या पाठिंब्यामुळे माझ्या वैद्यकीय कार्याला नवी दिशा मिळाली आहे.

डॉ. सुक्रे सर यांच्या दूरदृष्टीमुळे आणि प्रयत्नांमुळे वैद्यकीय महाविद्यालय नक्कीच सुपरस्पेशालिटी शिक्षण संस्थेत परिवर्तित होईल. त्यांनी नवीन DM आणि MCh अभ्यासक्रम सुरू करण्याचा जो उपक्रम हाती घेतला आहे, तो संस्थेला एक नवा आयाम देईल. अशा प्रभावी नेतृत्वाने प्रेरित होऊन संस्थेचा विकास अविरतपणे होत राहील, अशी खात्री वाटते.

त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी हार्दिक शुभेच्छा!

डॉक्टर मकरंद कांजाळकर
सहयोगी प्राध्यापक, न्युरोलॉजी
अतिविशेषोपचार रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

# मनोगत



आदरणीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या पुढाकारामुळे डिसेंबर २०२३ मध्ये CVTS विभागातील शस्त्रक्रिया, अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या इमारतीमध्ये सुरू करण्यात आल्या. मागील वर्षभरामध्ये ३००० पेक्षा जास्त रुग्णांची बाह्यरुग्ण विभागामध्य तपासणी करण्यात आली व २०० पेक्षा अधिक रुग्णांच्या फुप्फुस व रक्तवाहिन्यांच्या आजारासाठी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामध्ये डायलिसिससाठी AV Fistula सर्जरी, रुग्णांचे हात/पाय वाचवण्यासाठी Arterial Embolectomy, Femoropopliteal Bypass (Peripheral Bypass), फुप्फुसांच्या शस्त्रक्रिया जसे Decortication, Lobectomy, Bronchoscopy इत्यादी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, नाशिक येथील शासकीय रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया केल्या जातात परंतु छत्रपती संभाजीनगर येथे मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे रुग्णांसाठी ही सेवा उपलब्ध नव्हती. आदरणीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या प्रयत्नामुळेच शासकीय रुग्णालय व महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे या शस्त्रक्रियांचा शुभारंभ झाला.

दिनांक ३/१२/२०२४ रोजी उतढ्ढ विभागाची टीम व रुग्ण ज्याची आतुरतेने वाट पाहत होते त्या हृदयशस्त्रक्रियेस सुरुवात झाली जन्मजात हृदयाचे छिद्र असलेल्या १४ वर्षाच्या रुग्णावर पहिली हृदयशस्त्रक्रिया करण्यात आली.

नवीन ठिकाणी हृदय शस्त्रक्रिया सुरू करणे हे एक आव्हानच होते, अगदी शून्यापासून सुरुवात करून यशस्वीपणे शस्त्रक्रिया पार पाडण्यामध्ये CVTS सर्जन, भूलतज्ञ, OT स्टाफ, वॉर्ड व ICU स्टाफ यांनी विभागप्रमुख डॉ. सदानंद पटवारी यांच्या मार्गदर्शनाखाली मोलाची कामगिरी बजावली. अधिष्ठाता डॉ. सुक्रे सर विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. वैशाली उणे मॅडम यांच्या अथक प्रयत्नांमुळे हे साध्य झाले.

या पुढे हृदयाच्या बायपास किंवा व्हॉल्व रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना मुंबई किंवा पुणे ला जायची गरज नाही. या शस्त्रक्रिया आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे महात्मा फुले आरोग्य योजनेत अगदी मोफत होतील.

हृदय शस्त्रक्रिया विभाग कार्यरत झाल्यामुळे शासकीय रुग्णालय व महाविद्यालय येथील रुग्णांबरोबरच MBBS, MD/MS च्या विद्यार्थ्यांनाही विशेष फायदा होईल.

सदानंद पटवारी
सहयोगी प्राध्यापक
उरोशल्य चिकित्सा विभाग

# मनोगत





आदरणीय,

आम्ही आपल्या बद्दल जेवढे सांगू तितके कमीच वाटेल, तुम च्या दूरदर्शी नेतृत्वाबद्दल, अथक प्रयत्नांबद्दल आणि वैद्यकीय शिक्षणातील उत्कृष्टतेसाठी अटल वचनबद्धतेबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आम्ही ही संधी घेतो.

भविष्यातील आरोग्यसेवा व्यावसायिकांची मने आणि कौशल्ये घडवण्याचे तुमचे समर्पण आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. नवकल्पना, संशोधन आणि समुदाय सेवेची तुमची आवड आपल्या संस्थेला नवीन उंचीवर नेऊन ठेवते.

तुम्ही दिलेल्या संधींबद्दल, आव्हानांवर मात करण्यासाठी तुम्ही आम्हाला प्रोत्साहन दिलेत आणि तुम्ही आमच्यात जी मूल्ये रुजवलीत त्याबद्दल आम्ही सदैव कृतज्ञ आहोत.

अति विशेषउपचार रुग्णालयात मागील एक वर्षांमध्ये जवळपास ४१८७ डायलिसिस आणि त्यामध्ये जवळपास ९७० डायलिसिस पॉझिटिव्ह पेशंट साठी करू शकलो, तसेच जवळपास १५२३ रुग्णांना बाह्यरुग्ण सुविधा पुरवू शकलो. जर आपले असेच आम्हाला समर्थन राहिल्यास लवकरच आपण किडनी प्रत्यारोपण नेफ्रोलॉजी डिपार्टमेंट मध्ये करण्या स उत्सुक आहोत.

कृपया तुम्ही करत असलेल्या सर्व गोष्टींसाठी आमचे प्रामाणिक कौतुक स्वीकारा. आम्ही तुम्हाला यश, चांगले आरोग्य आणि आनंदाची शुभेच्छा देतो.

एक अपवादात्मक नेता, मार्गदर्शक आणि आदर्श असल्याबद्दल धन्यवाद.

डॉक्टर वाजेद मोगल
सहयोगी प्राध्यापक

डॉक्टर श्रीकांत देशमुख
वरिष्ठ निवासी
मुत्रपिंडविकार तज्ञ
अतिविशेषोपचार रुग्णालय छत्रपती संभाजीनगर.

# मनोगत



रुग्णालयाच्या इमारतीमध्ये सुरू करण्यात आल्या. मागील वर्षभरामध्ये ३००० पेक्षा जास्त रुग्णांची बाह्यरुग्ण विभागामध्य तपासणी करण्यात आली व २०० हूण अधिक रुग्णांच्या फुप्फुस व रक्तवाहिन्यांच्या आजारासाठी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामध्ये डायलिसिससाठी AV Fistula सर्जरी, रुग्णांचे हात/पाय वाचवण्यासाठी Arterial Embolectomy, Femoropopliteal Bypass (Peripheral Bypass), फुप्फुसांच्या शस्त्रक्रिया जसे Decortication, Lobectomy, Bronchoscopy इत्यादी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

दिनांक ३/१२/२०२४ रोजी CVTS विभागाची टीम व रुग्ण ज्याची आतुरतेने वाट पाहत होते त्या हृदयशस्त्रक्रियेस सुरुवात झाली जन्मजात हृदयाचे छिद्र असलेल्या १४ वर्षाच्या रुग्णावर पहिली हृदयशस्त्रक्रिया करण्यात आली. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, नाशिक येथील शासकीय रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया केल्या जातात परंतु छत्रपती संभाजीनगर येथे मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे रुग्णांसाठी ही सेवा उपलब्ध नव्हती. आदरणीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे सर यांच्या प्रयत्नामुळेच शासकीय रुग्णालय व महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे या शस्त्रक्रियांचा शुभारंभ झाला.

नवीन ठिकाणी हृदय शस्त्रक्रिया सुरू करणे हे एक आव्हानच होते, अगदी शून्यापासून सुरुवात करून यशस्वीपणे शस्त्रक्रिया पार पाडण्यामध्ये CVTS सर्जन, भूलतज्ञ, OT स्टाफ, वॉर्ड व ICU स्टाफ यांनी विभागप्रमुख डॉ. सदानंद पटवारी यांच्या मार्गदर्शनाखाली मोलाची कामगिरी बजावली. अधिष्ठाता डॉ. सुक्रे सर विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. वैशाली उणे मॅडम व विभागप्रमुख डॉ. पटवारी सर यांच्या अथक प्रयत्नांमुळे हे साध्य झाले.

हृदय शस्त्रक्रिया विभाग कार्यरत झाल्यामुळे शासकीय रुग्णालय व महाविद्यालय येथील रुग्णांबरोबरच MBBS, MD/MS च्या विद्यार्थ्यांनाही विशेष फायदा होईल.

शितल डिकले पाटील
सहाय्यक प्राध्यापक,
उरोशल्य चिकित्सा विभाग

# अतिविशेषोपचार रुग्णालय
## Super Speciality Block

मागील वर्षभरात अतिविशेषोपचार रुग्णालयात खालील प्रमाणे रुग्णसेवा झाल्याचा तपशील बाहयरुग्ण (३५४५५ रुग्णसंख्या)

| | |
|---|---|
| २ डी इको | ८४४५ |
| ॲन्ज्योग्राफी | २१५ |
| ॲन्ज्योप्लास्टी | ०३ |
| एम. आर. आय | ४१४६ |
| डायेलसीस | ३५५३ |

मागील वर्षभरात अतिविशेषोपचार रुग्णालयात खालील प्रमाणे रुग्णसेवा झाल्याचा तपशील शस्त्रक्रिया (३३९ रुग्णसंख्या)

| | |
|---|---|
| हृदयोग व उरोशल्यचिकीत्साशास्त्र | १६४ |
| मज्जातंतुशल्यचिकीत्साशास्त्र | ५१ |
| मुत्रशल्यचिकीत्साशास्त्र | २२ |
| सुघटनशल्यचिकीत्साशास्त्र | १०२ |








लोकमत

# ‘सुपर स्पेशालिटी’त ‘बायपास’सह विविध शस्त्रक्रिया

## नोंदणी विभागाचे उद्घाटन : महिनाअखेरपर्यंत आंतररुग्ण विभाग होणार सुरू, अधिष्ठाता सुक्रे यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर** : घाटीत केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून उभे राहिलेल्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नोव्हेंबरअखेरपर्यंत आंतररुग्ण विभाग कार्यान्वित होईल. विविध सुपर स्पेशालिटी शस्त्रक्रियांबरोबरच हृदयरुग्णांसाठी लवकरच याठिकाणी ‘बायपास’चीही सुविधा सुरू होणार आहे, अशी माहिती अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दिली.

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मंगळवारी नोंदणी विभागाचे डॉ. सुक्रे यांच्या हस्ते उद्घाटन झाले, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्यअधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या विशेष कार्यअधिकारी डॉ. वैशाली उणे-लोखंडे, डॉ. सरोजिनी जाधव, डॉ. मकरंद कांजाळकर, डॉ. उज्ज्वला दहीफळे, प्रशासकीय अधिकारी महेश गावडे, डॉ. भारत सोनवणे, डॉ. सदानंद पटवारी, डॉ. अतुल लोंढे, मेट्रन छाया कपिलेश्वरी, परिचारिका कालिंदा ढवळे, पूजा जगताप उपस्थित होते.

सुपर स्पेशालिटी रुग्णालयात लवकरच आंतर रुग्णसेवा सुरू करण्यात येईल. त्याबरोबरच विविध प्रकारच्या अतिविशेषोपचाराच्या शस्त्रक्रियादेखील सुरू होतील. पहिल्या दिवशी ४ रुग्णांची याठिकाणी नोंदणी झाली. एका रुग्णाची टुडी इकोसाठी नोंदणी झाली आणि त्यातून २३० रुपये शुल्क जमा झाले. या शुल्काचा नियमानुसार रुग्णसेवेसाठी वापर करण्यात येईल, असे डॉ. सुक्रे यांनी सांगितले.




घाटीतील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात नोंदणी विभागाचे उद्घाटन करताना अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे. यावेळी डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. वैशाली उणे-लोखंडे, डॉ. सुरेश हरबडे आदी.

### कोरोना काळातच ऋण फेडले

डॉ. अरविंद गायकवाड म्हणाले, सुपर स्पेशालिटी रुग्णालयाने कोरोना काळातच एकप्रकारे ऋण फेडले. हजारो कोरोना रुग्ण याठिकाणाहून बरे होऊन गेले. पूर्णपणे तयार होण्यापूर्वीच या रुग्णालयाने समाजाला योगदान दिले आहे.

Hello Chhatrapati Sambhajinagar
Page No. 1 Nov 06, 2024
Powered by: erelego.com

# ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक

## Rural Health Training Center



# ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक
## Rural Health Training Center

### माननीय अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक भेट अहवाल



मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर तसेच उपाधिष्ठाता मा. डॉ. काशिनाथ गर्कळ यांचे स्वागत करताना ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक पैठणचे प्रपाठक डॉ. गौतम सवासे




मा. अधिष्ठाता यांना कार्यालयीन तसेच रुग्णालय कामकाजाविषयीचे माहिती देताना प्रपाठक व कर्मचारी.

### रुग्णालयीन पाहणी





बाह्यरुग्ण विभाग तसेच लसीकरण विभाग पाहणी करताना पाहणी करताना माननीय अधिष्ठाता माननीय प्रपाठक तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी

### १०० खाटा नियोजित इमारत बांधकाम जागेची पाहणी





मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक पैठण येथे प्रस्तावित तीस घाटांच्या रुग्णालयाचे शंभर घाटामध्ये श्रेणीवर्धन नवीन इमारतीच्या नियोजित जागेची पाहणी केली.

## कार्यालयीन कामकाज आढावा बैठक




ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक पैठण येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कामकाजा संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली.




माननीय अधिष्ठाता समवेत सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक पैठण

## मीडिया कव्हरेज



लोकमत

# पैठणमधील १०० खाटांच्या रुग्णालयाच्या जागेची पाहणी

## चिठ्ठी मुक्त रुग्णालय संकल्पना राबविणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पैठण : खासदार संदीपान भुमरे यांच्या प्रयत्नांमुळे शहरात शंभर खाटांचे नवीन रुग्णालय होणार असून त्याच्या इमारतीचे बांधकाम सुरू करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करा, अशा सूचना छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे (घाटी) अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी संबंधितांना शुक्रवारी केल्या आहेत.

या रुग्णालयाच्या जागेची पाहणी सुक्रे यांनी शुक्रवारी दुपारी केली. यावेळी ते बोलत होते. त्यानंतर त्यांनी पैठण येथील ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक घाटी रुग्णालयात दुपारी भेट देऊन रुग्णालयातील विविध बाबींची तपासणी करून पायाभूत सुविधांचा आढावा घेतला. रुग्णालयातील प्रशासकीय कामकाजाबाबतच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. रुग्णांना दर्जेदार रुग्णसेवा कशा प्रकारे देता येईल, यासंबंधी डॉ. गौतम सवासे यांना त्यांनी सूचना केल्या. औषधाबाबत रुग्णांची होणारी हेळसांड थांबवण्यासाठी चिठ्ठीमुक्त रुग्णालय संकल्पना राबविण्याकरिता आवश्यक औषधांचा पुरवठा व मदत वरिष्ठ कार्यालयाकडून केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी प्रपाठक डॉ. गौतम सवासे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. पंडित किल्लारीकर, घाटी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

Chhatrapati Sambhajinagar Gramin
Page No. 4 Jun 24, 2024
Powered by: erelego.com




दिव्य मराठी

छत्रपती संभाजीनगर जिल्हा 24-06-2024

दिलासा • अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांची माहिती, शंभर खाटांच्या रुग्णालय इमारत कामाच्या अनुषंगाने पाहणी

# पैठण ग्रामीण रुग्णालयात लवकरच होणार शस्त्रक्रिया सुरू

# मनोगत




शिवाजी हा माझा १९९१ या वर्गमित्र. १९९१ साली आम्ही दोघांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर) येथे पदवीपूर्व विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला. ३५ वर्षापासून असलेले आमचे हे मैत्रीचे बंध आजही तेवढेच दृढ आहेत. शिवाजीने आता वैद्यकीय शिक्षणातील प्रशासनात
एवढी मोठी उंची गाठली आहे की ते आता शिवाजी सर झाले आहेत. आम्ही सारे वर्गमित्र त्यांना त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे दादा म्हणत असतो. शिवाजी सरांमधील नेतृत्वगुण हे त्यांच्या पदवीपूर्व व पदव्युत्तर जीवनापासूनच प्रकर्षाने जाणवत होते. मार्ड संघटनेमध्ये व MSMTA संघटनेमध्ये त्यांनी त्यांच्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला. आमच्या बॅचचे सगळे गेट टुगेदर आयोजित करण्यात डॉ. शिवाजी सुक्रे हे सतत अग्रेसर असतात. सरांच्या Naughty व हजरजबाबी स्वभावामुळे ते प्रत्येक मैफिलीची जान असतात. जरी ते अत्यंत कडक प्रशासक असले तरी ते अत्यंत मनमिळावू आहेत. अत्यंत हालाखीच्या परिस्थीतीतून, नेर सारख्या छोट्या गावातून येवून सुद्धा आज त्यांनी जी प्रशासकीय उंची गाठली आहे. ती आम्हा सर्व वर्गमित्रांसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे.

मी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील क्ष-किरणशास्त्र विभागात कार्यरत आहे. शिवाजीसर अधिष्ठाता म्हणून रुजू झाल्यापासून मी घाटीमध्ये आमूलाग्र बदल होताना रोज अनुभवत आहे. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून, पार्किंग, उद्याने, सुशोभीकरण इ. मध्ये झालेल्या कायापालट सोबतच सर्व विभागांमध्ये आलेली अद्यावत यंत्रसामुग्री तसेच रुग्णसेवेसाठी हाती घेतलेले विविध उपक्रम हयामुळे घाटी रोजच नवनवीन उंची गाठते आहे.
एक मित्र म्हणून मला त्यांना एकच सांगावेसे वाटते की, घाटीच्या या संवर्धनासोबतच त्यांनी स्वतःच्या तब्येतीचीही काळजी घ्यावी. त्यांच्या पुढील कार्यासाठी मनापासून शुभेच्छा ।

डॉ. अजय वरे, सहयोगी प्राध्यापक,
क्ष-किरणशास्त्र विभाग
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

# मनोगत



डॉ. शिवाजी,आता अरे तुरे म्हणायला जड जाणार आहे एवढी स्वकष्टाने गाठलेली व्यवसायातील तुझी उंची.

तर शिवाजीसर आमचे १९९१ बॅचचे वर्गमित्र हॉस्टेलमधे रहाणे असल्याने हजरजबाबी आणि सदैव मदतीला तयार या गुणांमुळे, सर्व हॉस्टेलाईटच्या गळ्यामधला ताईतच जणू... सरल्या पस्तिस वर्षामधे अगणित असे चांगले अनुभव आले की, नित्यनेमाने नवीनच लखलखते कार्यतत्पर मित्राचे रूप दिसत आले.

अगदी परवाच पंधरा वर्षापूर्वी ज्या खानसाम्याकडे जेवायला जायचो त्याला पॅरालिसिस चा सौम्य झटका आला तर त्याने डॉ. शिवाजीला हक्काने फोन केला आणि तासाभरात तर त्याचा MRI झालेला होता.

स्त्री सहकाऱ्यांची सोयी नसलेल्या गावी बदली झाली तर काहीतासांमध्ये यांनी उत्तम रहाण्याची व टॉईलेट्स ची सोय केली. आज ते एवढे उच्चपदस्थ झाले आहेत पण सर्व स्तरातील माणसांना जोडून रहाणे, त्यांच्या अडीअडचणीला सदैव धावुन जाणे, आपली मुळे सदैव जमीनीतच घट्ट रोवून आहेत हा गुणच आपणास मोठे करणार आहे याची खूप लवकर जाणिव असणे हा ही एक दुर्मिळ सद्गुण. बरेचदा आम्हा साऱ्यांच्याच व्यस्त दिनक्रमामुळे निवांत भेटी अलीकडे होत नाहीत. त्यात बहुतांश वेळी व्यस्त आम्ही मंडळीच असतो. शिवाजी तर मध्यरात्रीही एका हाकेच्या अंतरावर असतात आणि त्याच जुन्या आत्मीयतेने आणि हक्काने भेटतात.

आमच्या बॅचचे पहिले AS club चे गेट टूगेदर असो वा मेडीकल सुपरिटेंडेंट म्हणून त्यांनी केलेला घाटीचा कायापालट सारे त्यांच्या अचूक व्यवस्थापनामुळे शक्य होऊ शकते आपण जिथे शिकलो त्या वैद्यकीय महाविद्यालयाचे गेले एक वर्ष ते डीन आहेत. आणि त्यांच्या गुणकौशल्य व व्यपस्थापणाने अल्पावधीतच घाटीचा जो सकारात्मक कायापालट झालेला आहे तो वाखाणणीय आहे. अशा आमच्या आवडत्या सुहृदाला अजून नवनवीन समाजोपयोगी गोष्टी करण्यासाठी शुभेच्छा...

मात्र व्यस्त व्यापातून थोडा वेळ स्वस्वास्थ्यासाठी काढावा हा मैत्रीवजा हुकूमही...

डॉ. आनंद देशमुख
मेडिकव्हर हॉस्पिटल
छत्रपती संभाजीनगर

# वर्गमित्र






# कौटुंबिक क्षण












योगेश पायघन, पत्रकार दैनिक सकाळ



संतोष हिरेमठ, पत्रकार दैनिक लोकमत




तुषार वाखरे, पत्रकार दैनिक  पुण्यनगरी



गणेश वाघ, पत्रकार दैनिक  सामना




राहुल जांगडे, पत्रकार दैनिक पुढारी




मकरंद कुलकर्णी, पत्रकार, दैनिक महाराष्ट्र टाइम्स




printwell.co.in